20 Nov 2026_Layout 1 11/19/2026 11:04 PM Page 1

बीड, परभणी, लातूर, धाराशिव, जालना, नांदेड, मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर.... या जिल्हयात एकाचवेळी प्रकाशित होणारे

नोव्हेंबर/November
शुक्रवार/Friday
दि.२०/Dt: 20
२०२६/2026

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

सत्य | निष्पक्ष | निर्भीड | सर्वसमावेशक

आजचा अंक ६ पाने Pages 6

किंमत ३ रूपये Price 3 rupees

Jagmitra2010@gmail.com मुख्य संपादक : बालासाहेब कडबाने 9423912525 निवासी संपादक : मकरंद जहागीरदार 9422216061 www.jagmitra.com

बीड/Beed • वर्ष १७ वे/Year 17 • अंक २९/Issue 29 • आरएनआय नं.एमएचएमएआर/२०११/३८८१४ /RNI.No.MAHMAR/2011/38814

मर्जीतील गुत्तेदारांसाठी महावितरणचे अधिकारी बळीचा बकरा?

बोगस बिले नाकारली म्हणून अधिकाऱ्यांवर निलंबनाची कुऱ्हाड?

अधिकाऱ्यांचे निलंबन रद्द करा; बोगस गुत्तेदारांवर गुन्हे दाखल करा!

निलंबनाची कारवाई झालेले ६ अधिकारी व कर्मचारी

१. प्रेमसिंग राजपूत (अधीक्षक अभियंता, बीड)
२. सुबोध डोंगरे (कार्यकारी अभियंता, बीड)
३. श्याम मोरे (उपकार्यकारी अभियंता, गेवराई)
४. शाम कुंभार (सहाय्यक अभियंता, उमापूर)
५. चंद्रकांत प्रधान (सहाय्यक अभियंता, तलवाडा)
६. महेंद्र गुंजाळ (कनिष्ठ अभियंता, शिरसदेवी)



बीड/जगमित्र न्यूज

बीड महावितरणमधील कोट्यवधी रुपयांच्या कथित गैरव्यवहाराचे प्रकरण उघडकीस आणत संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई झाल्यानंतर, आता या कारवाईमागील हेतूबाबत जिल्ह्यात उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे. जवळच्या गुत्तेदारांचे हित जपण्यासाठी लोकप्रतिनिधींनी महावितरणचे अधीक्षक अभियंता प्रेमसिंग राजपूत आणि कार्यकारी अभियंता सुबोध डोंगरे यांना बळीचा बकरा बनवले का, असा सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. स्थानिक नागरिक आणि गेवराई तालुक्यातील राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या चर्चेनुसार, काही निकटवर्तीय गुत्तेदारांची बोगस बिले मंजूर न झाल्यामुळे त्यांनी ही माहिती लोकप्रतिनिधींपर्यंत पोहोचवली. त्यानंतरच हे प्रकरण मुंबईपर्यंत नेऊन तक्रार करण्यात आल्याचे बोलले जात आहे. तसेच, प्रकाशगड (मुंबई) येथील वरिष्ठ कार्यालयाकडून राजपूत आणि डोंगरे यांच्या निलंबनाचे आदेश काढताना चूक झाल्याची प्रतिक्रिया काही सुजाण नागरिकांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे या दोन्ही अधिकाऱ्यांचे निलंबन तात्काळ रद्द करावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.महावितरणच्या मुद्द्यावरून आक्रमक भूमिका घेणारे लोकप्रतिनिधी आता बीड नगर परिषदेतील कथित अनियमितते विरोधात भूमिका घेणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. शहरातील चर्चेनुसार, नगर परिषदेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर दबाव टाकून निकृष्ट व बोगस कामे करून घेतली जात आहेत. तसेच, विरोधी व मित्रपक्षाच्या नगरसेवकांची कामे अडवण्यासाठी कर्मचाऱ्यांना दमदाटी केली जात असल्याचा आरोप होत आहे. सर्वसाधारण सभेत विकासाच्या मुद्द्यांऐवजी एकमेकांवर झालेल्या चिखलफेकीमुळे नगर परिषदेची प्रतिमा मलिन झाली आहे. संबंधित व्यक्ती लोकप्रतिनिधींच्या पक्षाशी निगडित असल्याने या प्रकरणाकडे दुर्लक्ष केले जात आहे का, असा थेट सवाल नागरिक विचारत आहेत. लोकप्रतिनिधींनी आता हिंमत दाखवून नगर परिषदेतील कथित गैरव्यवहाराचीही चौकशी करावी, अशी मागणी होत आहे.



बीड न.प.तील कथित कारभाराकडे लोकप्रतिनिधी लक्ष देणार का?

संबंधित गुत्तेदारांवर फौजदारी गुन्हे कधी दाखल होणार?

अधीक्षक अभियंता आणि कार्यकारी अभियंत्यांसारख्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे निलंबन झाल्याने महावितरण वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. मात्र, केवळ अधिकाऱ्यांवरील कारवाई पुरेशी नसून, कागदोपत्री कामे दाखवून बोगस बिले उचलणाऱ्या गुत्तेदारांकडून अपहाराची रक्कम वसूल करावी आणि त्यांच्यावर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी तीव्र मागणी जनतेतून होत आहे.

महावितरणवर आक्रमक, मग बीड नगर परिषदेच्या भ्रष्टाचारावर मौन का?

निकटवर्तीयांना पोसण्यासाठीच महावितरणमधील कारवाईचा फार्स?

‘मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने’ चा २६ नोव्हेंबरला संविधानदिनी होणार शुभारंभ–ना.पंकजाताई मुंडे

मुंबई/प्रतिनिधी

ग्रामीण भागातील युवक, शेतकरी आणि युवतींना पशुधनाधारित व्यवसायांद्वारे उद्योजकतेची संधी उपलब्ध करून देणाऱ्या ‘मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने’चा शुभारंभ संविधान दिनी, २६ नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. राज्याच्या अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आलेली ही योजना पूर्णतः ऑनलाइन स्वरूपात राबविण्यात येणार असून, शुभारंभाच्या दिवसापासून इच्छुकांना अर्ज करता येणार आहेत, अशी माहिती राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

यासंदर्भात अधिक माहिती देताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, पशुसंवर्धन विभागाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली ग्रामीण युवकांना उद्योजक बनविण्याच्या उद्देशाने ही महत्त्वाकांक्षी योजना जाहीर केली आहे. ग्रामीण युवकांना उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देणे, त्यांना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून सकारात्मक आणि स्वयंपूर्णतेच्या दिशेने मार्गस्थ करणे, तसेच दुष्काळी परिस्थितीत ग्रामीण भागाला दिलासा देणे, हा या योजनेमागील उद्देश आहे.

योजनेच्या पूर्वतयारीसाठी विभागाने बारकाईने व व्यापकप्रमाणात कामे केली असून, विविध जिल्ह्यांमध्ये प्रशिक्षणही देण्यात आले आहे. या प्रशिक्षणांमध्ये हजारोंच्या संख्येने नागरिकांनी सहभाग नोंदविला आहे.

योजना संपूर्णपणे ऑनलाईन ; अर्ज भरण्यापूर्वी फार्मर आयडी, महाआयडी तयार करावा

शासकीय सॉफ्टवेअर व तंत्रज्ञानविषयक कामकाज महाआयटीच्या माध्यमातून करण्याच्या मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार, या योजनेसाठीची ऑनलाइन प्रणाली विकसित करण्याची जबाबदारी महाआयटीकडे सोपविण्यात आली होती. पशुसंवर्धन विभाग आणि महाआयटी यांनी समन्वयाने ही प्रणाली विकसित केली असून, तिच्या विविध चाचण्यांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. योजनेतील अर्ज, माहितीची नोंद, प्रकल्प निवड, खर्चाचा अंदाज आणि अनुदानासंदर्भातील प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी अर्जापूर्वी आपला फार्मर आयडी आणि महाआयडी तयार करून घ्यावा, असे आवाहन मंत्री मुंडे यांनी केले आहे. या ओळखपत्रांच्या (पान २ वर)

पंढरपूरहून दर्शन घेऊन परतताना परळी रेल्वे स्थानकावरून ७८ वर्षीय वृद्ध बेपत्ता

परळी वैजनाथ/प्रतिनिधी



पंढरपूर येथे देवदर्शन करून गावी परतत असताना परळी रेल्वे स्थानकावरून ७८ वर्षीय वृद्ध बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. हरिभाऊ पुंजाजी कोंडाळ (वय ७८, रा. विद्यानगर, सेलू, जि. परभणी) असे बेपत्ता झालेल्या वृद्धाचे नाव असून, त्यांचा शोध घेण्यासाठी परळी रेल्वे पोलिसांनी नागरिकांना माहिती देण्याचे आवाहन केले आहे.याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हरिभाऊ पुंजाजी कोंडाळ हे पत्नी सुलाबाई कोंडाळ व नातेवाईकांसह पंढरपूर येथे देवदर्शनासाठी गेले होते. देवदर्शन आटोपून ते ३ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री ११ वाजता मिरज–परळी रेल्वेने प्रवास करत ४ नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वाजता परळी रेल्वे स्थानकावर पोहोचले. त्यानंतर त्यांनी श्री वैद्यनाथाचे दर्शन घेतले. पुढील प्रवासासाठी ते पुन्हा परळी रेल्वे स्थानकावर आले असता, प्लॅटफॉर्म क्रमांक ३ वर परळी–अकोला रेल्वे उभी होती. या रेल्वेच्या जनरल डब्यात ते सर्वजण सेलू येथे जाण्यासाठी बसले.दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास रेल्वेतील प्रवासी झोपले असताना, दुपारी १२.३० वाजता सुलाबाई कोंडाळ व कमल यांना जाग आली. त्यावेळी हरिभाऊ कोंडाळ हे जागेवर नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी रेल्वेच्या डब्यात तसेच परळी रेल्वे स्थानक परिसरात शोध घेतला; मात्र ते मिळून आले नाहीत. त्यानंतर रेल्वे परभणीमार्गे निजामाबादकडे रवाना झाल्यानंतरही त्यांनी शोध (पान २ वर)

दुष्काळात पशुधन संवर्धनासाठी ७ एकर मोफत ऊस चारा

सिरसाळा/प्रतिनिधी

दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पशुधनाचे संवर्धन व्हावे, या उदात्त हेतूने मौजे पाडोळी (ता. परळी वैजनाथ, जि. बीड) येथे ७ एकर मोफत ऊस चारा वाटपाच्या स्तुत्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, या उपक्रमाचा भव्य शुभारंभ शनिवार, दिनांक २१ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता पाडोळी येथील गट क्र. ८०, हनुमान मंदिराच्या पाठीमागे होणार आहे. या लोकोपयोगी उपक्रमाचे उद्घाटन परळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. श्री. धनंजयजी मुंडे साहेब,राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री मा. ना. पंकजाताई मुंडे, माजी ग्रामविकास राज्यमंत्री मा. श्री. पंडितराव अण्णा दौंड, मा. आमदार मा. श्री. संजयजी दौंड साहेब, ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. मयंक गांधी सर, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते मा. श्री. टि. पी. मुंडे सर, बीडचे जिल्हाधिकारी मा. श्री. विवेक जॉन्सन साहेब आणि बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. जितीन रहेमान साहेब यांच्या शुभहस्ते पार पडणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय अधिकारी मा. श्री. आर. डी. कदम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. किशोरजी काळे, उपविभागीय (पान २ वर)

सिरसाळा येथे सर्वपक्षीय कृती समितीची स्थापना; अध्यक्षपदी बाळासाहेब नाटकर

ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब कडबाने यांच्या उपस्थितीत परळी येथे निर्णय, विकासाच्या प्रश्नांसाठी लढा देणार

सिरसाळा/परळी वै. (वार्ताहर)

सिरसाळा परिसराच्या विविध प्रलंबित विकास कामांसाठी, तसेच राष्ट्रीय महामार्गाच्या निकृष्ट कामासह अनेक ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी सिरसाळा येथे सर्वपक्षीय कृती समितीची स्थापना करण्यात आली आहे.

ज्येष्ठ पत्रकार व संपादक बाळासाहेब कडबाने यांच्या प्रमुख उपस्थितीत परळी येथे झालेल्या बैठकीत ही कृती समिती स्थापन करण्यात आली. यावेळी परिसरातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.





कृती समितीची कार्यकारिणी पुढीलप्रमाणे:

सिरसाळा कृती समितीच्या अध्यक्षपदी बाळासाहेब नाटकर यांची एकमताने निवड करण्यात आली. कार्याध्यक्षपदी तोफिकभाई सिद्दिकी, उपाध्यक्षपदी किरण कुमार डोंगरे, मधुकर दादा काकडे, संदीपजी थोरे पाटील, सचिवपदी मधुसूदन अण्णा टेकाळे, सहसचिवपदी कुशाबा बी.टी., प्रसिद्धी प्रमुखपदी लोकमतचे पत्रकार राजेंद्रजी पांडे, पत्रकार प्रतिनिधी म्हणून रफिक भाई पठाण यांची निवड करण्यात आली.

तसेच सल्लागार म्हणून प्रा.रविकांतजी कराड, एडवोकेट सुमित किरवले सोशल मीडिया प्रसिद्धीप्रमुख विजय गायकवाड, सदस्य म्हणून प्रदीप रासवे, कैलास जाधव, (पान २ वर)

धारूर जहागीर मोहा घाटात बिबट्याचा मुक्त संचार

नागरिकांना सतर्कतेचे आवाहन



धारूर/अतूल शिनगारे

धारूरजहागीरमोहा घाट परिसरात सायंकाळच्या वेळी रस्त्यावरून जाताना बिबट्या आढळून आल्याने परिसरातील नागरिकांमध्ये सतर्कतेची गरज निर्माण झाली आहे. वाहनधारकांना घाटातून प्रवास करताना बिबट्याचा मुक्त संचार दिसून आला. हा परिसर डोंगराळ असल्याने तसेच सध्या पाणी आणि वनराईचे प्रमाण कमी झाल्याने (पान २ वर)

सहा दशकांनंतर वसंतनगरच्या शेतकऱ्यांना न्याय

आ.धनंजय मुंडेंच्या पाठपुराव्याला यश; वसंतनगरच्या १८१ शेतकऱ्यांचा वर्षानुवर्षांपासूनचा जमीन प्रश्न मार्गी!

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

वसंतनगर तांडा येथील १८१ शेतकरी व त्यांच्या वारसांचा गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला जमिनीचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांच्या विशेष पाठपुराव्यामुळे वारस फेरफार करण्यासह वर्ग–२ मधील जमिनी वर्ग–१ मध्ये रूपांतरित करण्यासाठी शासनाची मान्यता मिळाली आहे. या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून हक्काच्या जमिनीच्या नोंदी आणि विविध शासकीय सवलतींपासून वंचित असलेल्या १८१ शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळणार आहे.

६० वर्षांपूर्वी कै.सखाराम नाईक यांनी भूमिहीन बंजारा समाजातील शेतकऱ्यांना मिळवून दिलेल्या जमिनींचा वारस फेरफार आणि वर्ग–२ मधून वर्ग–१ मध्ये रूपांतराचा मार्ग मोकळा; डी.एस. राठोड यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश





वसंतनगर तांड्याच्या स्थापनेमागे स्व.सखारामजी नाईक यांचे मोठे योगदान आहे. सन १९६० ते १९६२ या कालावधीत तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या माध्यमातून बंजारा समाजातील भूमिहीन शेतकऱ्यांना शेतीसाठी जमीन मिळवून देण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले होते. त्या काळात भूमिहीन असलेल्या ४९ शेतकरी कुटुंबांना प्रत्येकी १० एकर जमीन, तसेच गावठाणासाठी स्वतंत्र १० एकर जमीन उपलब्ध करून देण्यात आली. या पुढाकारातून शेतकऱ्यांना केवळ जमिनीचा तुकडा मिळाला नाही, तर त्यांच्या कुटुंबांना शेतीच्या माध्यमातून स्वावलंबी होण्याचा मार्गही खुला झाला. स्व.सखाराम नाईक यांनी उभारलेल्या या गावाच्या आणि शेतकरी कुटुंबांच्या वाटचालीत त्यांचे योगदान आजही महत्त्वपूर्ण मानले जाते.

मात्र, कालांतराने या मूळ लाभार्थी शेतकऱ्यांच्या वारसांना जमिनींचा वारस फेरफार करून घेणे तसेच वर्ग–२ मधील जमिनी वर्ग–१ मध्ये रूपांतरित करून घेणे (पान २ वर)



महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

गोविंदसिंह राजपुत (जिल्हा प्रतिनिधी) मो. 9921876500 PRGI.NO.MHMAR/26/A0224

धाराशिव जिल्हा आवृत्ती शुक्रवार दि.२० नोव्हेंबर २०२६ पान नं. २

आता संभाजी नगर, पुणे, मुंबई येथे जाण्याची गरज नाही

मुळव्याध : संडासच्या जागी आग होणे, दुखणे, कोंब येणे, रक्त जाणे, जागा लहान होणे, फिशर

सांधेदुखी : पाठीच्या मणक्याचे त्रास, चमक मारणे, गॅप पडणे, गुडघे दुखी, टाचदुखी, मानपाठ, कंबरदुखी, हातपायाला मुंग्या येणे, नस दबणे, डोकेदुखी, अंग दुखणे,

स्त्रीयांचे सर्व आजार : मुल बाळ होत नसल्यास वजन जास्त असणे, केस गळणे, चक्करयेणे, घबराहट, बैचेनी, झोप न येणे, पचनाचे व पित्ताचे त्रास, पोटदुखी, हाडीताप, मुतखडा, त्वचारोग, ॲलर्जि सर्दी, खोकला, दमा.

रविवारी दवाखाना बंद राहील

डॉ.रविंद्र ईटके
आयुर्वेद व पंचवर्ग तज्ञ (पुणे)

डॉ.सौ.भाग्यश्री ईटके
स्त्रीरोग व आयुर्वेद तज्ञ

वेळ : स. ११ ते २.३० संध्या : ६ ते ८
सोनोग्राफी सेंटर समोर पदमावती गल्ली, परळी. वै
मो.9822816010, 7588596838

विश्वश्री : आयुर्वेद हॉस्पिटल व पंचकर्म केंद्र

प्रेम संबंधात अडथळा; प्रियकराच्या मदतीने पतीचा खून

धाराशिव/प्रतिनिधी

प्रेमसंबंधांत अडसर ठरणाऱ्या पतीचा प्रेमी आणि पतीच्या मावसभावाच्या मदतीने पत्नीने खून केल्याची दुर्दैवी घटना भूम तालुक्यात १९ नोव्हेंबरला घडली आहे. वाशी पोलिसांनी संशितांना अटक करून या घटनेचा तपास सुरू केला आहे.

यासंदर्भात अधिक माहिती अशी की, भूम तालुक्यातील कुंथलगिरी घाटाजवळील रामकुंड (ता. भूम) येथील वाकवड तलावाजवळ गुरुवारी (दि. १९) हा प्रकार घडला. याप्रकरण वाशी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.वाशी तालुक्यातील गोलेगाव येथील गोविंद शिवाजी कागदे (वय २७) याचा विवाह तांदुळवाडी (ता. वाशी) येथील बाळासाहेब चौधरी यांची मुलगी अंजली हिचा विवाह सहा महिन्यांपूर्वी झाला होता. लग्नापूर्वीपासूनच अंजली हिचे आत्याचा मुलगा शुभम सुभाष खोसे (वय २६, रा. चांदवड, ता. भूम) याच्यासोबत प्रेमसंबंध होते. त्या दोघांची लग्न करण्याचीही इच्छा होती, मात्र अंजलीच्या वडिलांनी त्यांचा दुसरा भाचा गोविंद शिवाजी कागदे याच्यासोबत तिच्या मनाविरुद्ध विवाह लावून दिला होता. लग्नानंतरही शुभम खोसे व अंजली कागदे यांचे प्रेमसंबंध सुरूच होते. या प्रेमसंबंधात गोविंद हा सतत अडथळा ठरत होता. त्यामुळे दोघांनी मिळून गोविंदचा काटा काढण्याचे ठरवले. त्यानुसार दोघांनी गुरुवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास गोविंदला फोन करून कुंथलगिरी घाटाजवळील रामकुंड शिवारातील वाकवड तलावाजवळ डोंगराळ भागात बोलावून घेतले.



तेथे त्यास दारू पाजली व चर्चा सुरू असताना त्यांची बाचाबाची झाली. त्यानंतर शुभम आणि अंजली यांनी मिळून गोविंदच्या गळ्याजवळ व छातीवर चाकूने वार केले. नंतर दगडाने ठेचून ठार मारले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून, फॉरेन्सिक टीमलाही पाचारण करण्यात आले होते. पोलिस निरीक्षक शंकर शिंदे, सहायक पोलिस निरीक्षक एस. व्ही झराड, हवालदार कपिल बोरकर, बाळासाहेब औताडे, विठ्ठल मलंगनेर, नासेर सय्यद, पप्पू पवार हे घटनास्थळी दाखल झाले होते. गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

पोलिसांनी पाठलाग करून आरोपींना पकडले

दरम्यान, मारहाण सुरू असताना गोविंदचा आरडाओरड ऐकून बाजूलाच दरीत जनावरे चारत असलेल्या एका गुराख्याने वाकवड येथील मारकड नावाच्या व्यक्तीस फोन करून माहिती दिली. मारकड यांनी ताबडतोब वाशी पोलिसांना फोनवरून माहिती दिली. वाशीचे पोलिस निरीक्षक शंकर शिंदे हे घटनास्थळी दाखल झाले. त्यावेळी मृत गोविंदचा मावस भाऊ शुभम सुभाष खोसे व पत्नी अंजली गोविंद कागदे फॉरेस्टकडे पळून जात असताना दिसले. पोलिसांनी पाठलाग करून दोघांना ताब्यात घेतले.या घटनेने भूम आणि वाशी तालुक्यात खळबळ निर्माण झाली आहे. आरोपीतांच्या अधिकृत अटकेनंतरच, या घटनेचा अधिक उलगडा होणार आहे. अशी माहिती पोलीस निरीक्षक शिंदे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिली.

महाराष्ट्रातील निर्भीड दैनिक
जगमित्र
विशेष संपादकीय

मोजक्यांची मक्तेदारी!

सर्वप्रथम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन. त्याची प्रमुख कारणे दोन. मुंबई विमानतळावरील विमाने नवी मुंबई विमानतळावर नेली जावीत किंवा काय यावरील वादात त्यांनी उडी घेतली. हे पहिले कारण. आणि नवी मुंबई विमानतळावरील वर्दळ वाढावी यासाठी विद्यमान मुंबई विमानतळावरील काही सेवा तिकडे वळवण्यास त्यांनी स्पष्ट विरोध दर्शवला. हे त्यांच्या अभिनंदनाचे दुसरे कारण. हे दोन्ही विमानतळ अदानी समूहाकडे आहेत. म्हणजे मुख्यमंत्र्यांनी एका अर्थी अदानी समूहाच्या निर्णयास विरोध दर्शवला. ही बाब स्पष्ट केल्यास अभिनंदनामागील कारण लक्षात यावे. नवी मुंबईतील नव्या विमानतळाची वाहतूक वाढावी यासाठी विद्यमान विमानतळावरील सेवा कमी करण्याचा आग्रह धरणे म्हणजे दोन भावांत ज्याचे बरे चालले आहे त्यास व्यवसायात चेपून ज्याचे बेतासबात चालले आहे त्याच्याकडे वळवणे. खरे तर असे करणे हे घरगुती पातळीवरही क्षम्य नाही. त्यामुळे ते शुद्ध व्यावसायिक मुद्द्यावरही अक्षम्यच ठरते. तशी भूमिका मुख्यमंत्र्यांनी घेतली ही यातील महत्त्वाची बाब. त्यांनी केंद्रीय हवाई वाहतूक खात्यास पत्र लिहून मुंबई विमानतळावरील उड्डाणे नवी मुंबईकडे वर्ग करण्यास विरोध दर्शवला. अदानी कंपनीस मुंबईतील जुना- म्हणजे सांताक्रूझ येथील- विमानतळ पाडून त्या जागी नवीन रचना निर्माण करावयाची आहे. त्यासाठी तो विमानतळ पूर्ण बंद करण्याचा आणि त्या ऐवजी तेथील सेवा नवी मुंबई विमानतळाकडे हलवण्याचा घाट कंपनीने घातला. त्यास आधी विमान कंपन्यांनी विरोध केला. नंतर केंद्र सरकारने मध्यस्थी करून हा निर्णय पुढे ढकलण्यास भाग पाडले. त्यानुसार तो पुढील वर्षापासून अंमलात आणण्याचा निर्णय अदानी समूहाने घेतला. त्यास आता महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीही आक्षेप घेत असतील तर ती बाब दखलपात्र ठरते.

नाम फाउंडेशन'च्या कामांवरच योजनेचा निधी खर्च?

धाराशिव/प्रतिनिधी

दुष्काळाने होरपळणाऱ्या शेतकऱ्यांना जलसंधारणाच्या कामांतून दिलासा मिळावा, यासाठी शासनाकडून विविध योजना राबविल्या जात असताना धाराशिव जिल्ह्यातील या योजनांच्या अंमलबजावणीवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' तसेच 'नालाबांधणीकरण व सरळीकरण' योजनेंतर्गत मंजूर झालेल्या १५५ कामांची त्रयस्थ यंत्रणेमार्फत पडताळणी पूर्ण झाल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात आहे. मात्र, याच पडताळणीवर भूम, परंडा आणि वाशी तालुक्यांतील शेतकऱ्यांनी आक्षेप घेतला असून, 'नाम फाउंडेशन'ने पूर्वी केलेली कामेच पुन्हा नव्या योजनेतील कामे म्हणून दाखविण्यात आल्याचा गंभीर आरोप केला आहे. त्यामुळे १५५ कामांची पडताळणी नेमकी कशी झाली, हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. शासनाच्या २८ जून २०२६ रोजीच्या निर्णयानुसार सन २०२४-२५ आणि २०२५-२६ या आर्थिक वर्षांत 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' तसेच 'नालाबांधणीकरण व सरळीकरण' योजनेंतर्गत एकूण १५५ कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला. यामध्ये जलसंपदा विभागाच्या ४५, तर मृद व जलसंधारण विभागाच्या ११० कामांचा समावेश आहे. अशासकीय संस्था आणि ग्रामपंचायतींच्या माध्यमातून ही कामे राबविण्यात आल्याचे संबंधित विभागाकडून सांगण्यात आले आहे. या कामांमध्ये अनियमितता झाल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी त्रयस्थ अधिकाऱ्यांमार्फत पडताळणी करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार सर्व १५५ कामांची तपासणी पूर्ण करण्यात आली असून, कोणत्याही कामात अनियमितता आढळली नसल्याचा दावा मृद व जलसंधारण विभागाने केला आहे. मात्र, विभागाच्या या दाव्यामुळे शेतकऱ्यांचे समाधान झालेले नाही. उलट पडताळणीच्या प्रक्रियेबाबतच संशय व्यक्त केला जात आहे.

जुनी कामे नव्या योजनेत दाखविली का?

'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून यापूर्वी करण्यात आलेली जलसंधारणाची कामे आणि त्याच ठिकाणी नव्याने योजनेअंतर्गत कामे झाल्याचे दाखविण्यात आल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. जर एकाच ठिकाणी पूर्वी काम झालेले असेल, तर त्याच कामाची पुन्हा नव्या योजनेत नोंद कशी झाली? त्यासाठी नव्याने निधी मंजूर झाला का? प्रत्यक्षात नवीन काम झाले की जुन्याच कामाला नव्या योजनेचे नाव देण्यात आले? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

विशेष म्हणजे, पडताळणी करताना केवळ कागदपत्रे, छायाचित्रे आणि विभागीय अहवाल तपासण्यात आले की प्रत्येक कामाची प्रत्यक्ष स्थळपाहणी करण्यात आली, याची स्पष्टता होणे आवश्यक आहे. पूर्वीच्या कामांचे अभिलेख आणि नव्या योजनेतील मंजुरी यांची तुलना न करता पडताळणी झाली असेल, तर त्यातून वस्तुस्थिती समोर येणार कशी? असा सवालही शेतकरी उपस्थित करीत आहेत.

पडताळणी समितीची दिशाभूल झाली का?

जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार त्रयस्थ अधिकाऱ्यांनी तपासणी केली असली, तरी संबंधित कामांची मूळ स्थिती, मंजुरीची तारीख, प्रत्यक्ष कामाचा कालावधी आणि निधीचा विनियोग यांची काटेकोर पडताळणी झाली का, हे महत्त्वाचे आहे. शेतकऱ्यांच्या आरोपांनुसार, 'नाम फाउंडेशन'ने पूर्वी केलेल्या कामांचेच श्रेय योजनेतील कामांना दिले असेल, तर हा केवळ प्रशासकीय त्रुटीचा विषय न राहता सार्वजनिक निधीच्या वापराबाबत गंभीर प्रश्न निर्माण करणारा प्रकार ठरू शकतो.

नळदुर्ग बेरोजगार सुशिक्षित युवकांसाठी रोजगार मेळावा

नळदुर्ग/प्रतिनिधी

नळदुर्ग येथे १९ नोव्हेंबर रोजी नळदुर्ग शहर व परीसरातील बेरोजगार सुशिक्षित युवकांसाठी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला युवकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.नळदुर्ग येथील अंबाबाई मंदिराच्या सभागृहात झालेल्या या मेळावा उदघाटनाच्या कार्यक्रमास तुळजापुरचे नगरसेवक अमोल कुतवळ, जि. प. सदस्या प्रतीक्षा सुरवसे, नळदुर्ग नगरपालिकेतील पाणी पुरवठा समितीचे सभापती तानाजी जाधव, नगरसेवक आकाश कुलकर्णी, इमाम शेख, सुधीर पोतदार, नगरपालिकेतील स्वच्छता आणि दिवाबत्ती समितीच्या सभापती सुमनबाई ठाकुर, नगरसेविका कमलबाई गायकवाड, अपर्णा बेडगे, जूलेखा इनामदार, मदिना बागवान,माजी नगराध्यक्ष नितीन कासार,बलदेव ठाकुर,धाराशिव जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य शिवाजीराव मोरे,जळकोटचे माजी सरपंच गजेंद्र कदम,धाराशिव जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष गोपाळ सुरवसे, तुळजापुर तालुका काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष डॉ. पंकज घुगे,गौरीशंकर मुळे,नळदुर्ग शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आबेद्दीन कुरेशी, हरीश जाधव,माजी नगरसेवक सुधीर हजारे,अमृत पुदाले यांच्यासह यश इंडस्ट्रिज कंपनीचे प्रमुख अधिकारी प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते.

प्रारंभी सर्व मान्यवरांच्या हस्ते आई तुळजाभवानीच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यानंतर उपस्थित सर्व मान्यवरांचा तुळजापुर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष व या भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजक ॲड. अरविंद बेडगे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सत्कार केला.

पान १ वरून....

ना.पंकजाताई मुंडे

निर्मितीसंदर्भातील माहिती पशुसंवर्धन विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शेळीपालन, कुक्कुटपालन, वराहपालननही

योजनेअंतर्गत अर्जदाराला आपल्या व्यवसायाच्या गरजेनुसार विविध पर्याय निवडता येणार आहेत. गाय आणि म्हैस यांसारख्या मोठ्या पशुधनासह शेळीपालन, कुक्कुटपालन तसेच वराहपालन या घटकांसाठी अर्ज करता येईल. काही भागांमध्ये वराहपालनाचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जात असल्याने या घटकाचाही योजनेत समावेश करण्यात आला आहे. वराहपालनासंदर्भात काही ठिकाणांहून निर्यातीची मागणीही प्राप्त झाली आहे. संबंधित व्यवसायासाठी आवश्यक असलेले शेड तसेच हायड्रोपोनिक चारा व्यवस्थेचे पर्यायही अर्ज प्रक्रियेत उपलब्ध असतील, असेही त्यांनी सांगितले. ऑनलाइन अर्जामध्ये अर्जदाराने निवडलेल्या पशुधन व आवश्यक सुविधांनुसार प्रकल्पाचा खर्च प्रणालीद्वारे निश्चित करण्यात येईल. संबंधित प्रकल्पासाठी लागू असलेली अनुदानाची रक्कम वजा करून उर्वरित गुंतवणुकीची रक्कम अर्जदारास ऑनलाइन प्रणालीवर दर्शविण्यात येईल. अर्जदाराला प्रकल्पाशी संबंधित खर्च व अनुदानाची रक्कम अर्ज प्रक्रियेदरम्यान उपलब्ध होणार आहे, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

योजनेचा ग्रेस पीरियड वाढविणार

राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा विचार करून योजनेतील ग्रेस पीरियड वाढविण्यात येत असल्याचेही मंत्री पंकजाताई मुंडे यांनी सांगितले. ग्रामीण भागातील युवक, शेतकरी आणि युवतींना अशा परिस्थितीत पशुधनाधारित व्यवसायासाठी आवश्यक संधी उपलब्ध करून देणे, त्यांना रोजगार व उद्योजकतेकडे मार्गस्थ करणे हा योजनेचा उद्देश आहे. या माध्यमातून ग्रामीण भागातील नव्या पिढीला स्वयंपूर्णतेकडे नेण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक जिल्ह्याला उद्दिष्ट निश्चित करून देण्यात आले आहे. प्राप्त अर्जांवर प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे. योजनेला मिळणारा प्रतिसाद लक्षात घेऊन भविष्यात उद्दिष्ट वाढविण्याची गरज भासू शकते, असेही मंत्री मुंडे यांनी नमूद केले. प्राप्त अर्जांची स्थिती आणि विविध भागांतील प्रतिसाद लक्षात घेऊन पुढील टप्प्यात समूहाधारित पद्धतीने (क्लस्टर) पशुधन व्यवसाय विकसित करण्यासंदर्भात नियोजन करता येणार आहे. योजनेच्या प्रारंभी अर्ज प्रक्रियेस सुरुवात करण्यात येणार असून, त्यानंतरच्या टप्प्यात क्लस्टर पद्धतीने विकासाचा विचार करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. योजनेच्या अर्ज प्रक्रियेबाबत, आवश्यक माहितीसंदर्भात तसेच विविध घटकांच्या निवडीबाबतची सविस्तर माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्जदारांनी महा आयडी आणि फार्मर आयडी तयार करून ऑनलाइन अर्ज प्रक्रियेत सहभागी व्हावे. योजनेविषयी शंका अथवा अधिक माहितीसाठी नागरिकांनी १९६२ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असेही मंत्री पंकजाताई मुंडे यांनी सांगितले.

.....

वृद्ध बेपत्ता

घेतला, परंतु हरिभाऊ यांचा ठावठिकाणा लागला नाही. बेपत्ता वृद्धाचे वर्णन हरिभाऊ पुंजाजी कोंडाळ यांचे वय ७८ वर्षे असून, रंग गोरा, बांधा सडपातळ, उंची अंदाजे ५ फूट ६ इंच, चेहरा गोल, केस पांढरे व डोक्यावर टक्कल, डोळे घारे आहेत. त्यांना मराठी भाषा अवगत आहे. बेपत्ता होताना त्यांनी पांढऱ्या रंगाचे धोतर, पांढऱ्या रंगाचा खमीस शर्ट व उपरणे परिधान केले होते. तसेच पायात इटकरी रंगाच्या चपला होत्या.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हरिभाऊ हे मागील सहा महिन्यांपासून काही वेळा असंबद्ध बोलत असत व घरातून कोणालाही न सांगता निघून जात असत. यापूर्वीही ते सेलू येथून रात्री घराबाहेर पडून पायी पाथरीपर्यंत व तेथून देवनांगरपर्यंत गेले होते. त्यावेळी त्यांना परत आणण्यात आले होते. त्यांच्यावर परभणी येथील डॉ. राहुल पाटील यांच्या दवाखान्यात उपचार सुरू होते.या प्रकरणी सुलाबाई कोंडाळ यांच्या फिर्यादीवरून परळी रेल्वे पोलीस ठाण्यात बेपत्ता होण्याबाबत भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १४० (३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर लोहमार्ग पोलीस अधीक्षक संदीप पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी ईसामोद्दीन पठाण, लोहमार्ग जालना येथील प्रभारी अधिकारी शैलेश जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली परळी रेल्वे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी व तपास अधिकारी पुढील तपास करीत आहेत. नागरिकांना माहिती देण्याचे आवाहन बेपत्ता हरिभाऊ पुंजाजी कोंडाळ यांच्याबाबत कोणाला काही माहिती मिळाल्यास परळी रेल्वे पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.- प्रभारी अधिकारी : शैलेश जोगदंड ९८१९३६७५८१ तपास अधिकारी : एस.आर.फड ९९२३४३९१३७

.....

मोफत ऊस चारा

अधिकारी मा. श्री. अरविंदजी लाटकर, तहसीलदार मा. श्री. विनोद रणवरे साहेब, गटविकास अधिकारी मा. श्री. राजवर्धनजी भोसले, तालुका पशुसंवर्धन अधिकारी मा. श्री. डॉ. पी. एल. आघाव, तालुका कृषी अधिकारी मा. श्री. अर्चनाजी नागरगोजे आणि सिरसाळा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मा. श्री. राठोड साहेब हे उपस्थित राहणार आहेत. तसेच या प्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी गटनेते मा. श्री. अजयजी मुंडे साहेब, परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती मा. श्री. सूर्यभान नाना मुंडे, माजी सभापती मा. श्री. अभयजी मुंडे, धर्मापुरीचे सरपंच मा. श्री. गोविंदजी फड, वाघबेटचे माजी सरपंच मा. श्री. अमरनाथ गिते पाटील, सरपंच संघटनेचे अध्यक्ष मा. श्री. गोवर्धन कांदे, करमळीचे सरपंच मा. श्री. राजेभाऊ फड, ॲड. जगन्नाथ मुसळे यांच्यासह परिसरातील विविध गावांचे आजी-माजी सरपंच, उपसरपंच, सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. तरी या उपक्रमाचा परिसरातील पशुपालक व शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन पाडोळीचे सरपंच कार्यक्रमाचे आयोजक श्री. सोनू विनोदकुमार कराड तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य व पाडोळी, हसनाबाद आणि सेवादसनगर तांडा येथील समस्त ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

.....

बाळासाहेब नाटकर

संतोष गरड, सागर देशमुख, दीपक रावजी खोसे, वैजनाथ कदम, फारुख भाई कुरेशी, अंकुशजी राठोड, दत्ताजी कराड, गोविंद राठोड, अमजदभाई पठाण, आदींचा समावेश आहे.

काय करणार कृती समिती?

यावेळी बोलताना नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, सिरसाळा परिसरातील २८८ कोटींचा रखडलेला राष्ट्रीय महामार्ग, सिरसाळा बस स्थानक , पाणी, आरोग्य, शिक्षण अशा अनेक विषयांसाठी ही कृती समिती प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करणार आहे. लवकरच पुढील आंदोलनाची दिशा ठरवण्यात येणार असल्याचे अध्यक्ष बाळासाहेब नाटकर यांनी सांगितले. या समितीच्या स्थापनेमुळे सिरसाळा परिसराच्या विकासाला नवी गती मिळेल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

.....

मुक्त संचार

वन्यप्राणी भक्ष्य व पाण्याच्या शोधात भटकंती करत असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. धारूरजहागीरमोहा घाटासह भायजळी, जहागीरमोहा व धारूर परिसरातील डोंगराळ भागात नागरिक, शेतकरी, शेतमजूर आणि वाहनधारकांनी विशेष दक्षता घेण्याची गरज आहे. सायंकाळी व रात्रीच्या वेळी या भागातून प्रवास करताना सावधगिरी बाळगावी, तसेच बिबट्या दिसल्यास त्याच्या जवळ जाणे, पाठलाग करणे अथवा गर्दी करून त्याला त्रास देणे टाळावे. याबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी ईश्वर घणावत यांनी नागरिकांना आवाहन करताना, बिबट्याच्या दिसण्यामुळे घाबरून जाऊ नये; मात्र नागरिकांनी सतर्कता व दक्षता वाढवावी. वन्यप्राण्यांना त्रास देऊ नये आणि बिबट्याच्या हालचाली दिसल्यास वन विभागाला तातडीने माहिती द्यावी, असे सांगितले. डोंगराळ घाट परिसरात बिबट्याचा वावर लक्षात घेता नागरिकांनी सावध राहून वन विभागाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे

वसंतनगर

यासंदर्भात अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. त्यामुळे वारसांच्या नावे जमिनींच्या नोंदी होणे, तसेच शासनाच्या विविध सवलती आणि अधिकारांचा लाभ मिळविण्यात अडथळे निर्माण झाले होते. हा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. हा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी स्व.सखारामजी नाईक यांचे पुत्र डी. एस. राठोड यांनी पुढाकार घेतला. त्यांनी माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांची वेळोवेळी भेट घेऊन या प्रश्नाचे गांभीर्य त्यांच्या निदर्शनास आणून दिले. मंत्रालयापासून तहसीलदार कार्यालय, तलाठी कार्यालय आणि मुंबईपर्यंत सातत्याने पाठपुरावा करत आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले. धनंजय मुंडे यांनीही या प्रश्नात लक्ष घालून शासनस्तरावर पाठपुरावा केला. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून, परळी वैजनाथ येथील गट क्रमांक ४६६, ४६८, ४६९ आणि ४७८ मधील संबंधित शेतकऱ्यांचा वारस फेरफार व वर्ग-२ मधून वर्ग-१ मध्ये रूपांतराचा प्रश्न शासनमान्यतेमुळे मार्गी लागला आहे. एका पिढीने भूमिहीन शेतकऱ्यांना जमिनी मिळवून देण्यासाठी संघर्ष केला, तर पुढच्या पिढीने त्या जमिनींचे हक्क वारसांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न केले. स्व.सखारामजी नाईक यांनी लावलेल्या या शेतकरी कुटुंबांच्या उन्नतीच्या पायाला आता प्रशासकीय मान्यतेची जोड मिळाली आहे. या निर्णयामुळे वसंतनगरमधील १८१ शेतकरी व त्यांच्या वारसांना मोठा दिलासा मिळाला असून, सर्व संबंधित शेतकरी कुटुंबीयांनी माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे आणि डी. एस. राठोड यांचे आभार मानले आहेत.

वडिलांनी भूमिहीनांना जमीन मिळवून दिली; पुत्राने वारसांचा हक्क मिळवून दिला!

वसंतनगरच्या उभारणीत स्व.सखारामजी नाईक यांचे योगदान ऐतिहासिक आहे. त्यांनी सन १९६० ते १९६२ दरम्यान बंजारा समाजातील ४९ भूमिहीन शेतकरी कुटुंबांना प्रत्येकी १० एकर जमीन मिळवून देण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. आज त्याच शेतकरी कुटुंबांच्या १८१ वारसांचा जमिनीचा प्रश्न प्रलंबित होता. वडिलांनी भूमिहीनांना जमिनीचा आधार दिला, तर त्यांचे पुत्र डी. एस. राठोड यांनी त्या जमिनींचे हक्क पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी पुढाकार घेतला. माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करत मंत्रालयापासून तहसीलदार व तलाठी कार्यालयापर्यंत प्रशासकीय स्तरावर प्रयत्न केले. अखेर वारस फेरफार आणि वर्ग-२ मधून वर्ग-१ मध्ये रूपांतरासाठी शासनमान्यता मिळविण्यात यश आले. त्यामुळे स्व.सखारामजी नाईक यांचा सामाजिक कार्याचा वारसा डी. एस. राठोड यांनी कृतीतून पुढे नेल्याची भावना वसंतनगरमधील शेतकरी कुटुंबांतून व्यक्त होत आहे.

शेवटच्या पानावरून...

महेंद्र देमगुंडे

बनविण्याचा प्रयत्न कोणीही करू नये. आमदार साहेब, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निमंत्रण मिळाले पाहिजे, अशी तुमची इच्छा असेल तर त्यासाठी आग्रह धरण्यात गैर काहीच नाही. परंतु, तुमच्या राजकीय अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत म्हणून कार्यक्रमात गोंधळ घालण्याचा प्रयत्न करणे योग्य नाही. हा कार्यक्रम अहिल्यादेवींच्या सन्मानाचा आहे, कोणाच्या राजकीय प्रतिष्ठेचा नाही. धनगर समाजाचा कोणत्याही नेत्याला निमंत्रण देण्यास विरोध नाही; मात्र अहिल्यादेवींच्या स्मारकाच्या उद्घाटनात राजकारण करून गोंधळ निर्माण करण्याच्या प्रवृत्तीला तीव्र विरोध आहे. आमदार बालाजी कल्याणकर यांनी समाजाच्या संयमाची परीक्षा घेऊ नये. कार्यक्रमात कोणी गोंधळ घालण्याचा किंवा उद्घाटन सोहळ्याला गालबोट लावण्याचा प्रयत्न केला, तर धनगर समाज लोकशाही मार्गाने त्याचा जाब विचारेल आणि समाजाची ताकद काय असते हे दाखवून देईल. राजकारण करण्यासाठी अनेक व्यासपीठे आहेत; मात्र पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक हे राजकारणाचे व्यासपीठ होऊ शकत नाही. हे आमदार बालाजी कल्याणकर यांनी लक्षात ठेवावे. अहिल्यादेवींच्या स्मारकाचे लोकार्पण सन्मानाने आणि शांततेत होऊ द्या. निमंत्रणाचा आग्रह धरा, पण गोंधळाची धमकी देऊ नका. समाजाच्या भावनांशी खेळण्याचा प्रयत्न केल्यास समाज निश्चितच जाब विचारेल, असा इशारा मौर्य प्रतिष्ठानचे सचिव महेंद्र देमगुंडे यांनी दिला.

.....

वैजनाथ माने

आहे. शासकीय कर्मचाऱ्यांनी कर्तव्यनिष्ठा, शासकीय नियमांचे पालन आणि अधिनस्त कर्मचाऱ्यांकडून नियमांचे पालन करून घेणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच संबंधित प्रकरणात भारतीय न्याय संहिता (BNS), २०२३ मधील तरतुदींचाही संदर्भ देण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकाराची गांभीर्याने दखल घेऊन परळी सामाजिक वनीकरण कार्यालयातील संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करावी, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अंतर्गत दोषींवर कठोर शिस्तभंगाची कारवाई करावी आणि केलेल्या कारवाईचा अहवाल लेखी स्वरूपात कळवावा, अशी मागणी वैजनाथ माने यांनी केली आहे. या तक्रारीच्या प्रती जिल्हाधिकारी बीड, अपर जिल्हाधिकारी अंबाजोगाई, उपविभागीय अधिकारी (महसूल) परळी, मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण) महाराष्ट्र राज्य, पुणे आणि तहसीलदार परळी यांनाही माहितीस्तव व पुढील योग्य कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्या आहेत. शासनाचे आदेश केवळ कागदावरच राहणार की त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणीही होणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

.....

इंटर्नशिप

बैठकीत मांडला होता.

ना. पंकजाताईंमुळे मिळाला न्याय

इंटर्नशिप भत्त्यात वाढ करावी अशी मागणी गेल्या कित्येक महिन्यापासून आम्ही करत होतो पण ना.पंकजाताई मुंडे यांच्या एका निर्णयामुळे आम्हाला न्याय मिळाला अशी भावना स्टुडंट्स असोसिएशनचे अध्यक्ष दिनेश रत्नपारखी यांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांना इंटर्नशिप भत्ता अकरा हजार रुपये दिला जात होता पण आता या निर्णयामुळे त्यांना दरमहा अठरा हजार रुपये निर्वाह भत्ता मिळणार आहे. यामुळे आनंदित झालेल्या राज्यातील विविध पशुवैद्यकीय महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या शिष्टमंडळाने आज ना. पंकजाताईंची रामटेक निवासस्थानी भेट घेऊन त्यांचे आभार मानले. यावेळी स्टुडंट्स असोसिएशनचे अध्यक्ष रत्नपारखी यांच्यासह प्रणव पाटील, सुहाना रैना, प्रतिक सुवर्णकार, पवन राठोड, शिवरत्न वायकर, विशाल निंगोरे, वैष्णवी घुगे, जान्हवी ढोले, मैथिली गायकवाड, पुष्कर आनंदगावकर, शुभम वाडेकर, माधवी झेपाडे, दक्षिता नगिने आदी विद्यार्थी उपस्थित होते.

जाहिर प्रगटन

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनद्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी आमच्या ऑफिसवर येवून माहिती व अधिकार दिल्यावरून सदर जाहिर प्रगटन देत आहे की आमच्या पक्षकार यांनी कसबे परळी वै. येथील नगर परिषद कक्षेतील जमीन सर्व्

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

विष्णू निवृत्ती कदम
(संपादक जालना, आवृत्ती), ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

PRGI.No.- MHMAR/25/A2848

जालना — शुक्रवार दि.२० नोव्हेंबर २०२६ — पाने ४ — पान नं.३

तणावमुक्ती व सकारात्मक विचारसरणीवर मार्गदर्शन कार्यक्रम

जालना । प्रतिनिधी

शासकीय कार्यालयात काम करताना अधिकारी व कर्मचाऱ्यांना विविध प्रकारच्या मानसिक ताणतणावांना सामोरे जावे लागते. हा ताण कमी करून मानसिक स्वास्थ्य जपणे, कामातील सकारात्मकता वाढविणे आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये परस्पर समन्वय व सौहार्द निर्माण करण्याच्या उद्देशाने जिल्हाधिकारी कार्यालयातील महसुल सभागृहात आज 'खुशियों से दोस्ती, तनाव से दूरी' (आनंददायी मैत्री, तणावापासून दूर) या विषयावर ब्रह्माकुमारीज, ओम शांती रिट्रीट सेंटर यांच्या विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



दैनंदिन कामकाजाचा वाढता व्याप, वेळेची मर्यादा, प्रशासकीय जबाबदाऱ्या आणि नागरिकांच्या अपेक्षा यांमुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांवर मानसिक ताण निर्माण होतो. त्याचा परिणाम वैयक्तिक तसेच कार्यालयीन जीवनावर होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर मानसिक स्वास्थ्य उत्तम राखणे, कामामध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे आणि कार्यक्षमता वाढविणे यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ब्रह्माकुमारीज, ओम शांती रिट्रीट सेंटर दिल्ली येथील बि. के. विधात्री दिदी आणि जालना येथील शितल दिदी यांनी यावेळी सकारात्मक विचारसरणी व आत्मप्रेरणा, मनःशांती, ध्यानधारणा व मानसिक संतुलन, कार्यालयीन कामकाजात आनंद व समाधान, अधिकारी-कर्मचाऱ्यांमधील परस्पर संबंध व समन्वय, काम आणि वैयक्तिक जीवनातील संतुलन, निर्णयक्षमता, वेळेचे व्यवस्थापन तसेच तणावपूर्ण परिस्थितीत संयम व कार्यक्षमता टिकवून ठेवणे या विषयांवर मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी मनिषा देशपांडे, उपजिल्हाधिकारी सुकेशिनी पगारे यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व विभागप्रमुख, शाखाप्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आ.हिकमत दादा उढाण यांची आक्रमक भूमिका; टँकर, चारा छावण्या, जलसंधारणासह शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर मांडल्या महत्त्वपूर्ण उपाययोजना..!

जालना । प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर घनसावंगी येथील आमदार जनसंपर्क कार्यालयात दुष्काळ आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत आमदार हिकमत दादा उढाण यांनी शेतकरी, शेतमजूर, पशुपालक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणींवर सविस्तर चर्चा करत दुष्काळ निवारणासाठी विविध महत्त्वपूर्ण मुद्दे मांडले. तालुक्यातील ज्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची आवश्यकता आहे, अशा सर्व गावांना टँकर उपलब्ध करून देण्यात येतील. पाणीटंचाईमुळे नागरिकांची गैरसोय होऊ नये, यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील, अशी भूमिका आमदार उढाण यांनी मांडली. तसेच जनावरांच्या चारा आणि पाण्याचा प्रश्न लक्षात घेता प्रत्येक सर्कलमध्ये चारा छावणी सुरू करण्यासाठी नियोजन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

भविष्यातील पाणीटंचाईवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी नदी-नाल्यांचे खोलीकरण व रुंदीकरण करण्यावर भर देण्यात येणार आहे. प्रत्येक गावात २०० जलतारा खड्डे करण्याचे उद्दिष्ट ठेवून पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी व्यापक जलसंधारणाची कामे हाती घेण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा, यासाठी शेततळे, सिंचन विहिरी, शेताच्या बांधावर वृक्षलागवड यांसारख्या वैयक्तिक लाभाच्या योजनांची माहिती पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवावी, असे त्यांनी सांगितले. तसेच प्रत्येक गावात शेतकरी मेळावा आयोजित करून शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घ्याव्यात आणि गावाच्या सर्वांगीण विकासासाठी गावनिहाय विकास आराखडा तयार करावा, अशी भूमिका मांडली.



दुष्काळामुळे अनेक कुटुंबांसमोर अन्नधान्याचा प्रश्न निर्माण होत आहे. ज्या गावांमध्ये अन्नधान्याची गरज आहे, अशा गावांतील गरजू नागरिकांना समप्रमाणात अन्नधान्याचे वाटप करण्यात यावे, असेही आमदारांनी स्पष्ट केले. दरम्यान, मायक्रोफायनान्स कंपन्यांकडून दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना विनाकारण त्रास देणे, जबरदस्तीने वसुली करणे किंवा मानसिक दबाव आणणे असे प्रकार होत असल्यास ते पुढे होणार नाही ह्याची काळजी घ्यावी. शेतकऱ्यांची अडवणूक करणाऱ्यांवर माझ व प्रशासनाच विषेश लक्ष असणार आहे. असा स्पष्ट इशारा आमदार हिकमत दादा उढाण यांनी दिला. तसेच बँकांनी शेतकऱ्यांना पीककर्जाचे वाटप प्राधान्याने करावे. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन शेतकऱ्यांशी सहानुभूतीपूर्वक वागणूक द्यावी, कर्जप्रकरणे विनाकारण प्रलंबित ठेवू नयेत आणि शेतकऱ्यांना आर्थिक अडचणीतून बाहेर पडण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. दुष्काळाच्या संकटात शेतकरी, पशुपालक आणि सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी पाणीपुरवठा, चारा, अन्नधान्य, जलसंधारण, शेतीसाठी आर्थिक मदत आणि शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी अशा सर्वच आघाड्यांवर एकत्रितपणे काम करण्याची गरज असल्याचे आमदार हिकमत दादा उढाण यांनी यावेळी स्पष्ट केले. दुष्काळ निवारणासाठी प्रशासनाने गांभीर्याने आणि समन्वयाने काम करावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

या बैठकीस उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी, तहसिलदार रमेश पागोटे, तालुका कृषी अधिकारी सखाराम पवळ तसेच तालुका प्रशासनातील विविध विभागांचे अधिकारी, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्ते, महसूल, पंचायत समिती, महावितरण व कृषी विभागाचे कर्मचारी, तालुक्यातील ग्रामस्थ, शेतकरी बांधव आणि पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दुष्काळात कष्टाने पिकवलेली मक्याची गंजी शॉर्टसर्किटमुळे जळून खाक, दोन लाखाचे नुकसान

बदनापूर । नारायण ब्राह्मणे

बदनापूर तालुक्यातील कडेगाव शिवारातील शेतकरी निर्मला सुरेश काळे यांचे ४० क्विंटल मक्याचे नुकसान तसेच कडबा जळून जवळजवळ २ लाख ३६ हजार रुपयांपेक्षा अधिक चे नुकसान झाल्याने शेतकरी गणेश कोल्हे यांची शासनाकडे विशेष मदतीची मागणी केली आहे. कडेगाव, ता. बदनापूर, जि. जालना यंदाच्या दुष्काळी परिस्थितीत दिवस-रात्र कष्ट करून पिकवलेला मका शॉर्टसर्किटमुळे जळून खाक झाल्याची दुर्दैवी घटना कडेगाव शिवारातील गट क्रमांक १० येथे घडली. या घटनेत शेतकरी निर्मला सुरेश काळे यांच्या सुमारे ४० क्विंटल मक्याचे नुकसान झाले असून, आधीच दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या काळे कुटुंबावर आणखी एक मोठे संकट कोसळले आहे.



यंदा अत्यल्प पावसामुळे परिसरातील शेतकऱ्यांची पिके पाण्याअभावी करपून गेली आहेत. अशा बिकट परिस्थितीत निर्मला सुरेश काळे या कष्टकरी महिलेने मोठ्या जिद्दीने आणि मेहनतीने मक्याचे पीक जगवले. दिवस-रात्र कष्ट करून मक्याला पाणी दिले, पिकाची निगा राखली आणि अखेर मेहनतीने पीक पदरात पाडून घेत त्याची शेतात गंजी रचली होती. या मक्यातून सुमारे ४० क्विंटल उत्पादन मिळण्याची अपेक्षा होती. मात्र, ज्या ठिकाणी मक्याची गंजी रचण्यात आली होती, त्याच ठिकाणी वीजेचा खांब असल्याने अचानक शॉर्टसर्किट होऊन गंजीने पेट घेतला. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले आणि डोळ्यादेखत संपूर्ण मक्याची गंजी जळून राख झाली. आधीच दुष्काळामुळे शेतातील इतर पिके करपून गेली होती. त्यात मोठ्या कष्टाने हातात आलेले पीकही आगीत नष्ट झाल्याने निर्मला काळे यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

विशेष म्हणजे, सध्या साधारणता बाजारात मक्याला प्रतिक्विंटल ३,४०० रुपयांपेक्षा अधिक भाव मिळत आहे. त्यामुळे जळून खाक झालेल्या ४० क्विंटल मक्याची बाजारभावानुसार किंमत १ लाख ३६ हजार रुपयांपेक्षा अधिक होते. एका कष्टकरी महिलेच्या वर्षभराच्या मेहनतीचे एवढे मोठे नुकसान झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या घटनेची माहिती संबंधित शेतकरी कुटुंबाकडून मिळताच सामाजिक कार्यकर्ते गणेश कोल्हे यांनी तातडीने महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांना तसेच तहसील प्रशासनाला घटनेची माहिती दिली. त्यानंतर संबंधित यंत्रणेमार्फत घटनास्थळी पंचनामा करून घेण्यात आला.

दुष्काळाने शेतातील पिके हिरावून घेतली आणि आता शॉर्टसर्किटमुळे हातात आलेली कमाईही राख झाली, अशी दुहेरी संकटाची परिस्थिती या कुटुंबावर ओढवली आहे. त्यामुळे शासनाने या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन शेतकरी निर्मला सुरेश काळे यांच्या कुटुंबाला विशेष बाब म्हणून तातडीने आर्थिक मदत द्यावी. तसेच महावितरण व संबंधित प्रशासनाने योग्य ती नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी सकारात्मक कार्यवाही करावी, अशी मागणी नुकसानग्रस्त काळे परिवारा-सह गणेश कोल्हे यांनी केली आहे.

नावीन्यपूर्ण उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी जालना जिल्ह्यात शाळा गुणवत्ता विकास कार्यक्रम : पालकमंत्री पंकजा मुंडे

जालना । प्रतिनिधी

नावीन्यपूर्ण उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी जालना जिल्ह्यात शाळा गुणवत्ता विकास कार्यक्रम राबविण्यात येणार असून विविध शासकीय यंत्रणांनी मंजूर विकासकामे कालमर्यादेत पूर्ण करावीत. तसेच योजनांची वेळेत अंमलबजावणी होण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले. जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून जालना जिल्ह्यात करण्यात येणाऱ्या विकासकामांचा पालकमंत्री मुंडे यांनी आढावा घेतला. यावेळी दूरदृश्य प्रणालीद्वारे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारिया तसेच विविध विभागांचे प्रमुख शासकीय अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, जिल्ह्यातील वीज वितरण व्यवस्था बळकट करण्यासाठी उपकेंद्रे, ट्रान्सफॉर्मर आणि रोहित्रांची क्षमता वाढविण्यासह विविध कामे हाती घेण्यात येणार आहेत. त्यासाठी तरतूद करण्यात आली असून, या कामांमुळे दुष्काळी परिस्थितीत दिलासा मिळण्यास मदत होईल. सौर हायमास्ट उभारणीसाठीही निधीची तरतूद करण्यात येत आहे. जिल्ह्यातील विकासकामांसाठी उपलब्ध निधी अखर्चित राहू नये, यासाठी विविध शासकीय यंत्रणांकडून कालमर्यादेत कामे पूर्ण करून घेण्याची कार्यवाही जिल्हाधिकाऱ्यांनी करावी, असे पालकमंत्री मुंडे यांनी सांगितले. जिल्हा जलसंधारण विभागाला उपलब्ध झालेला अपेक्षित निधी खर्च न होणे ही गंभीर बाब आहे. निधी परत जाणार नाही, यासाठी कामांना प्रशासकीय मान्यता वेळेत मिळण्याच्या दृष्टीने तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

नावीन्यपूर्ण उपक्रमांतर्गत नगरपरिषद क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालयांची उभारणी आणि शाळा गुणवत्ता विकास कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. यासाठी १५ कोटी ६६ लक्ष रुपये तरतूद करण्यात आली आहे. दिव्यांग कल्याण व सक्षमीकरणासाठी ४ कोटी २५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असून, गरजू दिव्यांग व्यक्तींना ई-रिक्षा आणि विविध साहाय्यभूत साधने देण्यात येणार आहेत. महिलांचे सक्षमीकरण आणि स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी रेशीम उद्योगाच्या माध्यमातून साडीनिर्मिती व्यवसाय उभारण्यास मदत करावी. यासाठी संबंधित यंत्रणांनी आवश्यक उपाययोजना कराव्यात. दुष्काळी परिस्थितीत प्राथमिक आरोग्य केंद्रे व शाळांच्या दुरुस्ती कामांना अडसर नाही असेही पालकमंत्री मुंडे यांनी सांगितले.

पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी गावागावांत शिवसेनेचे विचार पोहोचवा : सुनील पाटील

अंबड तालुक्यातील पदाधिकाऱ्यांची बैठक व नूतन पदाधिकारी नियुक्ती कार्यक्रम उत्साहात

अंबड । ज्ञानेश्वर साळुंके

अंबड तालुक्यातील आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटना अधिक भक्कम करण्यासाठी प्रत्येक पदाधिकाऱ्याने जबाबदारीने काम करावे आणि गावागावांत पक्षाची विचारधारा पोहोचवून नवीन कार्यकर्त्यांना संघटनेशी जोडून घ्यावे, असे आवाहन जालना लोकसभा संपर्कप्रमुख सुनील पाटील यांनी केले. अंबड तालुक्यातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक तसेच नूतन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीचा कार्यक्रम लालवाडी येथील मातोश्री कृषी पर्यटन केंद्रात मोठ्या उत्साहात पार पडला, त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीत पक्ष संघटनेची बांधणी, संघटनात्मक



विस्तार आणि आगामी रणनीतीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

या कार्यक्रमास जिल्हाप्रमुख मनीष श्रीवास्तव, जिल्हा संघटक भानुदास घुगे, उपजिल्हाप्रमुख हनुमान धांडे, माजी तालुकाप्रमुख अशोक पाटील-बरडे, तालुकाप्रमुख दिनेश काकडे, शहरप्रमुख कुमार रूपवते यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच बंडू पागिरे, अशोक गिरी, रमेश वराडे, श्याम तिकांडे, रुपेश मोहिते, लक्ष्मण आढाव, भीमराव नेमाने, उल्हास वाघ, प्रदीप जोशी, बाळू सपकाळ, रोहिणी तोगे, भाऊसाहेब तांबे, प्रल्हाद डुबल, राजेश डोखे, राजू वीर, शैलेश दिवटे, बाळासाहेब नारळे, रवि इंगळे, दीपक खरात, संतोष मुर्तडकर, अमोल सोनवणे, संतोष बर्गे, मुकुंद हुशे, कृष्णा थेटे, उद्धव उगले, साईनाथ काळे, बाबा मगरे, सुनील वाकणकर यांच्यासह उपतालुकाप्रमुख, विभागप्रमुख व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंठा तालुक्यात लाचखोरीचा पर्दाफाश; सावरगाव व वायाळ ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकावर गुन्हा दाखल

मंठा । प्रतिनिधी

शासकीय योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी असलेल्या ग्रामपंचायत यंत्रणेतील अधिकारीच लाचेच्या मोहात अडकल्याची धक्कादायक घटना मंठा तालुक्यात उघडकीस आली आहे. रोजगार हमी योजनेअंतर्गत काम करणाऱ्या रोजगार सेवकाच्या मानधनाच्या चेकच्या मोबदल्यात तब्बल १३ हजार रुपयांची लाच मागून त्यापैकी १० हजार रुपये स्वीकारताना ग्रामपंचायत अधिकारी तथा ग्रामसेवक अनिल तुकाराम चव्हाण यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहात पकडले. ही कारवाई १८ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजून २२ मिनिटांच्या सुमारास मंठा शहरातील जालना रोडवरील धनश्री हार्डवेअर परिसरात करण्यात आली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, तक्रारदार हा रोजगार सेवक असून, सावरगाव वायाळ ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी अनिल तुकाराम चव्हाण यांनी ३० ऑक्टोबर २०२६ रोजी तक्रारदाराला २४ हजार रुपयांच्या मानधनाचा चेक दिला होता. या चेकच्या मोबदल्यात त्यांनी ६ हजार रुपयांची मागणी केली होती. त्यावेळी तक्रारदाराने १ हजार रुपये दिले होते, तर उर्वरित ५ हजार रुपये नंतर देण्याचे ठरले होते. त्यानंतर १७ नोव्हेंबर रोजी ४८ हजार रुपयांचा मानधनाचा चेक देताना पुन्हा ८ हजार रुपयांची मागणी करण्यात आली. यापूर्वीच्या ५ हजार रुपयांसह एकूण १३ हजार रुपये देण्याची मागणी झाल्याने तक्रारदाराने लाच देण्यास नकार देत १८ नोव्हेंबर रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे लेखी तक्रार दाखल केली.

सापळा रचला अन् लाचखोर जाळ्यात!

तक्रारीची पडताळणी केल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचला. दरम्यान, धनश्री हार्डवेअर परिसरात तक्रारदाराकडून १० हजार रुपयांची लाच स्वीकारताना अनिल तुकाराम चव्हाण यांना पथकाने पकडले. त्यानंतर मंठा पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ च्या कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. या प्रकरणात पोलीस उपअधीक्षक बाळू जाधव यांनी सापळा अधिकारी म्हणून काम पाहिले. तर पर्यवेक्षण अधिकारी म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडली. सापळा पथकात पोलीस कर्मचारी सहभागी होते. मार्गदर्शन अपर पोलीस अधीक्षक शशिकांत शिंगारे व पोलीस अधीक्षक कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केले.

शासकीय यंत्रणेत लाचखोरीला आळा बसणार कधी?

रोजगार हमी योजनेत काम करणाऱ्या रोजगार सेवकाच्या मानधनाच्या पैशांसाठीच जर ग्रामपंचायत अधिकाऱ्यांकडून लाचेची मागणी होत असेल, तर सामान्य नागरिकांनी न्याय मागायचा कोणाकडे? शासकीय योजनांचा पैसा हा लाभार्थी आणि कर्मचाऱ्यांचा हक्क आहे; तो मिळवून देण्यासाठी कोणत्याही अधिकाऱ्याला लाच मागण्याचा अधिकार नाही. या कारवाईमुळे मंठा तालुक्यातील ग्रामपंचायत स्तरावरील कारभारावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भ्रष्टाचार करणाऱ्यांवर कठोर कारवाई होणे हीच सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

मंठा तालुका काँग्रेसच्या संघटनात्मक कामाचा अहवाल विवेकराव घारे पाटील यांनी प्रदेशाध्यक्षांकडे सादर



जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रभारी सिरीवेल्ला प्रसाद व प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे जालना दौऱ्यावर आले असता मंठा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विवेकराव घारे पाटील यांनी त्यांची भेट घेऊन मंठा तालुक्यात काँग्रेस पक्षाच्या वतीने आतापर्यंत करण्यात आलेल्या विविध संघटनात्मक कामांचा सविस्तर अहवाल सादर केला.

यावेळी आगामी काळात मंठा तालुक्यात काँग्रेस पक्षाची संघटना अधिक मजबूत करण्यासाठी विविध उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. तसेच पक्षाची ध्येयधोरणे सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविणे, कार्यकर्त्यांना सक्रिय करणे आणि संघटनात्मक बांधणी अधिक प्रभावी करण्याबाबत विचारविनिमय झाला. यावेळी खासदार डॉ. कल्याण काळे, जिल्हाध्यक्ष कल्याण दळे, राजाभाऊ देशमुख, राजेंद्र राख यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

विधी व न्याय मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी ॲड.व्ही.डी. साळुंके

अंबड । प्रतिनिधी

कायदा, न्यायव्यवस्था आणि मराठी साहित्य यांचा अनोखा संगम घडविणाऱ्या ऐतिहासिक विधी व न्याय मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. व्ही.डी. साळुंके (वसंत दिगंबरराव साळुंके) यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती संमेलनाचे संयोजक तथा यशवंत प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. संजय खोरे यांनी दिली.

महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या अनुदानातून यशवंत प्रतिष्ठान, शेवगा, ता. अंबड, जि. जालना यांच्या वतीने दिनांक ५ व ६ डिसेंबर २०२६ रोजी पं. गोविंदराव जळगावकर नाट्यगृह, अंबड येथे या राज्यस्तरीय विधी व न्याय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या ऐतिहासिक संमेलनाच्या अध्यक्षस्थानी भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न बी. वराळे राहणार असून पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार आहे.



या संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी ॲड. व्ही.डी. साळुंके यांची निवड करण्यात आली आहे.ड.साळुंके हे महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलचे माजी अध्यक्ष असून, सलग पाच वेळा बार कौन्सिलवर निवडून आलेले सदस्य आहेत. सन १९९८ पासून ते बार कौन्सिलचे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. सन २०२२ मध्ये त्यांची बार कौन्सिलच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली होती. दिवाणी, फौजदारी, महसूल आणि सहकार अशा विविध क्षेत्रांतील न्यायालयीन कामकाजाचा त्यांना ४० वर्षांहून अधिक अनुभव आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात त्यांनी १२ हजारांहून अधिक प्रकरणांमध्ये पक्षकारांचे प्रतिनिधित्व केले आहे. वकिलांच्या संरक्षणासाठी डव्होकेट प्रोटेक्शन कायदा लागू करण्याचा प्रश्न तसेच न्यायालयीन परिसरात वकिलांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या विषयांवर त्यांनी सातत्याने सक्रिय भूमिका बजावली आहे. ॲड. व्ही.डी. साळुंके यांच्या प्रदीर्घ विधीविषयक अनुभवाचा, संघटनात्मक कौशल्याचा आणि मार्गदर्शनाचा संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी मोलाचा उपयोग होईल, असा विश्वास संमेलनाचे संयोजक तथा यशवंत प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. संजय खोरे यांनी व्यक्त केला आहे.

या दोन दिवसीय संमेलनात ग्रंथदिंडी, ग्रंथप्रदर्शन व ग्रंथदालन, परिसंवाद, टॉक शो, काव्यसकाळ, प्रकट मुलाखत, विशेष व्याख्याने अशा विविध उपक्रमांची रेलचेल असणार आहे. न्यायमूर्ती, ज्येष्ठ विधिज्ञ, कायदेतज्ज्ञ, साहित्यिक, विचारवंत, लोकप्रतिनिधी, प्राध्यापक, विद्यार्थी आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांना एकाच व्यासपीठावर आणण्याचा या संमेलनाचा प्रयत्न आहे. कायदेविषयक विषयांवर मराठी भाषेतून विचारमंथन घडवून आणणे, विधी साहित्यनिर्मितीला प्रोत्साहन देणे आणि संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मूल्यांचा समाजात प्रसार करणे, ही संमेलनाची प्रमुख उद्दिष्टे असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील युवक-युवतींनी जिल्हास्तरीय युवा महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार

जालना । प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जालना यांच्या वतीने माय भारत (चध इहरीरीं), राष्ट्रीय सेवा योजना (छडड) तसेच भारत स्काऊट आणि गाईड्स यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय युवा महोत्सव सन २०२६-२७ चे आयोजन शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर २०२६ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, जालना येथे करण्यात आले आहे.

या युवा महोत्सवामध्ये समूह लोकनृत्य, समूह लोकगीत, चित्रकला, पथनाट्य आणि कविता लेखन अशा पाच कला व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. या स्पर्धांमधून जिल्ह्यातील युवक-युवतींना आपले कलागुण, सर्जनशीलता, सांस्कृतिक अभिव्यक्ती व नेतृत्वगुण सादर करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. स्पर्धेचे स्वरूप व वेळ : समूह लोकनृत्य स्पर्धेसाठी १५ मिनिटे, समूह लोकगीतासाठी ७ मिनिटे, पथनाट्यासाठी १५ मिनिटे, चित्रकला स्पर्धेसाठी ९० मिनिटे तर कविता लेखनासाठी ५०० शब्दांच्या मर्यादेत ६० मिनिटे वेळ देण्यात येणार आहे. लोकनृत्य, लोकगीत व पथनाट्य या सांघिक स्पर्धांमध्ये वाद्यवृंदासह जास्तीत जास्त १० स्पर्धकांचा सहभाग राहील.

यंदाच्या युवा महोत्सवाची मुख्य संकल्पना 'नशामुक्त युवा, फॉर विकसित भारत' अशी असून युवकांमध्ये व्यसनमुक्ती, आरोग्यदायी जीवनशैली आणि विकसित भारताच्या उभारणीत युवकांचे योगदान याबाबत जनजागृती करण्यावर भर देण्यात येणार आहे. चित्रकला स्पर्धेसाठी 'नशामुक्त युवा' आणि 'युवकांसाठी आरोग्यदायी जीवनशैली' हे विषय राहणार आहेत. पात्रता व आवश्यक अटी स्पर्धक हा जालना जिल्ह्याचा रहिवासी किंवा जालना जिल्ह्यात शिक्षण घेणारा असावा. दि. १७ ऑगस्ट २०२६ रोजी १५ ते २९ वर्षे वयोगटातील युवक-युवतींना सांस्कृतिक स्पर्धांमध्ये सहभागी होता येईल. प्रत्येक स्पर्धकास कोणत्याही एका स्पर्धा प्रकारात एकदाच सहभाग घेता येईल. सर्व सहभागींची माय भारत पोर्टलवर नोंदणी अनिवार्य आहे. स्पर्धकांनी आधार कार्ड व आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत. लोकगीत व लोकनृत्य स्पर्धेसाठी रेकॉर्डेड संगीतास परवानगी राहणार नाही.

जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या स्पर्धकांना नियमानुसार विभागस्तरीय स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धेतील गुणवंत व विजेत्या स्पर्धकांना प्रमाणपत्रे, ट्रॉफी तसेच सांघिक व वैयक्तिक स्पर्धा प्रकारानुसार रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे.

जालना जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, युवक मंडळे, सांस्कृतिक संस्था व मंडळांचे पदाधिकारी यांनी आपल्या संस्थेतील जास्तीत जास्त पात्र विद्यार्थी व युवक-युवतींना या महोत्सवात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे. स्पर्धकांनी शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजेपर्यंत जिल्हा क्रीडा संकुल, जालना येथे उपस्थित राहावे. अधिक माहितीसाठी सिद्धार्थ कदम, क्रीडा मार्गदर्शक ८९७५३३३५९४ यांच्याशी संपर्क साधावा. तरी जालना जिल्ह्यातील युवक-युवतींनी या युवा महोत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

संतोष सोनवणे (लातूर जिल्हा प्रतिनिधी)
मो.9673158719

PRGI.No.- MHMAR/26/A2511

लातूर जिल्हा आवृत्ती — शुक्रवार दि.२० नोव्हेंबर २०२६ — पान नं.४



राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी केली लातूर जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी

पाणी व चारा टंचाई, रोजगाराबाबत शेतकऱ्यांशी संवाद

लातूर । प्रतिनिधी

राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी आज चाकूर तालुक्यातील आनंदवाडी येथे केळी बागेची, तसेच नायगाव येथे व्हीबी-जी रामजी योजनेंतर्गत सुरू असलेल्या पांदण रस्ता कामाची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकरी, मजुरांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. तसेच शेतीचे नुकसान, पाणीटंचाई, चारा व रोजगाराविषयी माहिती घेतली. याप्रसंगी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी माननीय राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते जलतारा उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

नायगाव येथे शेतकऱ्यांशी संवाद साधताना माननीय राज्यपाल म्हणाले की, यावर्षी राज्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे, या परिस्थितीत प्रत्यक्ष शेतीची पाहणी करून शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेणे हे आपले कर्तव्य आहे. दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी शासन विविध माध्यमातून शेतकऱ्यांना मदत करत आहे, ही समाधानकारक बाब आहे. व्हीबी-जी राम जी योजनेतून ग्रामीण भागातील नागरिकांना रोजगार उपलब्ध करून दिला जात आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून राज्य शासनाने हाती घेतलेल्या नदीजोड प्रकल्पामुळे भविष्यात पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाययोजना होण्यास मदत होणार आहे. शासन, प्रशासन आणि नागरिकांनी एकत्रित प्रयत्न केल्यास दुष्काळी परिस्थितीवर मात करणे शक्य आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दुष्काळाच्या या संकटात सरकार सर्व पातळीवर काम करत असून दुष्काळ निवारणासाठी करण्यात येत असलेल्या



तातडीच्या आणि दीर्घकालीन उपाययोजनांमध्ये नागरिकांनीही सहभागी व्हावे. सरकार आणि समाजाने एकजुटीने काम केल्यास या संकटावर मात करण्यास, यातून बाहेर पडण्यास मदत होईल. या संकटकाळात आम्ही तुमच्यासोबत आहोत, अशा शब्दात माननीय राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी शेतकऱ्यांना धीर दिला.

लातूर जिल्ह्यात खरीप हंगामात सोयाबीनचे सर्वाधिक उत्पादन होते, मात्र यंदा अपुऱ्या पावसामुळे सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पिण्याच्या पाण्यासोबतच पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्नही निर्माण झाला आहे. या संकटकाळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी असून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळावी, पीक विमा भरपाई मिळावी, यासाठी पावले उचलली जात आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य शासन शेतकऱ्यांच्या सोबत खंबीरपणे उभे असून या संकटातून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी केंद्र व राज्य शासन पूर्ण ताकदीने प्रयत्न करण्यात येत आहेत, असे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले.

जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पातील गाळ उपसा करून जलसाठा वाढविण्यासह भूजल पुनर्भरणासाठीही प्रयत्न सुरु आहेत. दुष्काळाच्या संकटाचा सामना सर्वजण मिळून करूया. छत्रपती शिवाजी महाराज यांनी कितीही संकटे आली तरी खचून न जाता लढण्याची शिकवण दिली आहे, ही शिकवण लक्षात ठेवून या संकटाचा एकजुटीने करूया, एकमेकांना मदत करून या संकटावर मात करण्यासाठी प्रयत्न करूया. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य शासन आपल्या सोबत आहे, अशी ग्वाही पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी उपस्थित शेतकऱ्यांना दिली.

दुष्काळाची परिस्थिती जाणून घेण्यासाठी राज्यपाल महोदय स्वतः चाकूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या बांधावर आले, याबद्दल सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी आभार मानले. तसेच, यंदाचा दुष्काळ अधिक भीषण स्वरूपाचा असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या मार्गदर्शनात राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ठोस पावले उचलली आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेतून राज्यातील शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करण्यात आली आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही लवकरच प्रोत्साहन अनुदान दिले जाणार आहे. कर्जमुक्ती झालेल्या शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज देण्याचे निर्देश बँकांना दिले असल्याचे सहकार मंत्री श्री. पाटील यांनी सांगितले.

यंदा तीव्र पाण्याची टंचाई असून चारा टंचाईचे मोठे संकट निर्माण झाले आहे. पशुपालकांना चारा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करीत आहे. शेतकऱ्यांना सर्वोतोपरी मदत करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. तसेच अवैध सावकारीविरोधात कठोर पावले उचलली जात असल्याचे सहकारमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

लाभार्थ्यांना विविध योजनांच्या मंजुरी आदेशांचे वितरण

यावेळी राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते विविध शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांना मंजुरी आदेश, प्रमाणपत्रांचे व प्रत्यक्ष लाभाचे वितरण करण्यात आले. यामध्ये व्हीबी-जी राम जी योजना, चारा लागवडीसाठी जिल्हा वार्षिक योजनेतून बियाण्यांचे वाटप, ट्रॅक्टर, कडबाकुट्टी यंत्र, श्रावणबाळ निवृत्तीवेतन योजना मंजुरी पत्रे, अवैध सावकारीच्या कब्जातून मुक्त झालेल्या जमिनीचा सातबारा सुपूर्द करण्यात आला.

रोहयो मजुरांची आस्थेवाईकपणे विचारपूस

राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी नायगाव येथे व्हीबी- जी राम जी अंतर्गत सुरू असलेल्या पाणंद रस्त्याच्या कामाची पाहणी केली. यावेळी तिथे काम करणाऱ्या मजुरांची माननीय राज्यपाल यांनी आस्थेवाईकपणे विचारपूस केली. तसेच जिल्ह्यात व्हीबी-जी राम जी अंतर्गत रोजगार हमीची किती कामे सुरू आहेत, कोणकोणत्या कामांना प्राधान्य दिले जात आहे, याबाबत प्रशासनाकडून माहिती जाणून घेतली.

सोनिया गांधींच्या पुस्तकाच्या विटंबनेविरोधात लातुरात काँग्रेस आक्रमक; शिंदे गटाच्या प्रवक्त्यांच्या प्रतीकात्मक डोक्याची मडकी फोडून तीव्र निषेध

लातूर । प्रतिनिधी

काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी यांच्या जीवनप्रवासावरील पुस्तकाची विटंबना करत ते फाडल्याच्या निषेधार्थ आज लातूर शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेविरोधात जोरदार निदर्शने करण्यात आली. लातूर शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीचे प्रभारी डॉ. जितेंद्र देहाडे, जिल्हाध्यक्ष अभय साळुंके आणि शहर जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. शिवाजी जळगेकर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. सायंकाळच्या सुमारास लातूर शहरातील मुख्य रस्त्यावर काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने एकत्र जमले होते. आंदोलकांच्या हातात 'शिंदे सेनेचा जाहीर निषेध' असा ठळक मजकूर असलेला मोठा फलक होता. या वेळी कार्यकर्त्यांनी शिंदे गट आणि सरकारविरोधात तीव्र घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला, तर सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांच्या समर्थनार्थ घोषणा



दिल्या. निषेधाचे प्रतीक म्हणून शिंदे गटाच्या प्रवक्त्यांच्या 'रिकाम्या डोक्याचे' स्वरूप दाखवत रस्त्यावर मातीची मडकी आपटून फोडण्यात आली.

आंदोलनादरम्यान माध्यमांशी संवाद साधताना जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी शिंदे गटाच्या प्रवक्त्यांवर आणि नेतृत्वावर जोरदार टीका केली. त्यांनी असा आरोप केला की, सत्तेच्या आणि पैशाच्या धुंदीत आंधळ्या झालेल्या शिंदे गटाच्या प्रवक्त्यांनी सोनिया गांधी यांचे पुस्तक फाडून आपल्या आपल्या प्रवक्त्यांना वेळीच आवर घालण्याचा इशारा दिला. सोनिया गांधी यांच्याबद्दल बोलण्याची किंवा त्यांच्या पुस्तकाला हात लावण्याची या प्रवक्त्यांची पात्रता नसल्याचे सांगत, काँग्रेस हा आगीचा निखारा आहे, त्याला हात लावाल तर जळून खाक व्हाल, असा इशारा आंदोलकांनी दिला. भविष्यात काँग्रेस पक्षाच्या किंवा नेत्यांच्या विरोधात असे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत, अशी भूमिका या वेळी मांडण्यात आली.


या आंदोलनात महापालिकेचे काँग्रेस गटनेते विजयकुमार साबदे, ड.किरण जाधव,काँग्रेसचे प्रदेश सचिव डॉ. दिनेश नवगिरे, महादेव मस्के, आदमाने ताई, तबरेज तांबोळी फैजल कायमखानी, विकास कांबळे, बस्वराज धरणे, शाहिद पटेल, मारोती पांडे, आबासाहेब पाटील उजेडकर, प्रा.प्रविण कांबळे, विष्णुदास धायगुडे, ड.देविदास बोरुडे पाटील, रईस टाके, युनुस शेख यांच्यासह लातूर शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीचे प्रमुख पदाधिकारी आणि पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सरकारी घोषणेचा फुसका बॉम्ब दिवाळीत फुटला आणि तांत्रिक अडचणीच्या नावाखाली १२ हजार शेतकऱ्याचा आग्रिमचा लाभ अडकला

औसा । बी.डी. उबाळे

शेतकऱ्यांची दिवाळी गोड व्हावी, दुष्काळाच्या संकटात किमान पाच हजार रुपयांचा आर्थिक आधार मिळावा, यासाठी शासनाने मोठा गाजावाजा करीत अग्रीम मदतीची घोषणा जोरदार केली. दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा करण्याचे आश्वासनही दिले. मात्र, दिवाळी संपली, सणाचा गोडवा ओसरला; तरी औसा तालुक्यातील १२ हजार ११८ शेतकऱ्यांच्या खात्यात पाच हजार रुपयांचे अग्रीम पोहोचलेले नाही. त्यामुळे हजारो शेतकरी कुटुंबांना यंदाची दिवाळी गोडधोड विनाच साजरी करावी लागली. विशेष म्हणजे, काही शेतकऱ्यांकडे फार्मर आय डी असूनही अनुदान जमा झालेले नाही. शासनाच्या घोषणेचा लाभ प्रत्यक्षात पोहोचविण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणेनेच आता या वंचित शेतकऱ्यांना समजावण्याची वेळ आली आहे.

औसा तालुक्यातील सुमारे एक लाख सात हजार ५४ शेतकऱ्यांची यादी शासनस्तरावरून पोर्टलवर उपलब्ध झाली होती. त्यापैकी ९४ हजार ९३६ शेतकऱ्यांची माहिती अपलोड झाली असून उर्वरित १२ हजार ११८ शेतकऱ्यांची प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही. संयुक्त खातेदार, ॲग्रीस्टॅक फार्मर आयडीमधील तफावत आणि ई-केवायसी अशा कारणांमुळे ही प्रकरणे प्रलंबित असल्याचे तहसील कार्यालयाकडून सांगण्यात येत आहे.



अनुदान मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना ई-केवायसी, आधार-बँक खाते संलग्नता, जमिनीच्या नोंदीतील तफावत अशा अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. ग्रामीण भागात सर्व्हर डाऊन असणे, अंगठ्याचे ठसे न जुळणे, आधारला मोबाईल क्रमांक जोडलेला नसणे, ऑनलाइन नोंदीतील त्रुटी यामुळे शेतकरी महा-ई-सेवा केंद्रांपासून तहसील कार्यालयापर्यंत हेलपाटे मारत आहेत. मात्र, आपले अनुदान नेमके कोणत्या कारणाने अडकले आहे, याचे उत्तरही अनेकांना मिळत नाही.

विशेष म्हणजे, २८ ऑक्टोबरच्या शासन निर्णयात १ नोव्हेंबर २०२५ पासून शासकीय योजनांसाठी ई-केवायसी केलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा ई-केवायसीची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. फार्मर आयडी नसलेल्या वनपट्टाधारकांना ई-केवायसीच्या आधारे मदत देण्याची तरतूदही आहे. मग शासनाच्या निकषांनुसार पात्र असलेल्या शेतकऱ्यांची प्रकरणे नेमकी कुठे अडकली आहेत, याची तपासणी करण्याची गरज आहे. केवळ तांत्रिक अडचणींचा उल्लेख करून प्रशासनाला जबाबदारी झटकता येणार नाही.

तहसील कार्यालयातील लिपिक अंबादास यामजले यांनी सांगितले की, उर्वरित शेतकऱ्यांची माहिती अपलोड करण्याची प्रक्रिया सुरू आहे. संयुक्त खातेदार, ॲग्रीस्टॅक आणि ई-केवायसीमधील तफावतींमुळे काही प्रकरणे प्रलंबित आहेत. यापूर्वी पोर्टलवरून पैसे जमा न होण्याचे कारण पाहता येत होते; मात्र आता ती सुविधाही उपलब्ध नसल्याने नेमकी अडचण समजत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. वंचित शेतकऱ्यांच्या याद्या पूर्ण करून त्यांना लाभ मिळवून देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

दुसरीकडे, दिवाळीपूर्वी मदतीची अपेक्षा ठेवलेल्या शेतकऱ्यांच्या पदरी मात्र निराशाच पडली आहे. शासनाने मदतीसाठी निधीची तरतूद केली, पात्रतेचे निकष जाहीर केले; मग स्थानिक पातळीवर लाभार्थ्यांची प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी विशेष यंत्रणा का उभी राहिली नाही, हा प्रश्न अनुत्तरित आहे. शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा होईपर्यंत या प्रक्रियेचा पाठपुरावा कोण करणार, हेही स्पष्ट होणे आवश्यक आहे.

लोकसेवक आमदारांनीही लक्ष घालण्याची गरज

औसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार हे सत्ताधारी पक्षाचे भक्कमपणे सरकारचे प्रतिनिधित्व करतात. त्यामुळे तालुक्यातील १२ हजारांहून अधिक शेतकऱ्यांचा हा प्रश्न केवळ तहसील कार्यालयापुरता मर्यादित राहत नाही. महसूल, कृषी आणि जिल्हा प्रशासनाशी समन्वय साधून वंचित शेतकऱ्यांची गावनिहाय यादी तपासणे, अनुदान रखडण्याची कारणे स्पष्ट करून घेणे आणि शासनस्तरावर पाठपुरावा करणे, ही लोकप्रतिनिधी म्हणून त्यांच्या हस्तक्षेपाची महत्त्वाची वेळ आहे. घोषणा आणि प्रत्यक्ष लाभ यांच्यातील दरी कमी करण्यासाठी आमदारांनी पुढाकार घेऊन या शेतकऱ्यांना दिलासा मिळवून देणार का, हा औशातील शेतकऱ्यांचा प्रश्न आहे.

दापका येथे आनंद धुळगंडे यांचा सत्कार

उदगीर । पाटील मनेश

सीमा भागातील कमलनगर तालुक्यामधील दापका येथे सरकारी माध्यमिक विद्यालय शाळेचे माजी विद्यार्थी आनंद धुळगडे यांना पुणे येथे उघोगरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल शाळेतर्फे त्यांचा यथोचित सन्मान व सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष संजय बिरादार सर व प्रमुख अतिथी आनंद धुळगंडे, अनिल तरनरे हे होते. संतोष जाधव मनोगत व्यक्त करताना विद्यार्थी घडण्यासाठी स्पष्ट परिश्रम मेहनत एकत्र करून विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावे तर आपल्या जीवनात यशस्वी होऊ शकतो हे ज्वलंत उदाहरण हे आनंद आहे, असे स्पष्ट केले.

अंकुश वाडीकर ते बोलताना म्हणले, उद्योग रत्न प्राप्त साधी गोष्ट नाही त्याला अति परिश्रम करावे लागते. आनंद हे सकाळी आपल्या कंपनीत दहाला गेल्यानंतर रात्री दहा, बारा, तिन.. पर्यंत सुद्धा कामं करतो. पुण्यासारख्या



मेट्रो सिटीमध्ये जाऊन बारा वर्षांमध्ये स्वतःची कंपनी निर्माण करून सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक कार्यासाठी सरळ मताने, हाताने सहकार्य करणारा नवयुवक आहे. सामाजिक बांधिलकी जोपासणारा नवं युवक आहे. आनंदरावाचा आदर्श घेऊन आमच्या शाळेतील दहा विद्यार्थी व दहा विद्यार्थ्यांनी घडावे आणि प्रेरणा घ्यावी हाच आमच्या कार्यक्रमा मागचा उद्देश आहे. अर्चना शिंदे बोलताना प्रवास करत असताना महिलांना, लहान बाळ, जागा दिली जात नाही. पण आनंद हा शाळेला शैक्षणिक, विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी ९०% पेक्षा जास्त गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ५१ हजाराची रोख रक्कम पानिपत ठेवलेला आहे. गेल्या तीन वर्षापासून शाळेमध्ये प्रथम, व्दतीय विद्यार्थ्यांना योग्य तो पारितोषिक देणारा हा नवयुवक आहे. अशा सामाजिक कार्यात मदत करणारा मोजकेच समाज सुधारक असतात ते म्हणजे आनंद धुळगुंडे संजीव बिरादार यांनी आनंद हा प्रसिद्ध जाणीव ठेवून समाजकार्यात जो आपल्या उत्पन्नाचा खर्च करतो त्यांना कधीच कमी पडत नाही. मनाचा मोठेपणा असणारा हा युवक आहे. त्यांच्या प्रगतीचा विजयाचे पथक आणखी वाढू अशी त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिली. त्यावेळी शाळेचे सह शिक्षक मुख्तारकर सर, अतिथी शिक्षिका सौ. स्नेहा बिरादार, सौ ललिता कांबळे व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रेणापूर तालुक्यातील विविध प्रश्नांबाबत कोंडीराम काळे यांची महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी चर्चा

मुंबई । प्रतिनिधी

रेणापूर तालुक्यातील शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांचे महसूल विभागाशी निगडित विविध प्रलंबित प्रश्न मार्गी लागावेत, यासाठी शिवसेना तालुकाप्रमुख कोंडीराम काळे यांनी मुंबई येथे राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. या भेटीदरम्यान कोंडीराम काळे यांनी रेणापूर तालुक्यातील स्थानिक समस्या आणि प्रशासकीय कामांमध्ये येणाऱ्या अडचणी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिल्या. शेतकऱ्यांचे प्रश्न, महसूल कार्यालयातील प्रलंबित प्रकरणे तसेच विकासकामांशी संबंधित विषयांवर या बैठकीत चर्चा झाल्याचे सांगण्यात आले. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मांडण्यात आलेल्या मुद्द्यांवर सकारात्मक भूमिका घेत, आवश्यक त्या कार्यवाहीबाबत ग्वाही दिली.

महाराष्ट्र एपस्टीन फाइल्सया प्रस्तावित चित्रपटाच्या शीर्षकातून महाराष्ट्र हे नाव वगळा संभाजी ब्रिगेडची मागणी

उदगीर । पाटील मनेश

महाराष्ट्र एपस्टीन फाइल्स या प्रस्तावित चित्रपटाच्या शीर्षकातून महाराष्ट्र हे नाव वगळा संभाजी ब्रिगेडच्या वतीने आज उपजिल्हाधिकारी कार्यालय उदगीर मार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मुंबई देवेंद्र फडवणीस साहेब यांना संभाजी ब्रिगेडच्या लातूर जिल्हा कार्यकारणी तसेच उदगीर तालुका कार्यकारणीच्या वतीने निवेदन देण्यात आले. या चित्रपटाच्या शीर्षकातून 'महाराष्ट्र' हे नाव वगळले नाही तर तीव्र स्वरूपाचे



महाराष्ट्रभर संभाजी ब्रिगेडच्या वतीने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. सरकारने याची दखल गांभीर्याने घ्यावी असा इशारा सरकारला देण्यात आला आहे.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे लातूर जिल्हा अध्यक्ष शिवश्री राजकुमार माने, जिल्हा उपाध्यक्ष शिवश्री उत्तमराव फड, जिल्हा संघटक शिवश्री जनार्दन फड, तालुका अध्यक्ष शिवश्री विशाल कोठारे, तालुका उपाध्यक्ष शिवश्री मनेश पाटील, आटो युनियन चे अध्यक्ष शिवश्री मोबीन सय्यद, व्यापारी आघाडीचे शहराध्यक्ष शिवश्री निजाम शेख, शिवश्री उमाकांत कोठारे इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

दयानंद शिक्षण संस्थेच्या पुढाकाराने लातूरकरांना मोलाची संधी; ब्रह्माकुमारी शिवानी दीदी यांचा 'रिचार्ज युवर लाईफ' प्रवचन सोहळा उत्साहात संपन्न

मनाची ऊर्जा, सकारात्मक विचार आणि 'वसुधैव कुटुंबकम'च्या भावनेतून दहा हजार लातूरकरांना मार्गदर्शन

लातूर । प्रतिनिधी

लातूरकरांना वैचारिक व आध्यात्मिक समृद्धीची मोलाची संधी उपलब्ध करून देणाऱ्या दयानंद शिक्षण संस्थेच्या पुढाकाराचे सर्वत्र कौतुक होत आहे. संस्थेच्या भव्य प्रांगणात प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या सुप्रसिद्ध वक्त्या ब्रह्माकुमारी शिवानी दीदी यांचा 'रिचार्ज युवर लाईफ' हा प्रेरणादायी प्रवचन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. राजयोगी स्वर - उत्सव व कथक नृत्याने कार्यक्रमाची सुरूवात झाली.

आपल्या भाषणात शिवानी दीदी म्हणाल्या की, अंतर्मनातील प्रकाशात स्वतःकडे पाहता येणे आवश्यक असून, शरीर हे चैतन्य आत्म्याचे वस्त्र आहे. शांतता हाच आत्म्याचा मूळ संस्कार, स्वभाव आणि धर्म आहे. 'मी'पणातून बाहेर पडून 'हे विश्व माझे आहे' आणि 'वसुधैव कुटुंबकम' ही भावना प्रत्येकात रुजायला हवी. प्रत्येक आत्मा दिव्य असून, प्रकृती आणि आत्मा परस्परांच्या सोबतीने



चालतात. सकाळ, दुपार, संध्याकाळ, रात्रीचा अंधार तसेच सत्ययुग, त्रेतायुग, द्वापारयुग आणि कलियुग या प्रकृतीच्या विविध अवस्था आहेत. देहाभिमान वाढत असला तरी प्रकृती मूळतः सत्वप्रधान आहे, याची आत्मप्रचिती व्हायला हवी. प्रत्येकाने देण्याची वृत्ती जोपासत सद्गुणी वागावे आणि जीवनातील आत्मारूपी दिवा विझू देऊ नये.

अनावश्यक 'ओव्हर थिंकिंग' टाळण्याचे आवाहन करताना त्या म्हणाल्या की, सतत फोन स्क्रोल केल्याने मनाची गती वाढते आणि आत्मारूपी बॅटरी कमी होते; एका मिनिटाच्या व्हिडिओमुळेही मनाची चंचलता बदलते. आज लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण मोबाईल प्लिकेशन्सच्या प्रभावाखाली असून, मुले नजरेला नजर मिळवण्याऐवजी खाली मान घालून स्क्रीनशी बोलत आहेत व लिहिण्याऐवजी व्हॉइस टाईपिंग करत आहेत. अशा वेळी पालकांनी सकारात्मक भूमिका घेत मुलांना व स्वतःला मोबाईलच्या अतिवापरापासून दूर राहण्यास शिकवावे. घरातील कर्त्या व्यक्तीने प्रतिकूल परिस्थितीत ढाल बनावे. मनाला कोणतेही वय नसते; नैराश्य व वैफल्यावर चांगली झोप हा उपाय आहे. विचार, भाव-भावना, शब्द आणि व्यवहारातून कर्म घडते व त्यानुसार भाग्य बनते. आत्मा कर्म कधीच सोडत नाही; केवळ रूप, जन्म आणि नातेवाईक बदलतात, त्यामुळे श्रेष्ठकर्माचा मार्ग स्वीकारावा.

दृढ संकल्पातून सिद्धी होते आणि निसर्गही संकल्पाला साथ देतो, असे सांगत शिवानी दीदींनी स्वतःचा आनंद, निरोगी शरीर, चांगले नातेसंबंध, कर्म व भाग्य ओळखणे आणि परमेश्वराच्या आशीर्वादशक्तीशी एकरूप होण्याचा संकल्प करण्यास सांगितले. ज्याप्रमाणे आपण मोबाईल किंवा इतर उपकरणे चार्ज करतो, तसेच दररोज ध्यान व आत्मचिंतनातून मनाची पॉवरबँक रिचार्ज करणे काळाची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमासाठी लातूर जिल्ह्याचे खासदार शिवाजीराव काळगे, आमदार अमित देशमुख, उमरगा-लोहऱ्याचे आमदार प्रवीण स्वामी, लातूर मनपा आयुक्त श्रीमती जयश्री सोनकांबळे, दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष ललितभाई शहा, सचिव रमेश बियाणी, संयुक्त सचिव विशाल लाहोटी, सहाय्यक सचिव ड. श्रीकांत उटगे, सहाय्यक सचिव अजिंक्य सोनवणे, कोषाध्यक्ष संजय बोरा, लातूर ब्रह्माकुमारी सेवा केंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी नंदा दीदी, उपसंचालिका ब्रह्माकुमारी पुष्प दीदी, सर्व ब्रह्माकुमार-ब्रह्माकुमारी, दयानंद शिक्षण संस्थेचे सर्व नियामक सदस्य, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, कर्यालयीन कर्मचारी यांसह लातूरमधील सुमारे दहा हजार नागरिक उपस्थित होते.

पोदार स्कूलमध्ये बालदिन उत्साहात साजरा; शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी साकारला आनंदाचा सोहळा!

लातूर । संतोष सोनवणे

लातूर येथील कटपूर रोडवरील पोदार स्कूलमध्ये दिवाळीच्या सुट्टीनंतर गुरुवार, दि.१९ नोव्हेंबर रोजी बालदिन मोठ्या उत्साहात, आनंददायी वातावरणात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या विशेष कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन व सादरीकरण शाळेतील शिक्षकांनी केले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणारा हा सोहळा अविस्मरणीय ठरला. कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेच्या प्रवेशद्वारावर विद्यार्थ्यांचे पारंपरिक पद्धतीने औक्षण व टिळा लावून, मिठाई देऊन तसेच पुष्पवृष्टी करून उत्साहात स्वागत करण्यात आले. या अनोख्या स्वागतामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला आपलेपणाची आणि विशेष असल्याची जाणीव झाली.

यानंतर विशेष प्रार्थना सभेला सुरुवात



झाली. शिक्षिका नेहा आणि अमृता यांनी बालदिनाचे महत्त्व विशद केले. त्यानंतर शिक्षकांनी सुरेल प्रार्थनागीत सादर केले. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. शाळेच्या प्राचार्या सौ. रम्या डी. तुटिका यांनी विद्यार्थ्यांच्या उत्तम आरोग्यासाठी, उत्साहात स्वागत करण्यात आले. या उज्ज्वल भविष्यासाठी आणि यशस्वी वाटचालीसाठी प्रार्थना केली. यानंतर केक कापून बालदिनाचा आनंद द्विगुणित करण्यात आला. कार्यक्रमाच्या सांस्कृतिक सत्रात शिक्षकांनी विशेष कविता सादर केली. तसेच विद्यार्थ्यांसाठी सामान्यज्ञान प्रश्नमंजुषा आणि आदर्श विद्यार्थी या विषयावर प्रश्नोत्तरांचा रंजक उपक्रम घेण्यात आला. शिक्षकांनी सादर केलेल्या आकर्षक नृत्याविष्काराने विद्यार्थ्यांची मने जिंकली. शाळेतील दीदींचे विशेष सादरीकरण, विनोदी अंताक्षरी आणि शिक्षकांच्या मनोरंजक कलाविष्कारामुळे संपूर्ण सभागृह हास्य आणि टाळ्यांच्या गजराने दुमदुमून गेले.

विशेष सभेची सांगता झाल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याला प्रेमाची भेट म्हणून विशेष भेटवस्तू देण्यात आल्या. त्यानंतर शाळेच्या सभागृहात तसेच वर्गांमध्ये विविध मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले. संगीत खुर्ची, स्मरणशक्तीचा खेळ, चेंडूचा समतोल राखणे, डोळ्यांवर पट्टी बांधून खेळणे अशा विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या खेळांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंद, उत्साह आणि मैत्रीचे वातावरण निर्माण झाले.

या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन शाळेच्या आदरणीय प्राचार्या सौ. रम्या डी. तुटिका यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी प्रशासन अधिकारी संतोष भटलांढे, समन्वयिका सौ. अमृता राजुरे, सौ. ममता शर्मा तसेच पोदार स्कूल परिवारातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या आनंदाला प्राधान्य देत शिक्षकांनी स्वतः विविध कलागुणांचे सादरीकरण करून बालदिनाचा सोहळा अधिक संस्मरणीय केला. आनंद, उत्साह, प्रेम आणि आपुलकीच्या वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या मनात बालदिनाच्या सुंदर आठवणी कायमच्या कोरल्या गेल्या.

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

मकसूद पटेल
जिल्हा प्रतिनिधी ९७६७७८५८५५

शेख मौला शेख उस्मान
उपसंपादक ९७६६६६४९४९

PRGI.No.- MHMAR/26/A0270

नांदेड जिल्हा आवृत्ती — शुक्रवार दि.२० नोव्हेंबर २०२६ — पान नं. ५

हिंगोली जिल्ह्याच्या दुष्काळग्रस्त जनतेला सर्वतोपरी मदतीचा शब्द!

कळमनुरी । गंगासागर पंडित

हिंगोली जिल्ह्यात निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती, शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या वाढत्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी जिल्हाध्यक्ष बी. डी. बांगर यांनी मुंबई येथे उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांची भेट घेऊन हिंगोली जिल्ह्याच्या वतीने सविस्तर निवेदन सादर केले.



यावेळी जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकरी, शेतमजूर तसेच सर्वसामान्य नागरिकांना संकटातून दिलासा मिळावा, यासाठी शासनाच्या माध्यमातून आवश्यक त्या उपाययोजना व मदत करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. दुष्काळामुळे शेतकऱ्यांसमोर निर्माण झालेल्या विविध अडचणींबाबतही उपमुख्यमंत्र्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली.

हिंगोली जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची दखल घेत सुनेत्राताई पवार यांनी जिल्ह्याला सर्वतोपरी मदत करण्याबाबत सकारात्मक आश्वासन दिले, अशी माहिती बी. डी. बांगर यांनी दिली.

दुष्काळाच्या संकटात शेतकरी बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हीच सामाजिक बांधिलकी असून, हिंगोली जिल्ह्यातील जनतेच्या हितासाठी सातत्याने प्रयत्न सुरू राहतील, असेही यावेळी सांगण्यात आले.

नांदेड-हिंगोली महामार्गावर दुचाकीचा गंभीर अपघात; झोपेची डुलकी लागल्याने पाईपमध्ये घुसली दुचाकी

कळमनुरी । गंगासागर पंडित

कळमनुरी ते आखाडा बाळापूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ वर जरोडा पाटीजवळ गुरुवारी (दि.१९ नोव्हेंबर) दुपारी १ वाजण्याच्या सुमारास दुचाकीचा गंभीर अपघात झाला. हिंगोलीहून नांदेडच्या दिशेने टायर घेऊन जाणारी दुचाकी रस्त्याच्या बाजूला असलेल्या पाणीपुरवठ्याच्या पाईपमध्ये घुसल्याने दुचाकीवरील दोन्ही तरुण गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले.

मिळालेल्या माहितीनुसार, मोटारसायकल क्रमांक एमएच २९ बीआर ७५२१ वरून यश राम आडे (वय २०) आणि आदित्य लक्ष्मण आडे (वय २१) हे दोघेही रा. कृष्णापूर, ता. उमरखेड, जि. यवतमाळ येथील रहिवासी हिंगोलीकडून नांदेडच्या दिशेने जात होते. मोटारसायकलवर टायर घेऊन जात असताना जरोडा पाटीजवळ चालक यश आडे याला झोपेची डुलकी लागली. त्यामुळे दुचाकीवरील नियंत्रण सुटून ती रस्त्याच्या बाजूला असलेल्या पाणीपुरवठ्याच्या पाईपमध्ये जाऊन घुसली.

या अपघातात दुचाकी चालक यश राम आडे यांच्या पोटाला, नाकाला व तोंडाला गंभीर दुखापत झाली. तर मागे बसलेले आदित्य लक्ष्मण आडे यांच्या डाव्या पायाला फ्रॅक्चर झाले. अपघातानंतर दोघेही जखमी अवस्थेत रस्त्यावर पडले होते. अपघाताची माहिती दुपारी १ वाजता महामार्ग पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच गजानन ढाले, संदीप घुगे आणि गजानन आगलावे हे तातडीने घटनास्थळी रवाना झाले. अवघ्या काही मिनिटांत पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून जखमींची स्थिती पाहून त्यांना तातडीने रुग्णालयात हलविण्याची व्यवस्था केली.

NH-161 जरोडा टोलच्या रुग्णवाहिकेने दोन्ही जखमींना पुढील उपचारासाठी आखाडा बाळापूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय उपचारानंतर गंभीर दुखापत लक्षात घेता पुढील उपचारासाठी त्यांना नांदेड येथे हलविण्यात आले. दरम्यान, अपघातानंतर महामार्गावरील वाहतूक काही काळ प्रभावित होण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र महामार्ग पोलिसांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून आवश्यक कार्यवाही केल्याने वाहतूक सुरळीत सुरू राहिली.

अपघाताची माहिती मिळाल्यानंतर अवघ्या काही मिनिटांत महामार्ग पोलीस घटनास्थळी पोहोचले. १ वाजता माहिती मिळाल्यानंतर १ वाजताच पोलीस घटनास्थळी रवाना झाले आणि घटनास्थळी पोहोचून २ वाजेपर्यंत प्राथमिक कार्यवाही पूर्ण केली. महामार्ग पोलिसांच्या या तत्परतेमुळे जखमींना वेळेत वैद्यकीय मदत मिळाली. या घटनेनंतर महामार्गावर वाहन चालविताना चालकांनी विशेष काळजी घेण्याची गरज अधोरेखित झाली आहे. विशेषतः झोप किंवा थकवा जाणवत असल्यास वाहन चालवू नये, असे आवाहन करण्यात येत आहे.





दुष्काळात शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेले पीक; मात्र वीजपुरवठ्याच्या हलगर्जीपणामुळे शेतकरी त्रस्त

आखाडा बा. । प्रतिनिधी

दुष्काळी परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना दिलासा मिळावा म्हणून सरकारने कृषी पंपांसाठी दिवसा आठ तास वीजपुरवठा देण्याचे नियोजन केले आहे. मात्र, प्रत्यक्षात महावितरणच्या कर्मचाऱ्यांकडून दिवसभरात केवळ दोन ते तीन तासच वीजपुरवठा होत असल्याने शेतकरी प्रचंड त्रस्त झाले आहेत. सध्या कॅनलला पाणी आलेले असतानाही वीजपुरवठ्याचा हा खेळ सुरू असल्याने शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेली हळद, तूर यांसारखी पिके धोक्यात आली आहेत.



शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, परिसरातील अनेक ठिकाणी वीजवाहिन्यांवरील तारा तुटलेल्या, खराब झालेल्या किंवा जळालेल्या आहेत. काही ठिकाणी तांत्रिक बिघाड निर्माण झालेले असतानाही संबंधित कर्मचारी त्याकडे गांभीर्याने लक्ष देत नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. वीजपुरवठ्याबाबत अडचण निर्माण झाल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यांना फोन केला असता अनेक वेळा फोन न उचलणे किंवा फोन बंद ठेवणे, असा अनुभव शेतकऱ्यांना येत असल्याचे सांगण्यात येत आहे.


सरकारने दिवसा आठ तास वीज देण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारकडून वीज उपलब्ध असतानाही स्थानिक पातळीवर कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे शेतकऱ्यांना पूर्ण वीज मिळत नाही. त्यामुळे सरकारची बदनामी होत आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया शेतकरी व्यक्त करत आहेत. कॅनलला सध्या पाणी आलेले असताना वीजपुरवठा सुरळीत मिळाला तर शेतकऱ्यांना पिकांना पाणी देता येणार आहे. मात्र, कॅनलचे पाणी निघून गेल्यानंतर वीजपुरवठा सुरळीत करण्याचा प्रकार झाला तर त्याचा उपयोग काय, असा सवालही शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे.

शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेले हळद, तूर आणि इतर पिके वाचविण्यासाठी तातडीने वीजपुरवठा सुरळीत करावा, खराब तारा व जळालेले साहित्य त्वरित दुरुस्त करावे आणि शेतकऱ्यांचे फोन न उचलणाऱ्या कर्मचाऱ्यांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कारवाई करावी, अशी मागणी गजानन बोंढारे पाटील यांनी केली आहे. शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत पाहू नका. वेळेत वीजपुरवठा सुरळीत झाला नाही तर शेतकरी आपल्या हक्कासाठी आवाज उठवतील, असा इशाराही भाजपा शहराध्यक्ष गजानन बोंढारे पाटील यांनी दिला.

प्रा.विट्ठल जंबाले यांची दयानंदच्या अभ्यास मंडळ सदस्यपदी नियुक्ती

देगलूर । अजीम अन्सारी

अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील मराठी विभाग व संशोधन केंद्रप्रमुख प्रा.डॉ.विठ्ठल एच.जंबाले यांची दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर (स्वायत्त)च्या मराठी विषयाच्या अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कुलगुरू यांचे प्रतिनिधी म्हणून नऋऊ विनियम, २०२३ नुसार प्रस्तुत नियुक्ती करण्यात आली आहे.



ही नियुक्ती झाल्याबद्दल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर, उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार, सचिव डॉ. कर्मवीर उनग्रतवार, सहसचिव राजकुमार महाजन, कोषाध्यक्ष विलास तोटावार यांच्यासह संस्थेच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य सूर्यकांत नारलावार, देवेंद्र मोतेवार, गंगाधरराव जोशी, रवींद्रअप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, गुरुराज चिद्रावार, विजय उनग्रतवार, सुभाषराव सांगवीकर यांच्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार, उपप्राचार्य डॉ. एम.एम. चमकुडे, उपप्राचार्य डॉ. व्ही.जी. शेरीकर, पर्यवेक्षक संग्राम पाटील, हिंदी विभागप्रमुख डॉ.संतोष येरावार, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी व सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी आभिनंदन केले आहे.

३३ के.व्ही. उपकेंद्राची क्षमता वाढवा, अन्यथा नवीन उपकेंद्र मंजूर करा

शेतकऱ्यांच्या वीज समस्येवर बालाजी शिंदे यांचे अधीक्षक अभियंत्यांना निवेदन

कुंडलवाडी । प्रतिनिधी

कुंडलवाडी येथील ३३ के.व्ही. वीज उपकेंद्राची क्षमता तातडीने वाढविण्यात यावी,किंवा परिसरातील वाढता वीजभार लक्षात घेता नवीन वीज उपकेंद्र मंजूर करण्यात यावे,अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील शिंदे यांनी विद्युत वितरण कार्यालयाचे जिल्हा अधीक्षक अभियंता यांना निवेदनाद्वारे केली आहे.



मागील २५ वर्षांपासून कुंडलवाडी येथील ३३ के.व्ही.उपकेंद्राची क्षमता जैसे थे आहे. मात्र, या उपकेंद्रावरून परिसरातील २४ पेक्षा अधिक गावांमधील शेतीपंपांना वीजपुरवठा केला जातो. गेल्या २५ वर्षांत परिसरात मोठ्या प्रमाणात नवीन बोअरवेल खोदण्यात आल्या, विहिरींची संख्या वाढली आणि शेतीपंपांची संख्याही वाढली. मात्र, वाढत्या विजेच्या मागणीनुसार उपकेंद्राची क्षमता वाढविण्यात आलेली नाही.

त्यामुळे सध्या या परिसरातील शेतकऱ्यांना शेतीसाठी मिळणारा आठ तासांचा वीजपुरवठाही सुरळीत मिळत नाही. उपकेंद्रावर क्षमतेपेक्षा अधिक वीजभार असल्याने वारंवार वीजपुरवठा खंडित होणे, वीज ट्रिप होणे अशा समस्यांना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत आहे. विशेष म्हणजे परिसरात पाण्याची पातळी समाधानकारक असतानाही विजेच्या समस्येमुळे अनेक शेतकऱ्यांना वेळेत पेरणी करता आलेली नाही. परिणामी शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असून शेतीच्या कामांवरही विपरीत परिणाम होत आहे.

या गंभीर समस्येची दखल घेऊन कुंडलवाडी परिसरातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ३३ के.व्ही. उपकेंद्राची क्षमता तातडीने वाढवावी किंवा स्वतंत्र नवीन वीज उपकेंद्राला लवकरात लवकर मंजुरी द्यावी. तसेच शेतीपंपांचा वीजपुरवठा सुरळीत करून वारंवार होणारे वीज ट्रिपिंग थांबवावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस नेताजी दादा भोसले यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

शेत रस्त्याचा तिढा अखेर सुटला; हिवरा येथील दोन शेतकऱ्यांचा सामंजस्याने १२ फुटी रस्त्यासाठी पुढाकार

कळमनुरी तालुक्यातील हिवरा येथील महसूल अधिकाऱ्यांसह पंचांच्या उपस्थितीत तडजोड; संदीप लोणे व कपिल लोणे यांची शेतरस्त्यासाठी संमती

कळमनुरी । गंगासागर पंडित

शेतात ये-जा करण्यासाठी रस्त्याचा प्रश्न अनेकदा शेतकऱ्यांमध्ये वादाचे कारण ठरत असतो. मात्र, सामंजस्य आणि परस्पर सहकार्याच्या माध्यमातून हा प्रश्न मार्गी लावण्याचा आदर्श मौजे हिवरा येथील दोन शेतकऱ्यांनी घालून दिला आहे.



मौजे हिवरा येथील रहिवासी संदीप श्रीरंग लोणे आणि कपिल देवराव लोणे हे मौजे कृष्णापूर येथील गट क्रमांक १३ मधील शेतकरी आहेत. त्यांच्या शेतातून ये-जा करण्यासाठी मायनर कॅनॉल लगत १२ फूट रुंदीचा रस्ता उपलब्ध करून देण्याबाबत दोन्ही शेतकऱ्यांमध्ये चर्चा झाली. त्यानंतर संदीप लोणे आणि कपिल लोणे यांनी परस्पर संमतीने रस्त्यासाठी प्रत्येकी १२ फुटांची जमीन मोकळी करून देण्यास सहमती दर्शविली.

ही तडजोड पंचांच्या साक्षीने करण्यात आली. यावेळी नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी, गावातील प्रतिष्ठित नागरिक तसेच संबंधित शेतकरी उपस्थित होते. प्रशासकीय अधिकारी आणि पंचांच्या उपस्थितीत झालेल्या या सामंजस्यपूर्ण निर्णयामुळे शेतकऱ्यांच्या ये-जा करण्याचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होणार आहे. परस्पर सहकार्याने वाद टाळून प्रश्न सोडविण्याचा हा उपक्रम परिसरात चर्चेचा विषय ठरत आहे.

निवघ्याच्या कार्तिक यात्रेत माणुसकीच्या नात्यांचा जागर!

१३७ वर्षांची भक्तिपरंपरा कायम; माहेरवाशिणींसाठी यात्रेची दुसरी दिवाळी, सर्वधर्मीयांच्या एकोप्याचा अनोखा आदर्श

मुदखेड । प्रतिनिधी

काळाच्या ओघात धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांचे स्वरूप बदलत असताना मुदखेड तालुक्यातील निवघा गावाने मात्र १३७ वर्षांची ऐतिहासिक भक्तिपरंपरा आजही श्रद्धेने जपली आहे. श्री महारुद्र दक्षिणमुखी हनुमान आणि विठ्ठल-रुक्मिणी देवस्थानाच्या सान्निध्यात साजरा होणारा कार्तिक महोत्सव भक्तीबरोबरच सामाजिक एकोपा आणि सर्वधर्मसमभावाचे प्रतीक ठरत आहे. पूर्वजांनी सुरू केलेली ही परंपरा गावातील युवक आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने आजही उत्साहात पुढे सुरू आहे.



जात-धर्माचे भेद बाजूला ठेवून विविध समाजांतील नागरिकांचा या महोत्सवातील सहभाग हे निवघा गावाचे विशेष वैशिष्ट्य आहे.

कार्तिक यात्रा म्हणजे निवघातील माहेरवाशिणींसाठी जणू दुसरी दिवाळीच! सासर कितीही दूर असले, तरी माहेरच्या मातीची ओढ त्यांना या यात्रेच्या निमित्ताने गावाकडे घेऊन येते. माहेरचे देवस्थान, आप्तस्वकीय आणि गावातील आठवणींशी असलेले भावनिक नाते या यात्रेतून पुन्हा अनुभवायला मिळते. यासोबतच ग्रामस्थांनी सुमारे दोन कोटी रुपये खर्चून भव्य सभामंडप उभारला असून, सर्व धर्मांतील कुटुंबांना नाममात्र शुल्कात विवाह सोहळे आयोजित करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. गावातील कोणत्याही समाजाचा धार्मिक, कौटुंबिक अथवा सामाजिक कार्यक्रम असला, तरी सर्व ग्रामस्थ एकत्र येतात. सामूहिक चुलीवर भोजन तयार करून एकत्र भोजन करण्याची परंपराही येथे जपली जाते.

१३७ वर्षांपासून सुरू असलेला हा कार्तिक महोत्सव केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि माणुसकीचा संदेश देणारा वारसा ठरला आहे. माहेरवाशिणींचा उत्स्फूर्त सहभाग, सर्वधर्मीयांचा एकोपा आणि सामाजिक उपक्रमांमधील ग्रामस्थांची एकजूट यामुळे निवघा गावाने एकात्मतेचा अनोखा आदर्श निर्माण केला आहे. धर्म वेगळे असले तरी माणुसकीचे नाते एकच असते, हा संदेश निवघ्याच्या कार्तिक महोत्सवातून समाजासमोर अधोरेखित होत आहे.

बिलोलीला हवे हक्काचे क्रिकेट मैदान युवा खेळाडूंची मागणी

कुंडलवाडी । प्रतीनिधी

ग्रामीण भागात क्रिकेट खेळाची आवड दिवसेंदिवस वाढत असून अनेक होतकरू खेळाडू आपले कौशल्य सिद्ध करण्यासाठी मेहनत घेत आहेत. मात्र बिलोली शहरात हक्काचे आणि दर्जेदार क्रिकेट मैदान उपलब्ध नसल्यामुळे या खेळाडूंच्या भवितव्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शहरातील अनेक तरुणांमध्ये क्रिकेटची प्रचंड आवड आहे. काही खेळाडूंमध्ये जिल्हा, राज्य तसेच आय.पी.एल स्तरावर खेळण्याची क्षमता असूनही सरावासाठी योग्य मैदान उपलब्ध नसल्याने त्यांच्या प्रतिभेला वाव मिळत नाही. मैदानाअभावी खेळाडूंना आखूड मर्यादित मैदानावर सराव करावा लागत आहे. यामुळे खेळाडूंच्या सरावावर मर्यादा येत असून त्यांच्या प्रगतीत अडथळे निर्माण होत आहेत.

आज क्रिकेटमध्ये ग्रामीण भागातील खेळाडूही मोठी कामगिरी करत आहेत. मात्र त्यासाठी योग्य सुविधा नियमित सराव आणि चांगले मैदान असणे अत्यंत आवश्यक आहे. काही दिवसांपूर्वी उत्कृष्ट असे नियोजन करून मॉर्निंग क्रिकेट क्लब बिलोलीच्या खेळाडूंनी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले होते. त्यात सहभागी संघांनी आयोजन उत्कृष्ट पण मैदान आखूड अन मर्यादित असल्याची खंत व्यक्त केली. केवळ स्पर्धांचे आयोजन करून चालणार नाही तर खेळाडूंना वर्षभर सराव करता येईल असे मैदान उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी, नगर परिषद प्रशासन आणि संबंधित क्रीडा विभागाने या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देऊन बिलोली शहरात अद्ययावत क्रिकेट मैदान उभारण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी क्रिकेटप्रेमी व युवा खेळाडूंकडून होत आहे. आज मैदान नाही म्हणून उद्याचा एखादा प्रतिभावान क्रिकेटपटू घडण्यापासून वंचित राहू नये. खेळाडूंना संधी द्या मैदान उपलब्ध करून द्या कारण मैदान असेल तरच खेळाडूंचे स्वप्न साकार होईल.

रक्ताचे नाते नसतानाही जपली माणुसकी; संतोष अमीलकंटवार यांच्या मध्यरात्रीच्या रक्तदानाने वाचला एका निष्पाप जीवाचा प्राण!

नांदेड । प्रतिनिधी

रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान हे केवळ वाक्य नसून, ती कृतीतून सिद्ध करण्याची गोष्ट असते. याचाच प्रत्यक्ष प्रत्यय नांदेडकरांना नुकताच आला, एका दुर्दैवी अपघातात अंगावर स्लॅब कोसळून एक व्यक्ती गंभीर जखमी झाली होती. मृत्यूशी झुंज देणाऱ्या या रुग्णाचे प्राण वाचवण्यासाठी अत्यंत दुर्मीळ अशा 'ओ निगेटिव्ह' रक्तगटाची तातडीने गरज होती, रात्रीची वेळ, सर्वत्र शांतता असताना रुग्णाच्या नातेवाईकांची रक्तासाठी धावपळ सुरू होती. ही आर्त हाक आमचे मोठे बंधू, मार्गदर्शक आणि पालकमंत्र्यांच्या हस्ते 'नांदेड उद्योगरत्न' पुरस्काराने सन्मानीत संतोषभाऊ अमीलकंटवार यांच्यापर्यंत पोहोचली.



संतोषभाऊ हे सामाजिक बांधिलकी जपणारे संवेदनशील व्यक्तिमत्त्व आहेत. समोरच्याचा जीव संकटात आहे हे कळताच, त्यांनी रात्रीच्या ११.३० वाजता क्षणाचाही विलंब न लावता थेट नांदेड ब्लड सेंटर (नांदेड ब्लड बँक) गाठले. स्वतःचा थकवा आणि रात्रीची वेळ बाजूला सारून त्यांनी तात्काळ रक्तदान केले आणि एका गरजू व्यक्तीला जीवनदान दिले. या प्रसंगी त्यांच्या सोबतत्यांची लहानगी मुलगी आणि सहकारीही उपस्थित होते, जेणेकरून पुढच्या पिढीवरही समाज सेवेचे हे संस्कार रुजावेत, संतोषभाऊंचा हा 'उद्योगरत्न' पुरस्कार खऱ्या अर्थाने त्यांच्या या 'माणुसकीच्या रत्नगुणामुळे' अधिकच उजळून निघाला आहे. 'ओ निगेटिव्ह' सारखा दुर्मीळ रक्तगट वेळेत उपलब्ध झाल्याने एका कुटुंबाचा आधार वाचला आहे.

आपणही पुढे येऊया, जीवनदाते होऊया!

आज संतोषभाऊंनी वेळेची पर्वा न करता दाखवलेली ही तत्परता आपल्या सर्वांसाठी एक मोठा आदर्श आहे. अपघात, शस्त्रक्रिया किंवा थॅलेसेमिया सारख्या आजारांशी लढणाऱ्या अनेक रुग्णांना दररोज रक्ताची नितांत गरज भासते. रक्त कारखान्यात तयार होत नाही, ते केवळ एका माणसाच्या दुसऱ्या माणसा प्रती असलेल्या प्रेमातूनच उपलब्ध होऊ शकते. तुमचे एक वेळचे रक्तदान किमान चार जणांचे प्राण वाचवू शकते रक्तदानामुळे शरीरावर कोणताही दुष्परिणाम होत नाही, उलट नवीन रक्तपेशी तयार होऊन आरोग्य अधिक उत्तम राहते. संकटाच्या काळात कोणाच्या तरी आयुष्यात देवदूत बनण्याची संधी रक्तदानातून मिळते.

संतोषभाऊ अमिलकंठवार यांच्या या प्रेरणादायी कृतीतून ऊर्जा घेऊया, जात, पात, धर्म आणि वेळेच्या पलीकडे जाऊन आपण सर्वांनीही पुढे येऊन नियमित रक्तदान करण्याचा संकल्प करूया! कारण, कोणाच्या तरी रगात वाहणारे आपले रक्त, हेच खऱ्या अर्थाने जिवंतपणाचे आणि माणुसकीचे लक्षण आहे.

मटका जुगारावर पोलिसांचा छापा; ७४० रुपयांची रोकड व साहित्य जप्त

कळमनुरी । गंगासागर पंडित

कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर पोलीस स्टेशन अंतर्गत वारंगा फाटा परिसरात मटका जुगारावर कारवाई करत एका व्यक्तीस ताब्यात घेतले. या कारवाईत आरोपीकडून ७४० रुपये रोख रक्कम तसेच मटका जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले आहे. याप्रकरणी आखाडा बाळापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.१८ नोव्हेंबर रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास वारंगा फाटा येथील ही कारवाई करण्यात आली. आरोपी दिनेश मनोहर जिनेवाड रा.वारंगा, हा कल्याण नावाचा मटका जुगार चालवित असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी कारवाई केली असता आरोपीच्या ताब्यातून ७४० रुपये रोख रक्कम मिळून आली आहे. तसेच कल्याण नावाचा मटका जुगाराचे आकडे लिहिलेली डायरी असा मुद्देमालही पोलिसांनी जप्त केला. या प्रकरणी फिर्यादी हरीभाऊ सखाराम गुंजकर पोलीस गुन्हे शाखा, हिंगोली यांच्या तक्रारीवरून आरोपी दिनेश जिनेवाड याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास जमादार बालाजी जोगदंड हे करत आहेत.

दैनिक जगमित्र दि.१९/११/२०२६

CHANGE OF NAME

I, MOHAMMAD FAROOQ AHMED, have changed my name to **MOHD FAROOQ AHMED MOHD SHARIFF** and shall hereafter be known by my new name, **MOHD FAROOQ AHMED MOHD SHARIFF**, for all purpose

जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, ९-२-३४६, बिलाल नगर, देगलूर नाका, इतवारा, नांदेड महाराष्ट्र ४३१६०४ येथे प्रकाशित केले. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.* पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील. Email:-jagmitra2010@gmail.com

PRGI.No.- MHMAR/26/A0270

Jagmitra, this newspaper, is printed, published, owned, and edited by Balasaheb Jijaram Kadbane at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vai., Taluka Parli Vai., District Beed (Maharashtra) and published from the Daily Jagmitra office, 9-2-346, Bilal Nagar, Deglur Naka, Itwara, Nanded, MAHARASHTRA - 431604. (The editor may not necessarily agree with the content and news in the daily newspaper. *According to the PRB Act, the responsibility for selecting the content rests with them.) Email:-jagmitra2010@gmail.com

PRGI.No.- MHMAR/26/A0270

20 Nov 2026_Layout 1 11/19/2026 11:26 PM Page 2

केजमध्ये वंचितचा एल्गार! संविधान सन्मान महासभेसाठी पूर्व तयारी साठी संवाद दौरा संपन्न

बीड/प्रतिनिधी

संविधान सन्मान महासभेच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडी, बीड पूर्व विभागाने संघटनात्मक बांधणीसाठी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. याचाच एक भाग म्हणून बुधवार, दि. १८ नोव्हेंबर रोजी केज येथील शासकीय विश्रामगृहात जिल्हा कार्यकारिणी संवाद दौऱ्याअंतर्गत महत्त्वपूर्ण बैठक उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या बैठकीत संघटन विस्तारासह आगामी राजकीय वाटचालीची दिशा निश्चित करण्यावर भर देण्यात आला. केवळ निवडणुकीपुरते नव्हे, तर गावागावांत चळवळीचे संघटन उभे करण्याचा निर्धार!

बैठकीत संविधान सन्मान महासभेचे नियोजन, तालुका व गावपातळीवरील संघटन मजबूत करणे, नव्या कार्यकर्त्यांना चळवळीत सामावून घेणे, आजी-माजी पदाधिकाऱ्यांमधील समन्वय वाढविणे आणि वंचित, शोषित, पीडित, कष्टकरी व बहुजन समाजाच्या प्रश्नांवर आक्रमकपणे आवाज उठविण्याबाबत सविस्तर चर्चा झाली.

प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान देण्यासाठी संघटनात्मक ताकद उभी करणार!

वंचित बहुजन आघाडीचे नवनिर्वाचित बीड पूर्व जिल्हाध्यक्ष प्रकाश उजगरे यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात संवाद दौऱ्याच्या माध्यमातून संघटन बांधणीला गती देण्यात येत आहे. केवळ पदांची रचना करून थांबायचे नाही, तर प्रत्येक गावात कार्यकर्त्यांची फळी निर्माण करून वंचितांच्या हक्कासाठी संघर्ष करणारे सक्षम संघटन उभे करायचे, असा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

संविधानिक मूल्ये, समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा विचार समाजाच्या शेवटच्या



घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी सक्रिय व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

या बैठकीस वंचित बहुजन आघाडीचे बीड पूर्व जिल्हाध्यक्ष प्रकाश उजगरे, जिल्हा युवा अध्यक्ष बाबुराव मस्के, जिल्हा महासचिव प्रशांत उघडे, जिल्हा उपाध्यक्ष रजाक सय्यद, जिल्हा संघटक भारत तांगडे, जिल्हा कार्यकारिणी सदस्य राणबा उजगरे, प्रसन्नजित रोडे, प्रसिद्धीप्रमुख बालासाहेब जगतकर, युवा जिल्हा सचिव लक्ष्मण ओव्हाळ, केज तालुक्यातील ज्येष्ठ नेते लिंबराज गायकवाड, प्रदीप गायकवाड, रोहन जोगदंड, प्रवीण मस्के, उमेश कांबळे, शरद धिवार, अमोल हजारे, गणेश गायकवाड, सचिन गायकवाड, संतोष ठोके, बाबासाहेब मस्के यांच्यासह आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बियाणे मिनीकिट्ससाठी ऑनलाईन नोंदणी करावी

बीड/जिमाका

बीड जिल्ह्यातील यंदाची भीषण दुष्काळजन्य परिस्थिती आणि कमी पर्जन्यमान लक्षात घेता राज्य शासनाकडून रब्बी हंगामात शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी जिल्ह्यासाठी २० हजार रब्बी ज्वारी बियाणे मिनीकिट्सची विशेष तरतूद करण्यात आली आहे. तरी इच्छुक शेतकऱ्यांनी विहित वेळेत महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांनी केले आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियानांतर्गत पौष्टिक तृणधान्य पिकांना प्रोत्साहन देण्यासाठी सुधारित रब्बी ज्वारी बियाणे मिनीकिट वितरण योजना राबविण्यात येत आहे. कमी पाण्यात चांगले उत्पादन देणारे आणि प्रतिकूल हवामान परिस्थितीत तग धरणारे सुधारित ज्वारी वाण शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. शेतकऱ्यांना देण्यात येणारे हे बियाणे मिनीकिट ४ किलोग्रॅम वजनाचे असेल. यामध्ये प्रक्रिया केलेले सुधारित ज्वारीचे बियाणे, जैविक खताची पाकिटे आणि पीक लागवड विषयक तांत्रिक माहितीपत्रक यांसारख्या आवश्यक बाबींचा समावेश करण्यात आला आहे. अर्ज करण्यासाठी शेतकऱ्यांनी महाडीबीटीच्या अधिकृत संकेतस्थळावरील maharashtra.gov.in फार्मर लॉगिनचा वापर करावा. या योजनेतील लाभार्थी शेतकऱ्यांची निवड महाडीबीटी पोर्टलद्वारे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर केली जाणार आहे. योजनेबाबत सविस्तर माहिती हवी असल्यास शेतकऱ्यांनी महाराष्ट्र राज्य कृषी विभागाच्या अधिकृत संकेतस्थळाला krishi.maharashtra.gov.in भेट द्यावी. तसेच आपल्या गावातील संबंधित सहाय्यक कृषी अधिकारी, उपकृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही कृषी विभागाने प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

राजकीय मानपानासाठी अहिल्यादेवींच्या स्मारकाचा वापर करू नका!

आ.बालाजी कल्याणकर यांना महेंद्र देमगुंडे यांचा इशारा

नांदेड/प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याच्या लोकार्पण सोहळ्यावरून सुरू असलेले राजकीय मानपानाचे राजकारण अत्यंत दुर्दैवी आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निमंत्रण दिले नाही तर उद्घाटन कार्यक्रमात गोंधळ घालण्याची भूमिका आमदार बालाजी कल्याणकर घेत असल्याच्या चर्चेने धनगर समाजात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या प्रकाराचा निषेध करत मौर्य प्रतिष्ठानचे सचिव महेंद्र देमगुंडे यांनी आमदार बालाजी कल्याणकर यांना परखड इशारा दिला आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निमंत्रण द्या, एवढेच नव्हे तर आणखी कोणाला निमंत्रित करायचे असेल, कोणत्याही नेत्याला किंवा मान्यवराला बोलवायचे असेल तर जरूर बोलवा. धनगर समाजाचा त्याला अजिबात विरोध नाही. तुम्हाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना या कार्यक्रमाला बोलवायचे असेल तर आयोजकांकडे आग्रह धरा. तुमची भूमिका मांडा. मात्र, निमंत्रणाच्या



मुद्द्यावरून कार्यक्रमात गोंधळ घालण्याची भाषा करणे किंवा कार्यक्रमात अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न करणे कोणत्याही परिस्थितीत स्वीकारार्ह नाही.

आमदार बालाजी कल्याणकर यांना माझा थेट सवाल आहे की, समाजाच्या पाठिंब्यावर आमदारकी मिळवायची आणि त्याच समाजाच्या आराध्य दैवताच्या स्मारकाच्या लोकार्पण सोहळ्यात राजकीय मानपानाचे राजकारण करायचे, हे कितपत योग्य आहे?

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक हे कोणत्याही राजकीय पक्षाचे, नेत्याचे किंवा लोकप्रतिनिधीचे वैयक्तिक स्मारक नाही. ते संपूर्ण समाजाच्या अस्मितेचे, स्वाभिमानाचे आणि श्रद्धेचे प्रतीक आहे. त्यामुळे या स्मारकाच्या उद्घाटनाला राजकीय प्रतिष्ठेची लढाई (पान २ वर)

शेतकरी पुरस्कारासाठी अर्ज करावे

बीड/जिमाका

कृषी विभागाच्या आत्मा योजनेंतर्गत सन २०२६-२७ या वर्षासाठी दिल्या जाणाऱ्या तालुका व जिल्हास्तरीय उत्कृष्ट शेतकरी पुरस्कारांसाठी प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. पुरेसे प्रस्ताव प्राप्त न झाल्याने आता इच्छुक शेतकऱ्यांना ११ डिसेंबर २०२६ पर्यंत अर्ज सादर करता येतील, अशी माहिती आत्माचे प्रकल्प संचालक सुभाष साळवे यांनी दिली आहे. शेतीमध्ये नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा अवलंब, उत्पादनवाढ आणि इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी काम करणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करणे हा या पुरस्काराचा मुख्य उद्देश आहे. जिल्ह्यासाठी एकूण ५ जिल्हा-स्तरीय प्रत्येकी २५ हजार रुपये आणि प्रत्येक तालुक्यासाठी २ याप्रमाणे ११ तालुक्यासाठी २२ तालुकास्तरीय प्रत्येकी १० हजार रुपये पुरस्कार निश्चित करण्यात आले आहेत. यापूर्वी ३० जुलै आणि ३० सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आली होती. ती आता ११ डिसेंबर २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी विहित नमुन्यातील अर्ज तालुका कृषी अधिकारी कार्यालयातून प्राप्त करून घ्यावा. आवश्यक कागदपत्रांसह हा प्रस्ताव संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात जमा करावा. या पुरस्कारासाठी अनुसूचित जाती व जमाती आणि महिला शेतकऱ्यांना विशेष प्राधान्य दिले जाणार आहे. तसेच, ज्या शेतकऱ्यांना यापूर्वी शासनाचा कोणताही पुरस्कार मिळालेला आहे, ते या पुरस्कारासाठी पात्र ठरणार नाहीत. पुरस्कार निवडीचे सर्व अधिकार आयोजकांकडे राखून ठेवण्यात आले आहेत. तालुकास्तरीय छाननीनंतर जिल्हास्तरीय समिती अंतिम निवड करेल. निवड झालेल्या शेतकऱ्यांचा सन्मान पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. असेही कृषी विभागाने प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

इंदिरा गांधी जयंती व राष्ट्रीय एकात्मता दिन साजरा न केल्याचा आरोप; सामाजिक वनीकरण विभागाच्या अधिकाऱ्यांची चौकशी करा!

वैजनाथ माने यांची विभागीय वनाधिकाऱ्यांकडे तक्रार; शासन आदेशाचे उल्लंघन केल्याचा ठपका

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींच्या जयंतीसह राष्ट्रीय दिन साजरे करणे बंधनकारक असताना, परळी तालुक्यातील सामाजिक वनीकरण कार्यालयात माजी पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांची जयंती आणि राष्ट्रीय एकात्मता दिन साजरा करण्यात आला नसल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी शिवसेनेचे परळी शहरप्रमुख तथा शिवनेरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष वैजनाथ नारायणराव माने यांनी विभागीय वनाधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, बीड यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करून संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.



वैजनाथ माने यांनी १९ नोव्हेंबर रोजी दुपारी ४.३० वाजता परळी येथील सामाजिक वनीकरण कार्यालयास प्रत्यक्ष भेट दिली असता, कार्यालयात स्व. इंदिरा गांधी यांची जयंती साजरी केल्याचे कोणतेही निदर्शक दिसून आले नाहीत. तसेच राष्ट्रीय एकात्मता दिनानिमित्त कोणताही कार्यक्रम किंवा शपथविधी घेण्यात आल्याचे आढळून आले नाही. यासंदर्भातील प्रत्यक्ष व्हिडिओ चित्रिकरण केल्याचा दावाही त्यांनी तक्रारीत केला आहे.

शासनाच्या २१ डिसेंबर २०२५ रोजीच्या परिपत्रकानुसार राज्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये संबंधित जयंती आणि राष्ट्रीय दिन साजरा करण्याचे स्पष्ट निर्देश आहेत. असे असताना परळीतील सामाजिक वनीकरण कार्यालयाने शासन आदेशाचे पालन केले नसल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, तक्रारीमध्ये महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ३ (१) (ii), ३ (१) (iii) आणि नियम ३ (२) यांचा उल्लेख करण्यात आला (पान २ वर)

कोळी महादेव महासंघाच्या युवक बीड जिल्हाध्यक्षपदी रामभाऊ वाघमारे यांची निवड!

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

कोळी महादेव समाजाच्या सामाजिक संघटनात्मक कार्याला बळकटी देण्यासाठी कोळी महादेव महासंघाच्या बीड युवक जिल्हाध्यक्षपदी रामभाऊ वाघमारे यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे समाजबांधवांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



रामभाऊ वाघमारे यांनी सामाजिक क्षेत्रात कार्य करत समाजाच्या एकजुटीसाठी आणि समाजाच्या विविध प्रश्नांसाठी योगदान द्यावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात येत आहे.त्यांच्या निवडीबद्दल मित्रपरिवार, समाजबांधव आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

रामभाऊ वाघमारे यांच्या पुढील सामाजिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा! यावेळी सर्व समाज बांधव मित्रपरिवार मा.महादेव कंडूकटले,बंडू साहेब,अजय बळवंत, समाधान मुंडे,विश्वंभर निरंडे, प्रल्हाद कंडूकटले, ज्योतीराम कानाडे यांच्यासह आदी उपस्थितीत होते.

डॉ.जितेंद्र ओव्हाळ यांच्या सामाजिक कार्याची राज्यस्तरावर दखल

द रिअल पँथर राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित; ब्लू टायगर सामाजिक संस्थेचा गौरव

किल्ले धारूर/अतुल शिनगारे

सामाजिक न्याय, वंचितांचे हक्क आणि अन्यायग्रस्तांच्या प्रश्नांसाठी सातत्याने कार्य करणारे डॉ. जितेंद्र महादेव ओव्हाळ यांना ब्लू टायगर सामाजिक संस्थेच्या वतीने प्रतिष्ठेचा द रिअल पँथर राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करून सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची राज्यस्तरावर दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



मंगळवारी लातूर येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर विकास मंचचे लातूर जिल्हाध्यक्ष विनोद अडागळे यांनी डॉ. ओव्हाळ यांच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारला. डॉ. जितेंद्र ओव्हाळ हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विकास मंच महाराष्ट्राचे संस्थापक तथा अध्यक्ष आहेत.

सामाजिक क्षेत्रात कार्यरत असताना त्यांनी दिव्यांग, वंचित, शोषित, पीडित तसेच दुर्लक्षित घटकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने आवाज उठविला आहे. समाजातील उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत ब्लू टायगर सामाजिक संस्थेने त्यांची या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड केली.संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब शेळके आणि राष्ट्रीय सचिव वीर मधुकर संकट यांच्या माध्यमातून हा सन्मान प्रदान करण्यात आला. या पुरस्कारामुळे डॉ. जितेंद्र ओव्हाळ यांच्या सामाजिक कार्याचा राज्यस्तरावर गौरव झाला असून, त्यांच्या कार्याची विविध स्तरांतून दखल घेतली जात आहे.

इंटर्नशिप भत्त्यात वाढ करण्याच्या निर्णयामुळे पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांना मिळाला मोठा आधार

महाराष्ट्र व्हेटर्नरी स्टुडंट्स असोसिएशनने मानले ना.पंकजाताई मुंडे यांचे आभार

मुंबई/प्रतिनिधी

पशुवैद्यकीय अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिप भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल महाराष्ट्र व्हेटर्नरी स्टुडंट्स असोसिएशन या विद्यार्थी संघटनेने राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांची आज भेट घेऊन आभार मानले. ना. पंकजाताईंच्या या निर्णयामुळे राज्यातील पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांना फार मोठा आर्थिक आधार मिळाला असल्याची प्रतिक्रिया असोसिएशनने यावेळी व्यक्त केली.



महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या पशुवैद्यक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या आंतर्वासिता निर्वाह भत्यात सात हजार रुपयांची वाढ करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत घेण्यात आला होता. त्या अगोदर महाराष्ट्र व्हेटर्नरी स्टुडंट्स असोसिएशनच्या विद्यार्थ्यांनी यासंदर्भात ना. पंकजाताई मुंडे यांची मंत्रालयात भेट घेऊन इंटर्नशिप भत्त्यात वाढ करण्याची मागणी केली होती. या मागणीची दखल घेऊन ना. पंकजाताईंनी हा विषय राज्य मंत्रिमंडळाच्या (पान २ वर)

बीडच्या मातीतून उमललेला 'निवद' चा कलात्मक ठसा!

अण्णाभाऊ साठे आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हलसाठी अधिकृत निवड

माजलगाव/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील निसर्गरम्य परिसरात चित्रित झालेल्या आणि सामाजिक आशयासह कलात्मक मांडणी करणाऱ्या 'निवड' या मराठी लघुचित्रपटाने आता आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या व्यासपीठावर आपली छाप उमटवली आहे. निर्माता भास्कर किसन शिंदे (भास्करनाना) यांच्या निर्मितीतील या लघुचित्रपटाची प्रतिष्ठित अण्णाभाऊ साठे आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हल २०२६, पुणे येथे अधिकृत निवड झाली आहे. ही निवड बीड जिल्ह्यासह मराठी चित्रपटसृष्टीसाठी अभिमानाची आणि गौरवाची बाब ठरत आहे.

निर्माते भास्करनाना शिंदे यांचा 'निवड' हा दुसरा लघुचित्रपट प्रकल्प आहे. यापूर्वी त्यांनी 'प्रिय नदीस' या लघुचित्रपटाची निर्मिती केली होती. त्यानंतर 'निवड'च्या माध्यमातून त्यांनी पुन्हा एकदा चित्रपट निर्मिती क्षेत्रात दमदार पाऊल टाकले आहे. आपल्या चित्रपटाची प्रतिष्ठित महोत्सवासाठी अधिकृत निवड झाल्याबद्दल त्यांनी मनस्वी आनंद व्यक्त केला असून, या यशाचे श्रेय संपूर्ण टीमच्या मेहनतीला दिले आहे.

या लघुचित्रपटात प्रसनजीत शिंदे, अर्चना महादेव आणि उर्मिला डांगे यांच्या प्रमुख भूमिका आहेत. चित्रपटाचे दिग्दर्शन अमर देवने यांनी केले असून, कथा, पटकथा व संवादलेखन आर. प्रकाश यांनी केले आहे. चित्रपटाचे छायाचित्रण चैतन्य साळुंखे यांनी सांभाळले असून, कला दिग्दर्शनाची जबाबदारी विष्णू उगले यांनी यशस्वीपणे पार पाडली आहे.

विशेष म्हणजे, या चित्रपटाचे चित्रीकरण बीड जिल्ह्यातील निसर्गरम्य ठिकाणी करण्यात आले आहे. जिल्ह्यातील स्थानिक निसर्गसौंदर्य,



कलात्मकता आणि प्रतिभावंतांच्या सहकार्याने साकारलेल्या या कलाकृतीला आता प्रतिष्ठित चित्रपट महोत्सवात स्थान मिळाल्याने जिल्ह्याच्या सांस्कृतिक आणि कलाक्षेत्रातील योगदानाला नवी ओळख मिळण्याची संधी निर्माण झाली आहे.

या निवडीबद्दल आनंद व्यक्त करताना निर्माता भास्करनाना शिंदे यांनी चित्रपटाच्या संपूर्ण टीमचे मनःपूर्वक अभिनंदन केले. एखाद्या निर्मात्यासाठी आपल्या कलाकृतीची प्रतिष्ठित महोत्सवासाठी निवड होणे ही अत्यंत आनंदाची आणि समाधानाची बाब असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.'निवड'च्या अधिकृत निवडीने बीडच्या कलाविश्वाचा मान उंचावला असून, स्थानिक कलाकारांच्या मेहनतीला राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळण्याच्या दिशेने हे महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे. या यशामुळे संपूर्ण चित्रपट टीमवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



नाथ शिक्षण संस्था संचलित यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालय येथे पहिल्या महिला पंतप्रधान स्व.इंदिरा गांधी यांची जयंती व राष्ट्रीय एकात्मता दिनानिमित्त प्रतिमा पूजन करून प्रतिज्ञा घेण्यात आली या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.अतुल दुबे, प्रा.यु.एन.फड, एस.बी.अष्टेकर यांच्या सह प्राध्यापक ,कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशन, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, 'जगमित्र' बाजीप्रभू नगर नेहरू चौक (तळ) परळी वैजनाथ ४३१५१५ जि.बीड तर दैनिक जगमित्र कार्यालय घर क्र.२०, खडगाव रोड, क्रांतीनगर, विश्वशांती बौध्द विहार जवळ लातूर घर क्र.२२/२० एसटी कॉलनी, बाशी नाका, धाराशिव तनिश ऑर्किड, फेज-२, आर-विंग, ११०५, आळंदी आरडी., चारोली फाटा, ता. हवेली, पुणे ९-२-३४६, बिलाल नगर, देलगूर नाका, इतवारा नांदेड प्लॉट क्र.६६/२ सीटीएस क्र.९०, मयुरी रेसी, महिंद्रा शोरूमच्या मागे, छ.संभाजीनगर रोड, जालना येथे प्रकाशित केले आहे. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) कार्यकारी संपादक : बिलाल शेख मो.नं.९४२२४०४७४०

'Jagamitra' is printed by Balasaheb Jijaram Kadbane (Printer, Publisher, Owner, and Editor) at Jagamitra Offset, near Nehru Chowk, Bajiprabhu Nagar, Parli Vaijnath (Dist. Beed, Maharashtra). It is published from the following locations: 'Jagamitra' Office, Bajiprabhu Nagar, Nehru Chowk (Ground Floor), Parli Vaijnath 431515, Dist. Beed; House No. 20, Khadgaon Road, Krantinagar, near Vishwashanti Buddha Vihar, Latur; House No. 22/20, ST Colony, Bashi Naka, Dharashiv; Tanish Orchid, Phase-2, R-Wing, 1105, Alandi Road, Charoli Phata, Tal. Haveli, Pune; 9-2-346, Bilal Nagar, Delgur Naka, Itwara, Nanded; and Plot No. 66/2, CTS No. 90, Mayuri Residency, behind Mahindra Showroom, Chh. Sambhajinagar Road, Jalna. (The Editor does not necessarily agree with the content or news published in the daily; the responsibility for content selection rests with the designated person as per the PRB Act.) Executive Editor: Bilal Shaikh (Mobile No. 9422404740).

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

बद्रीनारायण घुगे (पुणे जिल्हा प्रतिनिधी)
मो.9922476927 PRGI.No.- MHMAR/26/A4099

पुणे जिल्हा आवृत्ती — शुक्रवार दि.२० नोव्हेंबर २०२६ — पान नं. ५

माजी पंतप्रधान दिवंगत इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त महापौर रवि लांडगे यांच्याकडून अभिवादन; उपस्थितांनी घेतली राष्ट्रीय एकात्मतेची शपथ

पिंपरी । प्रतिनिधी

भारताच्या माजी पंतप्रधान दिवंगत भारतरत्न, इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीत महापौर रवि लांडगे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंताऔआ जाहिरा मोमीन, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक



यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. आम्ही हिंसाचाराचा कधीही अवलंब करणार नाही. धार्मिक, भाषिक किंवा प्रादेशिक मतभेद व तंटे तसेच राजकीय व आर्थिक गा-हाणी ही शांततामय आणि सांविधनिक मार्गाने सोडविण्याचा प्रयत्न चालू ठेवू अशी सामुहिक शपथ सर्वांनी यावेळी घेतली. प्रफुल्ल पुराणिक यांनी राष्ट्रीय एकात्मता शपथेचे वाचन केले.

शिरगाव येथील श्री साईबाबा ट्रस्ट मधील भ्रष्टाचारी विश्वस्तांवर कारवाई करा : उस्मान शेख

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करणार : समीर शेख

पिंपरी । प्रतिनिधी

शिरगाव, तालुका मावळ येथील श्री साईबाबा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट व संलग्न श्री साईबाबा अन्नछत्र मंडळ यांच्या आर्थिक व्यवहारांमध्ये सध्याचे विश्वस्त रवी जाधव व उमेश कविटकर आणि त्यांचे साथीदार यांनी पोलीस प्रशासन मधील काही अधिकारी व धर्मादाय आयुक्त कार्यालयातील काही अधिकाऱ्यांना हाताशी धरून संगणमताने कोटचवधी रुपयांचा अपहार, दानपेटीतील देणगी रकमेची अफरातफर, बनावट ठराव व दस्त ऐवजांमध्ये फेरफार तसेच आर्थिक गैरव्यवहार केला असल्याचा आरोप ट्रस्टचे संस्थापक व तहयात विश्वस्त उस्मान दगडू शेख यांनी केला आहे. गुरुवारी पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ट्रस्टचे संस्थापक व तहयात विश्वस्त उस्मान दगडू शेख, तहयात विश्वस्त समीर शेख, ड. अनघा कुलकर्णी, अक्षय धावरे, रामभाऊ गोपाळे व शिरगावचे ग्रामस्थ उपस्थित होते.

तहयात विश्वस्त समीर शेख यांनी यावेळी सांगितले की, हा सार्वजनिक न्यास नोंदणीकृत असून त्याची नोंदणी सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय पुणे येथे दि. ९ सप्टेंबर २००२ रोजी करण्यात आली असून त्याचा नोंदणी क्रमांक इ/३६७४/पुणे असा आहे. यामध्ये एकूण ७ विश्वस्त असून यापैकी अध्यक्ष तत्कालीन आमदार प्रकाश देवळे हे होते. त्यावेळी देवळे यांच्या समवेत प्रसाद दत्तात्रय पाटील, प्रमोद माणिक शेठ दुगड, धोंडीराम बाबा चव्हाण, उस्मान दगडू शेठ आणि दिगंबर शेठ बाळासाहेब भेगडे, प्रा.



नारायण सदाशिव फरांदे हे विश्वस्त होते. प्रकाश देवळे यांचे २४ सप्टेंबर २०२५ रोजी निधन झाल्यानंतर त्यांचे नातेवाईक रवी जाधव व उमेश कविटकर यांचे विश्वस्त म्हणून नाव लावण्यात आले. यानंतर रवी जाधव व उमेश कविटकर यांनी अनेक वेळा सध्याचे विश्वस्तांना विश्वासात न घेता बेकायदेशीर आर्थिक अफरातफर केली आहे असा आरोप केला. यामुळे या श्री साई मंदिरात भेट देण्यास येणाऱ्या साई भक्तांच्या भावनांचा अनादर झाला आहे. या ठिकाणी पुणे मुंबईतील मोठ्या शहरासह देश परदेशातून साईभक्त नवस बोलण्यासाठी व संकल्प सोडण्यासाठी येतात आणि श्रद्धेने येथे दान करतात यामध्ये सोने, चांदी, हिरे आधी मौल्यवान दागिन्यांसह रोख रकमेचा देखील समावेश असतो. यामध्ये लाखो रुपयांची दरमहा रक्कम जमा होते. यातील ठराविकच रक्कम संस्थेच्या बँक खात्यात जमा केली जाते व उर्वरित रक्कम त्यांच्या वैयक्तिक कामासाठी बेकायदेशीररित्या वापरली जात असल्याचा संशय आहे. संबंधितांनी अनेक वेळा बेकायदेशीरपणे दानपेटी फोडून यातील रोख रकमेचा अपहार केला आहे. बँकेत भरलेल्या रकमेचा देखील नोटांचा तपशील जुळत नाही. याविषयी आम्ही तक्रार केली असता त्यांनी दानपेटी नोटांच्या तपशिलाचे बोगस पेपर्स तयार केले हे देखील एकाच दिवशी एकाच व्यक्तीच्या अक्षरातील असल्याचा आरोप आहे याची देखील तपासणी व्हावी. तसेच संस्थेला या परिसरात दुकानदारांकडून मिळणारे भाडे याचा देखील तपशील जुळत नाही. याविषयी अनेक वेळा स्थानिक पोलीस प्रशासनांकडे तसेच धर्मादाय आयुक्त पुणे यांच्या कार्यालयात लेखी तक्रार आम्ही विश्वस्त व ग्रामस्थांनी केली आहे. मात्र आमच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करून पोलीस प्रशासनातील काही अधिकारी व धर्मादाय आयुक्त कार्यालयातील काही अधिकारी रवी जाधव व उमेश कविटकर यांच्या समवेत या भ्रष्टाचारात सामील झाले असल्याचा संशय समीर शेख यांनी व्यक्त केला.

तसेच या मंदिरात जमणाऱ्या निधीचा उपयोग स्थानिक गावाच्या विकास कामासाठी केला जावा अशी देखील मागणी ग्रामस्थांनी अनेक वेळा केली आहे. येथील अन्नछत्रातील दूषित पाणी कोणतीही प्रक्रिया न करता पवित्र नदीत सोडून दिले जाते त्यामुळे नदी प्रदूषण व परिसरात पर्यावरणावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. याविषयी भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये तात्काळ गुन्हा दाखल करून फौजदारी कारवाई करावी अन्यथा १५ डिसेंबर २०२६ पासून माननीय जिल्हाधिकारी पुणे यांच्या कार्यालयासमोर आम्ही उर्वरित विश्वस्त तसेच शिरगावचे ग्रामस्थ आंदोलन व उपोषण करू असा इशारा या पत्रकार परिषदेत समीर शेख यांनी दिला.

हिंजवडी, माण, मारुंजी परिसरातील विकासकामांना गती द्या : जिल्हाधिकारी डुडी

पिंपरी । प्रतिनिधी

हिंजवडी, माण आणि मारुंजी परिसरातील वाढत्या नागरिकरणाच्या पार्श्वभूमीवर रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि कचरा व्यवस्थापनाची कामे गतीने पूर्ण करावीत. विकासकामांमध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आज जिल्हाधिकारी डुडी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित उच्चस्तरीय समितीच्या बैठकीत या परिसरातील विविध विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी विविध विभागाचे प्रमुख अधिकारी, नागरिक उपस्थित होते.

रस्ते विकासासाठी सुमारे ४५० कोटी रुपयांच्या प्रस्तावित कामांचे तांत्रिक सादरीकरण पूर्ण झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली. नोव्हेंबरअखेरपर्यंत सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) आणि तांत्रिक बाबी अंतिम करण्याचे निर्देश त्यांनी दिले. रस्त्यांच्या कामांच्या निविदा २५



नोव्हेंबरपर्यंत प्रसिद्ध करून २० डिसेंबरपर्यंत प्रत्यक्ष कामांना सुरुवात करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. माण, मारुंजी आणि हिंजवडी परिसरातील रस्त्यांचे अलाइनमेंट, भूसंपादन, टीडीआर आणि डीपीआरसंदर्भातील अडचणी तातडीने दूर कराव्यात. रिंगरोडच्या कामाला प्राधान्य देऊन मोजणी प्रक्रियेतील अडचणी सोडवाव्यात, असेही त्यांनी सांगितले.

पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापनावर भर

परिसरातील गृहनिर्माण सोसायट्या आणि नागरिकांना होणारा पाणीपुरवठा, ड्रेनेज व्यवस्था आणि सांडपाणी प्रक्रियेच्या प्रश्नांचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) कार्यान्वित करणे, सांडपाण्याचा ओव्हरफ्लो रोखणे आणि पाण्याच्या स्रोतांचे योग्य नियोजन करण्याबाबत संबंधित यंत्रणांनी अहवाल सादर करावेत. मुळशी धरण आणि संबंधित यंत्रणांशी समन्वय साधून पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे, असे निर्देश देण्यात आले.

कचरा जाळणाऱ्यांवर कारवाई करा

परिसरात उघड्यावर कचरा जाळणे तसेच प्रक्रिया न केलेले सांडपाणी नाले व नदीपात्रात सोडण्याच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ग्रामपंचायत आणि संबंधित यंत्रणांनी संयुक्त पाहणी करून दोषींना नोटिसा बजावाव्यात. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर आवश्यकतेनुसार कारवाई करावी. कचरा टाकण्याची ठिकाणे आणि प्रदूषणाची संभाव्य ठिकाणे निश्चित करून त्यावर प्रभावी नियंत्रण ठेवावे, असेही जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले.

वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी समन्वय

हिंजवडी परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी वाहतूक पोलीस आणि संबंधित यंत्रणांनी समन्वयाने उपाययोजना राबवाव्यात. पुढील बैठकीपूर्वी सर्व विभागांनी प्रलंबित अहवाल, निविदांची सद्यस्थिती आणि प्रत्यक्ष सुरू केलेल्या कामांचा तपशील सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले. यावेळी हिंजवडी, माण, मारुंजी परिसरातील नागरिकांनी देखील चर्चेत सहभाग घेतला.

कामशेतमधील पॅराग्लायडिंग साहसी खेळ टिकणार, खासदार श्रीरंग बारणे यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

विद्युत विभागाच्या वीज वाहिनीचा मार्ग बदलण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

मावळ । प्रतिनिधी

मावळ तालुक्यातील कामशेतमधील पॅराग्लायडिंग हिल हा साहसी खेळ वाचविण्यासाठी खासदार श्रीरंग बारणे यांनी केलेल्या पाठपुराव्याला मोठे यश आले आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्याबरोबर गुरुवारी महत्वपूर्ण बैठक पार पडली. यामध्ये वीज वाहिनीचा मार्ग बदलण्याचे महत्वाचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. त्यामुळे पॅराग्लायडिंगला कोणतीही अडचण येणार नसल्याचे स्पष्ट झाल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले.

कामशेत पॅराग्लायडिंग असोसिएशनचे अध्यक्ष संजय एम राव, उपाध्यक्ष विनोद शेलार, विद्युत वाहिनीचे काम करणारे अदानी पॉवरचे अधिकारी बैठकीला उपस्थित होते. कामशेत येथील प्रस्तावित वीज वाहिन्यांच्या पोलमुळे पॅराग्लायडिंग हिलला अडथळा निर्माण होणार होता. याबाबत कामशेत पॅराग्लायडिंग असोसिएशनच्या



पदाधिकाऱ्यांनी खासदार बारणे यांची भेट घेऊन वीजवाहिनीच्या मार्गात बदल करण्याची मागणी केली होती. त्यावर खासदार बारणे यांनी केंद्रीय विद्युत मंत्रालयाचे सचिव पंकज अग्रवाल यांची भेट घेतली होती. तीन खांबासाठी ३० वर्षांपासून चालू असलेला पॅराग्लायडिंग हा क्रीडा प्रकार बंद करणे चुकीचे आहे. पोल बाजूने घेता येऊ शकतात, असे सांगितले. त्यावर अग्रवाल यांनी खासगी कंपनीशी चर्चा करून फेरसर्व्हे करावा. पोल बाजूने घेऊन जावेत, असे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते. त्यानंतर आज जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी वीज वाहिनीचा मार्ग बदलावा. कोणत्याही परिस्थितीत या खेळाला अडथळा येता कामा नये, असे आदेश त्यांनी संबंधितांना दिले आहेत. त्यामुळे गेल्या ३० वर्षांपासून विकसित झालेला पॅराग्लायडिंग हिल हा क्रीडा प्रकार कायमस्वरुपी सुरु राहणार आहे. हा खेळ महाराष्ट्रात केवळ पाचगणी, कामशेतमध्येच खेळला जातो, असे खासदार बारणे यांनी सांगितले.

कामशेत येथील 'टॉवर हिल' हे पॅराग्लायडिंगसाठी अत्यंत महत्त्वाचे ठिकाण असून, येथे दरवर्षी हजारो देशी-विदेशी पर्यटक आणि शेकडो प्रशिक्षणार्थी पायलट येत असतात. सुनीत राव यांसारख्या आंतरराष्ट्रीय पायलटनी येथूनच प्रशिक्षण घेऊन जागतिक स्तरावर भारताचे नाव उंचावले आहे. तसेच, सप्टेंबर ते मार्च या पूर्वेकडील वाऱ्यांच्या हंगामात उड्डाणांसाठी टॉवर हिलशिवाय दुसरा कोणताही व्यवहार्य पर्याय उपलब्ध नाही. या उद्योगावर स्थानिक वाहतूकदार, होमस्टे, कॅफे, रेस्टॉरंट्स आणि ग्रामीण अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. कामशेत परिसर राष्ट्रीय स्तरावरील विमान क्रीडा केंद्र, पर्यटन स्थळ आणि ग्रामीण रोजगाराचा महत्त्वाचा आधार आहे. प्रस्तावित मार्ग मुख्य उड्डाण क्षेत्रातून जाणार होता. आता हा मार्ग बदलण्यात येणार आहे. त्यामुळे येथील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे खासदार बारणे म्हणाले.

गेल्या तीन दशकांपासून कामशेत हे भारतातील प्रमुख पॅराग्लायडिंग स्थळ म्हणून ओळखले जाते. येथे मनोरंजनात्मक उड्डाणे, व्यावसायिक टँडम उड्डाणे, वैमानिक प्रशिक्षण तसेच स्पर्धात्मक विमान क्रीडा उपक्रम चालतात. भौगोलिक स्थान, डोंगररचना, उंची आणि अनुकूल वाऱ्याच्या परिस्थितीमुळे हे स्थळ अत्यंत महत्त्वाचे आहे. येथे वर्षातील जवळपास आठ ते नऊ महिने उड्डाणाची संधी उपलब्ध असते. देशभरातील वैमानिक घडवण्यासाठी हे एक महत्त्वाचे प्रशिक्षण केंद्र आहे. या स्थळाने भारतातील पॅराग्लायडिंग समुदाय विकसित करण्यात आणि सुरक्षित उड्डाण पद्धती निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

श्री ज्ञानेश्वर विद्यालयात 'सुरेश काका वडगावकर डिजिटल ज्ञान गौरव परीक्षा' उत्साहात संपन्न

आळंदी देवाची । प्रतिनिधी

श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था संचलित श्री ज्ञानेश्वर विद्यालय व ज्यु. कॉलेज, आळंदी देवाची येथे संस्थेच्या अध्यक्षांच्या अध्यक्षपदाच्या पन्नास वर्षांच्या गौरवशाली वाटचालीनिमित्त संगणक विभागाच्या वतीने 'सुरेश काका वडगावकर डिजिटल ज्ञान गौरव परीक्षा' आयोजित करण्यात आली. या परीक्षेत विद्यालयातील तब्बल २०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

विद्यार्थ्यांमध्ये संगणकविषयक ज्ञानाची आवड निर्माण व्हावी, त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा, बौद्धिक क्षमतेचा विकास व्हावा तसेच भविष्यातील विविध स्पर्धा परीक्षांची ओळख व तयारी यासाठी आवश्यक ज्ञान प्राप्त व्हावे, या उद्देशाने या परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे सचिव



अजित वडगावकर, प्राचार्य किसन राठोड, उपप्राचार्य प्रशांत सोनवणे, पर्यवेक्षिका हेमांगी उपरे, संगणक विभागप्रमुख सोमनाथ आल्हाट, प्रकाश भागवत, रविंद्र शेखरे, सूर्यकांत खुडे, छाया कुऱ्हाडे, स्वागती कदम, मोनिका जगताप, राजू सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संस्थेचे सचिव अजित वडगावकर म्हणाले की, विद्यार्थ्यांना संगणकाबद्दल गोडी निर्माण व्हावी , त्या विषयासंदर्भात माहिती व्हावी, त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी तसे स्पर्धात्मक वृत्ती निर्माण होण्यासाठी अशा विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेणे अत्यंत गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना भविष्यातील स्पर्धा परीक्षांची माहिती मिळावी, त्यांचा आत्मविश्वास वाढावा आणि त्यांना योग्य दिशा मिळावी, यासाठी विद्यालयामार्फत सातत्याने विविध उपक्रम व स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. या स्पर्धेतील इयत्ता सातवीतील प्रथम तीन व इतर आठवीतील प्रथम तीन विद्यार्थ्यांना ट्रॉफी व रोग बक्षीस देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. अशा संधींचा लाभ घेऊन आपल्या ज्ञानाची व्याप्ती वाढवावी, असे आवाहन त्यांनी केले. या परीक्षेत २०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून डिजिटल ज्ञान संपादनाच्या दिशेने उत्स्फूर्त पाऊल टाकले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संगणक विभागातील सर्व शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

रेशन कार्डच्या कामांसाठी नागरिकांचे हेलपाटे; सर्व्हरच्या अडचणींमुळे अर्ज रखडले

पिंपरी । प्रतिनिधी

रेशन कार्डमध्ये नवीन सदस्याचे नाव समाविष्ट करणे, तसेच नवीन रेशन कार्ड मिळविण्यासाठी नागरिकांकडून परिमंडळ कार्यालयात दररोज गर्दी होत आहे. ऑनलाइन प्रक्रियेद्वारे ही कामे केली जात असली, तरी सर्व्हरमधील तांत्रिक अडचणींमुळे काही अर्जांच्या प्रक्रियेला विलंब होत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे नागरिकांना कामासाठी वारंवार कार्यालयात हेलपाटे मारावे लागत आहे.

रेशन कार्डमध्ये नाव वाढविणे किंवा नवीन कार्ड काढण्यासाठी अनेक नागरिकांना कार्यालयात चकरा माराव्या लागत आहेत. काही नागरिक सुटी घेऊन सलग चार ते पाच दिवस या कामासाठी येत असल्याचे दिसून येत आहे. यामुळे त्यांचा वेळ खर्च होण्याबरोबरच रोजंदारी किंवा कामाच्या उत्पन्नावरही परिणाम होत आहे. अर्जाची प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी विलंब होत असल्याने नागरिकांकडून कामकाजाबाबत विचारणा केली जात आहे.

दरम्यान, कार्यालयातील अधिकाऱ्यांनी ऑनलाइन सर्व्हरमधील तांत्रिक अडचणींमुळे काही कामांना अपेक्षेपेक्षा अधिक वेळ लागत असल्याचे स्पष्ट केले आहे. ऑनलाइन प्रणालीवर अवलंबून असलेल्या प्रक्रियेत तांत्रिक अडथळे निर्माण झाल्यास कामकाजावर त्याचा परिणाम होत आहे. त्यामुळे नागरिकांनी संयम राखावा, तसेच आवश्यक कागदपत्रांसह कार्यालयात यावे, असे आवाहन पुरवठा विभागाकडून करण्यात येत आहे.

तांत्रिक अडचणी दूर करून नागरिकांना सहकार्य मिळावे, तसेच ऑनलाइन प्रक्रियेबाबत योग्य माहिती आणि मार्गदर्शन उपलब्ध व्हावे, यासाठी पुरवठा विभागाने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

शासकीय सेवांचे डिजिटल माध्यमातून सुलभीकरण करण्याचा प्रयत्न सुरू असताना तांत्रिक अडचणींचा त्रास सर्वसामान्य नागरिकांना होऊ नये, यासाठी पर्यायी व्यवस्था आणि प्रभावी मार्गदर्शन उपलब्ध होणे महत्त्वाचे आहे. अर्जाची सद्यस्थिती नागरिकांना सहज समजावी, वारंवार कार्यालयात येण्याची गरज भासू नये आणि प्रलंबित अर्जांचा निपटारा वेळेत व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

ऑनलाइन सर्व्हरमधील तांत्रिक अडचणींमुळे काही कामकाजास विलंब होत आहे. ही समस्या दूर करण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू आहेत. तसेच, नागरिकांना ऑनलाइन नोंदणी करताना काही अडचणी येत असल्यास त्यांनी आवश्यक कागदपत्रांसह कार्यालयाशी संपर्क साधावा.

काळजी घ्यावी; थंडीमुळे रक्तदाब वाढण्यासह हृदयावर ताण

थंडीपासून हृदयाचे संरक्षण करा : डॉ भाग्यश्री लहाने मुंडे

पिंपरी । प्रतिनिधी

हिवाळ्यात तापमानात घट झाल्याने हृदयविकार असलेल्या रुग्णांनी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. थंडीमुळे रक्तवाहिन्या आकुंचन पावतात. परिणामी रक्तदाब वाढू शकतो आणि हृदयाला रक्त पंप करण्यासाठी अधिक मेहनत घ्यावी लागते. विशेषतः उच्च रक्तदाब, मधुमेह, अँजिओप्लास्टी, बायपास शस्त्रक्रिया किंवा हार्ट फेल्युअरचा इतिहास असलेल्या व्यक्तींनी अधिक सतर्क राहावे, असे मोशी येथील विठ्ठल हॉस्पिटल डॉ भाग्यश्री लहाने मुंडे डॉ शंकर मुंडे यांनी सांगितले आहे.

हिवाळ्यात सकाळी अचानक थंड वातावरणात जाणे आणि कोणतीही पूर्वतयारी न करता जोरदार व्यायाम करणे टाळावे. बाहेर पडताना उबदार कपडे घालावेत. चालण्यापूर्वी हलका व्यायाम करून हळूहळू चालण्याचा वेग वाढवावा. अतिथंडी, धुके किंवा प्रदूषण असल्यास घरातच चालण्याचा पर्याय निवडावा.

हृदय निरोगी ठेवण्यासाठी संतुलित आहार घेणे महत्त्वाचे आहे. आहारातील मीठ, तळलेले पदार्थ, तेलकट पदार्थ आणि गोड पदार्थांचे प्रमाण कमी ठेवावे. हंगामी फळे, पालेभाज्या, डाळी, कडधान्ये आणि सुका मेवा योग्य प्रमाणात घ्यावा. हिवाळ्यात तहान कमी लागली तरी शरीराला आवश्यक तेवढे पाणी प्यावे. मात्र हार्ट फेल्युअरच्या रुग्णांनी डॉक्टरांनी सांगितलेल्या द्रवपदार्थांच्या मर्यादेचे पालन करावे. रक्तदाब, रक्तातील साखर आणि कोलेस्ट्रॉल नियंत्रणात ठेवण्याबरोबरच डॉक्टरांनी दिलेली औषधे नियमित घ्यावीत. प्रकृती सुधारली म्हणून स्वतःहून औषधे बंद करू नयेत. सर्दी खोकल्यासाठी औषधे घेतानाही डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

दुर्लक्षित करू नका

छातीत दडपण किंवा वेदना, अचानक दम लागणे, थंड घाम, चक्कर अथवा हात, पाठ किंवा जबडच्यात वेदना जाणवल्यास तातडीने वैद्यकीय मदत घ्यावी. हार्ट अटॅकची शंका असल्यास ११२ किंवा रुग्णवाहिकेशी संपर्क साधावा. नियमित तपासणी, सुरक्षित व्यायाम, योग्य आहार, पुरेशी झोप आणि औषधांचे नियमित सेवन या सवयी हिवाळ्यात हृदयाचे आरोग्य जपण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरतात. थंडीची भीती न बाळगता योग्य खबरदारी घेणे हाच निरोगी हृदयाचा मंत्र आहे.

डॉ. भाग्यश्री लहाने मुंडे
विठ्ठल हॉस्पिटल मोशी

पिंपरी-चिंचवडमध्ये १६ हजार महिलांना रोजगार प्रशिक्षण; ५७ कौशल्य अभ्यासक्रमांची संधी

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या समाज विकास विभागाकडून महिलांना रोजगार प्रशिक्षण दिले जाणार आहे. वर्षभरात एकूण १६ हजार महिला व तरुणींना वेगवेगळ्या ५७ प्रकारचे प्रशिक्षण खासगी संस्थेमार्फत दिले जाणार आहे. त्यासाठी एकाला किमान ११ हजार २५ रुपये तर कमाल ३२ हजार ११९ रुपये शुल्क आहे. ते शुल्क महापालिका त्या संस्थेला देणार आहे. त्यासाठी येणाऱ्या खर्चास तसेच, विविध कामांच्या खर्चाना स्थायी समितीने बुधवारी (दि. १८) झालेल्या सभेत मंजुरी दिली आहे.

सभेच्या अध्यक्षस्थानी अभिषेक बारणे होते. या वेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, नगर सचिव उल्हास जगताप, समितीचे सदस्य तसेच, विभागप्रमुख व अधिकारी उपस्थित होते. समाज विकास विभागाकडून महिला सक्षमीकरण व सबलीकरण योजनेंतर्गत शहरातील महिला व मुलींना वस्तीपातळीवर रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिले जाते.

त्यासाठी ५७ विविध विषयांचे मोफत कौशल्य विकास प्रशिक्षण ऑल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट या खासगी संस्थेमार्फत एका वर्षाच्या कालावधीत दिले जाणार आहे. त्या खर्चास समितीने मान्यता दिली. यामध्ये अकाउंट्स, फॅशन डिझायनिंग, डिजिटल मार्केटिंग, ब्युटी व वेलनेस, फूड प्रोसेसिंग, माहिती तंत्रज्ञान, डेटा नालिसिस, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सायबर सिक्युरिटी, केटरिंग तसेच पारंपरिक कला आणि सेवा क्षेत्रातील अभ्यासक्रमांचा समावेश आहे. शहरातील सर्व झोपडपट्ट्यांमध्ये सेवाशुल्क बिलांचे वाटप व नागरिकांची माहिती मोबाईल पद्धारे अद्ययावत करण्याचे काम महिला बचतगटांमार्फत करण्यात येणार आहे. प्रत्येक बिलासाठी २५ रूपये शुल्क दिले जाणार आहे.

दिघी-आळंदी रस्त्यावरील ग्रेड सेपरेटर, सबवे व उड्डाणपूल, एम्पायर इस्टेट उड्डाणपूल आणि नाशिक फाटा ते वाकड रस्त्यावरील विविध स्ट्रक्चर्सच्या रेलिंग, स्ट्रॉमवॉटर लाईन व इतर स्थापत्यविषयक दुरुस्ती करणे, रस्ते दुभाजकांची देखभाल व सुशोभीकरण करणे, एमआयडीसी परिसरातील रस्त्यांची दैनंदिन साफसफाई तसेच, नेहरूनगर येथील नवीन न्यायालय परिसरातील स्वच्छतेसाठी कर्मचारी पुरविण्याच्या कामांना मुदतवाढ देण्यात आली आहे. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील विविध विभागांसाठी कॉटरी मशीन खरेदी, रुग्णालयातील रंगरंगोटी आणि भोसरी रुग्णालयातील स्थापत्यविषयक दुरुस्तीच्या कामांनाही मंजुरी देण्यात आली आहे. निगडी येथील भक्ती शक्ती उद्यानात राष्ट्रध्वज फडकविणे, त्याचे संचलन व देखभाल तसेच संबंधित यंत्रणेच्या दुरुस्तीच्या कामास मान्यता देण्यात आली.

स्वच्छ सर्वेक्षणात प्रथम क्रमांक मिळाल्याने आयुक्तांचा सत्कार

केंद्र शासनाच्या स्वच्छ सर्वेक्षण अभियान २०२५-२६ मध्ये महाराष्ट्रातील सर्वात स्वच्छ शहर म्हणून पिंपरी चिंचवड महापालिकेला प्रथम क्रमाकांचा पुरस्कार मिळाल्याबद्दल स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांच्या हस्ते आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचा सन्मान करण्यात आला. या वेळी अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल व समितीचे सदस्य उपस्थित होते.

केळगाव येथील श्री समर्थ प्री-प्रायमरी स्कूल मध्ये आग

आळंदी । प्रतिनिधी

सदर ठिकाणी आग लागल्याची वर्दी नगरसेवक तथा विरोधी पक्षनेते आदित्य घुंडरे, सुमित पवळे, केळगाव येथील नागरिक व आळंदी पोलीस स्टेशन यांच्यामार्फत प्राप्त होताच आळंदी नगरपरिषदेचे अग्निशमन वाहन व कर्मचारी तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. मुख्याधिकारी माधव खांडेकर साहेब व अग्निशमन विभागप्रमुख विष्णुकुमार शिवशरण साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आग विझविण्याची कार्यवाही करण्यात आली. सदर आग शाळेच्या स्टोअर रूममध्ये लागली होती. प्राथमिक पाहणीत इन्व्हर्टरमध्ये



शॉर्टसर्किट होऊन वायरने पेट घेतला व संपूर्ण वायरला आग लागून आग पसरल्याचे निदर्शनास आले. अग्निशमन कर्मचाऱ्यांनी तातडीने कार्यवाही करून आग पूर्णपणे विझविली व परिस्थिती नियंत्रणात आणली.

आग विझविण्याच्या कार्यवाहीत सहभागी कर्मचारी : वाहनचालक विनायक सोळंकी, लिडिंग फायरमन प्रसाद बोराटे, फायरमन अमित घुंडरे, साहिल काळे, सिद्धेश्वर गारडे व सिद्धार्थ गावडे. तसेच केळगाव येथील नागरिकांचे सहकार्य लाभले. आग विझविण्याच्या वेळी शाळा अगोदरच सुटलेली असल्याने विद्यार्थी व इतर नागरिकांना कोणतीही जीवितहानी झाली नाही. सर्वजण सुखरूप व सुरक्षित असल्याची खात्री करण्यात आली. आळंदी नगरपरिषदेच्या अग्निशमन वाहन व कर्मचाऱ्यांनी तत्परतेने कार्यवाही करून आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळविले.

मेट्रोच्या खोदकामात जलवाहिनी फुटली; आकुर्डीचा पाणीपुरवठा दिवसभर विस्कळीत

आकुर्डी । प्रतिनिधी

मेट्रोचे खोदकाम सुरू असताना जलवाहिनी फुटल्याने पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत होणारा आकुर्डीतील पाणीपुरवठा बुधवारी (दि.१८) दिवसभरासाठी विस्कळीत झाल्याने नागरिकांना व महिलांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. पुणे महामेट्रोचे काम सुरू असताना आज निगडीत टिळक चौकातील महापालिकेची पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी फुटल्यामुळे सकाळपासून आकुर्डी परिसरातील पंचतारानगर, पांढरकरवस्ती, शिवांजली अपार्टमेंट, शुभश्री अपार्टमेंट, महापालिका दवाखाना परिसर, विठ्ठल मंदिर परिसर अशा अनेक भागांमध्ये सकाळी होणारा पाणीपुरवठा सायंकाळपर्यंत होऊ शकला नाही.

त्यामुळे महिलांना मोठा त्रास सहन करावा लागला. त्यातच पाणीपुरवठा विभागामार्फत काही तासांत पाणीपुरवठा यंत्रणा सुरळीत होण्याचे आश्वासन दिल्याने महिलांमध्ये शांततेचे वातावरण होते; परंतु सायंकाळपर्यंत पाणीपुरवठा न झाल्याने महिलांनी दिवसभराचा राग पाणीपुरवठा विभागावरती काढला यातच सायंकाळी पाणी येण्याचे कालावधीमध्ये महावितरणकडून वीजपुरवठा खंडित झाल्याने महिलांनी वीजपुरवठा कार्यालयात फोनाफोनी करून तात्काळ वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली.

आज दिवसभरामध्ये मेट्रोच्या खोद

20 Nov 2026:Layout 1 11/19/2026 11:45 PM Page 1

सर्वांचा मित्र..लोकमान्य पत्र..दैनिक

जगमित्र

www.jagmitra.com मराठवाड्यातील निर्भिड दैनिक jagmitra2010@gmail.com

परभणी/parbhani | वर्ष १५ वे | अंक २२८ | शुक्रवार दि.२० नोव्हेंबर २०२६ | पाने ४ | किंमत : ३ रू.

राष्ट्रवादी काँग्रेस हिंगोलीचे माजी जिल्हाध्यक्ष बीडी बांगरानी
मुंबईत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची घेतली भेट

हिंगोली/प्रतिनिधी हिंगोली जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिक मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जात आहेत. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी जिल्हाध्यक्ष बी. डी. बांगर यांनी मुंबई येथे राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांची भेट घेऊन हिंगोली जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत सविस्तर निवेदन सादर केले. या भेटीदरम्यान हिंगोली जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत, शेतमजुरांना दिलासा तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी दूर करण्यासाठी शासनाने तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी आग्रही मागणी बी. डी. बांगर यांनी केली. दुष्काळामुळे शेतीचे झालेले नुकसान, शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती आणि ग्रामीण भागातील जनतेसमोर निर्माण झालेल्या समस्यांबाबत त्यांनी उपमुख्यमंत्र्यांशी सविस्तर चर्चा केली. हिंगोली जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी



जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त जनतेला शासनाच्या माध्यमातून सर्वतोपरी मदत करण्याबाबत सकारात्मक आश्वासन दिल्याची माहिती बी. डी. बांगर यांनी दिली.दुष्काळाच्या कठीण काळात शेतकरी बांधवांना आधार देणे ही आपली सामाजिक आणि राजकीय जबाबदारी आहे. हिंगोली जिल्ह्यातील शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचेही बी. डी. बांगर यांनी स्पष्ट केले.

महिलांसाठी १२० क्षमतेचे वसतिगृह; गुणवंत विद्यार्थिनी व खेळाडूंना १० हजारांची मदत
घरकुल आणि सॅनिटरी पॅड सुविधांनाही मंजुरी



परभणी । प्रतिनिधी
महानगरपालिका क्षेत्रातील महिला, विद्यार्थिनी आणि बालकांच्या कल्याणासाठी परभणी महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीने विविध महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. एकल महिलांसाठी १२० क्षमतेचे वसतिगृह, महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र १२० क्षमतेचे वसतिगृह, गुणवंत विद्यार्थिनी आणि विशेष प्रावीण्य मिळविणाऱ्या महिला खेळाडूंना प्रत्येकी १० हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य, तसेच गरजू महिलांना शिलाई मशीन देण्याच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. समितीच्या सभापती अश्विनी जाधव यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (दि. १६) झालेल्या बैठकीत हे निर्णय घेण्यात आले.महानगरपालिका कार्यक्षेत्रातील माध्यमिक शाळा, महाविद्यालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, सार्वजनिक शौचालये आणि अन्य सार्वजनिक ठिकाणे अशा एकूण ३३० ठिकाणी महिला व विद्यार्थिनींसाठी सॅनिटरी पॅड व्हेंडिंग मशीन आणि इन्सिनरेटर बसविण्याच्या प्रस्तावाला एकमताने मंजुरी देण्यात आली. एकल महिलांना सुरक्षित व मोफत निवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी १२० क्षमतेचे वसतिगृह बांधण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठीही १२० क्षमतेचे स्वतंत्र वसतिगृह उभारण्याबाबत चर्चा करून त्यासाठी योग्य जागा निश्चित करीत शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याचे ठरले.शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थिनींनाही आर्थिक प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेण्यात आला. दहावी, बारावी, पदवी आणि पदव्युत्तर परीक्षांमध्ये विशेष प्रावीण्य मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थिनींना पुढील शिक्षणासाठी प्रत्येकी १० हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली. यासाठी महाविद्यालयांच्या प्राध्यापकांना पत्र पाठवून गुणवंत विद्यार्थिनींची माहिती संकलित करण्याची सूचना वैशाली दैठणकर, समरीन बेगम आणि सय्यद फारूख यांनी केली. तसेच क्रीडा क्षेत्रात विशेष प्रावीण्य मिळविणाऱ्या महिला खेळाडूंनाही प्रत्येकी १० हजार रुपये शिष्यवृत्ती देण्याच्या प्रस्तावावर चर्चा करण्यात आली.आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि एकल महिलांना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून शिलाई मशीन वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला. या विषयावर समरीन बेगम, सय्यद फारूख आणि तबसुम वसीम शेख यांनी सूचना मांडल्या. रजिया बेगम मोहम्मद युनूस यांनी दर्जेदार शिलाई मशीन देण्याची मागणी केली. योजनेत दिव्यांग महिला, विधवा महिला आणि ४० वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या महिलांना प्राधान्य देण्याबाबतही सूचना करण्यात आली. या प्रस्तावाला एकमताने मंजुरी देण्यात आली.याशिवाय महानगरपालिका क्षेत्रातील पात्र एकल महिलांना रमाई आवास योजना आणि प्रधानमंत्री आवास योजनेतून घरकुलाचा लाभ मिळवून देण्यासाठी संबंधित विभागामार्फत सर्वेक्षण करून आवश्यक कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. शहरातील सर्व शासकीय इमारती आणि सार्वजनिक ठिकाणी महिलांच्या सोयीसाठी हिरकणी कक्ष उभारण्याच्या प्रस्तावालाही मंजुरी देण्यात आली.या बैठकीस नगरसचिव विकास रत्नपारखे, आरोग्य अधिकारी डॉ. कल्पना सावंत, सहाय्यक आयुक्त गजानन जाधव, लेखा अधिकारी अमोल सोळंके, माहिती व जनसंपर्क अधिकारी राजकुमार जाधव, नगरसचिव विभागाच्या रेणुका बनकर यांच्यासह समिती सदस्य भगवान वाघमारे, रजिया बेगम मोहम्मद युनूस, तबसुम वसीम शेख, वैशाली दैठणकर, समरीन बेगम आणि सय्यद फारूख उपस्थित होते.महिलांचे आरोग्य, शिक्षण, सुरक्षित निवास, रोजगार आणि आर्थिक स्वावलंबन या बाबींना केंद्रस्थानी ठेवून समितीने घेतलेल्या निर्णयांमुळे महानगरपालिका क्षेत्रातील गरजू महिला आणि विद्यार्थिनींना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

परभणी मनपाच्या सभेत ६२ पैकी ६१ विषय मंजूर; सहा तास रंगली चर्चा १०० खाटांचे आयुष हॉस्पिटल,
वारकरी भवनासाठी जागा आणि रस्ते-चौकांच्या नामकरणाचे ठराव मंजूर

परभणी । प्रतिनिधी
महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा बुधवार (दि. १७) बी. रघुनाथ सभागृहात महापौर सय्यद इकबाल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. तब्बल सहा तास चाललेल्या या सभेत चर्चेसाठी ठेवण्यात आलेल्या ६२ विषयांपैकी ६१ विषयांना मंजुरी देण्यात आली, तर एका विषयावर अधिक माहिती घेऊन तो पुढील सभेत ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. शहरातील विकासकामे, नागरी सुविधा, रस्ते, स्वच्छता आणि विविध प्रलंबित प्रश्नांवर यावेळी सविस्तर चर्चा झाली. उपमहापौर गणेश देशमुख, आयुक्त नितीन नार्वेकर आणि नगरसचिव विकास रत्नपारखी यांची उपस्थिती होती.सभेत शहरातील विविध रस्ते आणि चौकांच्या नामकरणाचे ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. दुष्काळी रस्त्याला राजर्षी शाहू महाराज रस्ता, परभणी-जिंतूर रोडवरील नवीन बायपासजवळील चौकाला शिवरत्न जीवा महाले चौक, तर परभणी-नांदखेडा रोडवरील बायपास पुलाला सद्गुरू श्री राम भरोसे महाराज संस्थान मार्ग असे नाव देण्याचे ठरले. तसेच विनायकनगरमधील आजम चौक दर्गा रोड ते जुना पेडगाव रोडला जोडणाऱ्या रस्त्याला माजी आमदार अब्दुल रहमान खान मार्ग असे नामकरण करण्यास मंजुरी देण्यात आली. वसमत रोडवरील कारेगाव चौकाला संत तुकाराम चौक असे नाव देण्याची मागणीही करण्यात आली.

शहरात १०० खाटांचे आयुष हॉस्पिटल उभारण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याचा ठराव स्थायी समिती सभापती प्रतिभा अतुल



सरोदे यांनी मांडला. खासदार संजय जाधव निधीसाठी पाठपुरावा करतील, अशी माहिती देण्यात आली. हा ठराव एकमताने मंजूर झाला. तसेच शहरात वारकरी भवन उभारण्यासाठी जागा निश्चित करण्याचा मुद्दा गटनेते विजय जामकर यांनी उपस्थित केला. वसमत रोड किंवा गंगाखेड रोडवरील दिंडी मार्गालगत जागा उपलब्ध करून देण्याची मागणी नगरसेविका अंबिका डहाळे आणि सुनील देशमुख यांनी केली.घरपट्टीसंदर्भातील अनधिकृत बांधकामांचा प्रश्न नगरसेवक सुनील देशमुख यांनी उपस्थित केला.

स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत सार्वजनिक शौचालयांच्या दुरुस्तीच्या कामांसाठी महापालिकेचा ३० टक्के स्वहिस्सा उपलब्ध करून देण्यासही मंजुरी देण्यात आली. प्रत्येक कामासाठी साडेसात लाख रुपये खर्च अपेक्षित असून, पाहणीनंतर प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात येणार आहे.दरम्यान, सर्वे क्रमांक ५७९/१ मधील शासकीय संपादित जमिनीवरील मालमत्ता क्रमांक ११४७ संदर्भात चौकशी समिती नियुक्त केल्याची माहिती आयुक्त नार्वेकर यांनी दिली. त्यामुळे या विषयावरील निर्णय पुढील सभेपर्यंत स्थगित ठेवण्यात आला. पारदेश्वर मंदिर परिसरातील नालीचे काम पूर्ण झाल्यानंतरच ठेकेदाराचे बिल अदा करावे, अशी मागणी नगरसेवक व्यंकट डहाळे यांनी केली. आयुक्तांनी संबंधित ठेकेदाराला काम लवकर पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. सभेत विजय जामकर, गुलमीर खान, सय्यद समीर, विश्वजीत बुधवंत, सागर गांगाळे, मीनाताई वरपूडकर यांच्यासह अनेक नगरसेवकांनी विविध प्रश्नांवर भूमिका मांडली. शहराच्या विकासाशी संबंधित महत्त्वपूर्ण विषयांना मंजुरी मिळाल्याने ही सभा चर्चेचा विषय ठरली.

पालममध्ये पिण्याच्या पाण्याच्या मुख्य पाईपलाईनवर अतिक्रमण; नालीचे सांडपाणी नागरिकांच्या घरात!

पालम/अनिस खुरेशी पालम शहरातील नगरपंचायत हद्दीत सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या मुख्य पाईपलाईनवर तसेच सार्वजनिक नालीवर अतिक्रमण करून बांधकाम करण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. परभणी-पालम राज्य महामार्ग क्रमांक २३५ पासून शासकीय धान्य गोदामाकडे जाणाऱ्या जुन्या कोळवाडी रोडवरील या अतिक्रमणामुळे नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या प्रकारामुळे नगरपंचायतीच्या पाणीपुरवठा योजनेच्या कामात अडथळा निर्माण होत असून, नालीचा निचरा बंद झाल्याने सांडपाणी नागरिकांच्या घरात शिरत असल्याची तक्रार रहिवाशांनी केली आहे.वार्ड क्रमांक १३ मधील जुन्या पाईपलाईनवर कब्जा?** ३३ फुटी पांदन रस्ता गिळंकृत वार्ड क्रमांक १३ मधून पूर्वी नगरपंचायतीची पिण्याच्या पाण्याची मुख्य पाईपलाईन टाकण्यात आलेली असून, सदर पाईपलाईन अद्याप सुरू असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. मात्र, या पाईपलाईनच्या जागेवर काही व्यक्तींनी घर, बांधकाम व कुंपण करून अतिक्रमण केल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे भविष्यात पाईपलाईनची दुरुस्ती किंवा नवीन कामे करणे कठीण होण्याची शक्यता आहे.नाली तुंबली, सांडपाणी घरात; आरोग्याचा प्रश्न गंभीर!सार्वजनिक नालीवरील अतिक्रमणामुळे सांडपाण्याचा निचरा व्यवस्थित होत नसल्याने परिसरातील नागरिकांच्या घरात दूषित पाणी शिरत असल्याची तक्रार आहे. दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव आणि साथीच्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. याशिवाय जुना कोळवाडी रोड व शासकीय धान्य गोदामाकडे जाणारा सार्वजनिक रस्ताही अतिक्रमणामुळे अरुंद झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.**नागरिकांची नगरपंचायतीकडे सात दिवसांची मागणी!**या प्रकरणी नागरिकांनी मुख्याधिकारी, नगरपंचायत पालम यांच्याकडे सामूहिक तक्रार अर्ज सादर करून पुढील मागण्या केल्या आहेत.१. संबंधित अतिक्रमणांची तातडीने अधिकृत मोजणी करून सात दिवसांच्या आत नियमानुसार अतिक्रमण हटवावे.२. पिण्याच्या पाण्याच्या मुख्य पाईपलाईनच्या दोन्ही बाजूंना किमान ३ फूट किंवा सुमारे १ मीटर जागा मोकळी करून द्यावी.३. अतिक्रमणाबाबत निर्णय होईपर्यंत संबंधित जागेच्या कायदेशीर स्थितीची तपासणी करून नियमानुसार नवीन नळजोडणी व बांधकाम परवानगीबाबत निर्णय घ्यावा.४. सार्वजनिक नालीचा निचरा तातडीने पूर्ववत करून नागरिकांना होणारा त्रास दूर करावा.**मुख्याधिकारी कारवाई करणार की नागरिकांना जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घ्यावी लागणार?सार्वजनिक पाईपलाईन, नाली व रस्त्यावरील अतिक्रमणाबाबत महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील लागू तरतुदींनुसार चौकशी करून कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. सात दिवसांत ठोस कारवाई न झाल्यास जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे तक्रार दाखल करून न्याय मागणार असल्याचा इशाराही सामूहिक अर्जाद्वारे देण्यात आला आहे.आता पालम नगरपंचायतीचे मुख्याधिकारी या तक्रारीची कितपत दखल घेतात, प्रत्यक्ष स्थळ पाहणी व मोजणी करून अतिक्रमण हटविण्याची कारवाई करतात का, याकडे संपूर्ण परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

पदवीधरांच्या समस्या व तालुक्यातील विविध प्रश्नांवर आमदार ॲड.अभिजीत वंजारी यांच्याशी चर्चा पदवीधरांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन समस्या

प्रतिनिधी/नीलम चकोले
हिंगणा : बुधवार दिनांक १८ नोव्हेंबर २०२६ रोजी नागपूर विभाग विधान परिषद आमदार ॲड. अभिजीत वंजारी यांची अपक्ष नगरसेवक दीपक नासरे (नगर परिषद वानाडोंगरी) यांच्यासह विशाल खडतकर, नंदू पोटे, पीयूष पोकळे, गजानन ढाकूलकर, अक्षय कडू, आशिष बंडे आणि अक्षय काकडे यांनी सदिच्छा भेट घेतली.यावेळी हिंगणा तालुक्यातील पदवीधरांच्या विविध समस्या तसेच तालुक्यातील इतर महत्त्वाच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात



आली. नागरिक आणि पदवीधरांना भेडसावणाऱ्या अडचणी आमदार ॲड. अभिजीत वंजारी यांच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या. याप्रसंगी उपस्थितांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.यावेळी आपल्या माध्यमातून मांडण्यात आलेल्या समस्या प्राधान्याने विचारात घेऊन त्या सोडविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन आमदार अभिजीत वंजारी यांनी दिले.या भेटीदरम्यान पदवीधरांचे प्रश्न, स्थानिक समस्या आणि नागरिकांच्या हिताच्या विविध विषयांवर सकारात्मक चर्चा झाली.

भाजपा वाडी व गोधनी मंडळातर्फे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन; पदाधिकाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती
मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत उत्कृष्ट ग्रामपंचायतींचा गौरव

प्रतिनिधी/नीलम चकोले
हिंगणा वाडी, दि. १९ नोव्हेंबर : विदर्भातील वाडी येथील रहिवासी अभिजीत जोशी यांची भारतीय जनता पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेश आयटी प्रकोष्ठाच्या संयोजकपदी अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चौहान यांनी अधिकृत नियुक्तीपत्राद्वारे ही घोषणा केली. या नियुक्तीबद्दल आज गुरुवारी वाडी येथे आमदार समीरजी मेघे यांच्या हस्ते अभिजीत जोशी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत व अभिनंदन करण्यात आले. तसेच भाजपा वाडी व गोधनी मंडळातर्फेही त्यांचा सत्कार करण्यात आला.या नियुक्तीबद्दल अभिजीत जोशी यांनी केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चौहान, पालकमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे, आमदार राजीवजी पोतदार आणि आमदार समीरजी मेघे यांचे आभार मानले. पक्षाने दिलेली जबाबदारी निष्ठेने पार पाडण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.यावेळी वाडीचे नगराध्यक्ष नरेश चरडे, उपाध्यक्षा कल्पना सगदेव, सुजीत नितनवरे, आनंदबाबू कदम, राजूताई भोले, केशव बांदरे, दिनेश कोचे, विजय मेंढे, नाना ठाकरे, प्रमोद गमे, कमलाकर इंगळे, प्रमोद राऊत, कैलास मंथापुरवार, देवराव कडू, गजानन रामेकर, नितीन अडसड, प्रकाश डवरे, अशोक माने, राकेश मिश्रा, गोविंद रोडे, कमल कनोजे, संदीप चरडे, अक्षय तिडके, सरिता यादव, ज्योती भोरकर, रेखा रोडे, मनोरमा येवले, संगीता बावणे, कांचन उईके, किरण लांजेवार, दिव्या तिरपुडे, लिलाबाई रहांगडाले, सविता इसळ, ज्योत्स्ना नितनवरे, आभा पांडे, रंजीता यादव, मंगला पडोळे, पिंकी करण, गुरुदास बावने, दिनेश उईके, दिवानजी रहांगडाले, अविनाश इसळ, दामोदर जोध, राजेश शेळके, राहुल तायडे, नितीन अन्नपुर्णे, रोहित तिवारी, रमेश गोमासे, अरुण सिंह, पिंटू पटले यांच्यासह भाजपाचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

पालम येथे २८ नोव्हेंबरला शासकीय योजनांचा महामेळावा;कायदेविषयक महाशिबिराचे आयोजन

परभणी/प्रतिनिधी
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी, तालुका विधी सेवा समिती, पालम आणि जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, २८ नोव्हेंबर रोजी पालम येथे शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा आणि कायदेविषयक महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ वाजता गजानन मंगल कार्यालय, पालम येथे हा कार्यक्रम होणार आहे.राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि मुंबई उच्च न्यायालय यांच्या निर्देशानुसार या महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. समाजातील दुर्बल व वंचित घटकांना शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती मिळावी, तसेच त्यांना या योजनांचा प्रत्यक्ष लाभ घेता यावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.महाशिबिराच्या माध्यमातून नागरिकांमध्ये शासकीय योजनांविषयी जनजागृती करण्यासोबतच विविध कायदेविषयक बाबींबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

परभणी जिल्ह्यातील विविध शासकीय व निमशासकीय विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी या शिबिरात सहभागी होऊन नागरिकांना योजनांची माहिती देणार आहेत. यासाठी विविध शासकीय विभागांचे स्वतंत्र स्टॉल उभारण्यात येणार असून, त्याद्वारे पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन या महाशिबिराचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती तथा पालक न्यायाधीश सचिन एस. देशमुख यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. एम. सदाराणी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडणार आहे.यावेळी जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण, पोलीस अधीक्षक पंकज कुमावत आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथूर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

केसापूर गावातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी आठ दिवसांचा अल्टिमेटम;
मागण्या मान्य न झाल्यास २८ नोव्हेंबरला जिल्हा परिषदेसमोर धरणे आंदोलन



हिंगोली/प्रतिनिधी तालुक्यातील केसापूर गावात जलजीवन मिशनची नळ पाणीपुरवठा योजना सुरू असूनही गावकऱ्यांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. गावातील जलजीवन विहिरीत पुरेसे पाणी उपलब्ध नसल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. ही समस्या तातडीने सोडवावी, या मागणीसाठी डॉ. रमेश शिंदे पाटील यांनी १९ नोव्हेंबर रोजी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन सादर केले.निवेदनानुसार, हळदवाडी तलावापासून सुमारे ५०० मीटर अंतरावर असलेल्या जलजीवन विहिरीत पाण्याचा साठा अत्यंत कमी आहे. विहिरीवर केवळ एक तास मोटार चालल्यानंतर विहीर कोरडी पडते. त्यामुळे महिला, लहान मुले, वृद्ध आणि आजारी नागरिकांना पाण्यासाठी दूरवर भटकंती करावी लागत आहे. नागरिकांवर टँकरद्वारे पाणी विकत घेण्याचा आर्थिक भार पडत आहे.या समस्येवर तातडीने उपाययोजना म्हणून जलजीवन विहिरीचे खोलीकरण करणे, पाणी उपलब्ध न झाल्यास दुसरा बोअर किंवा नवीन विहीर खोदणे, तसेच शेतकऱ्यांच्या विहिरींचे नियमानुसार अधिग्रहण करून तात्पुरता पाणीपुरवठा सुरू करणे, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. याशिवाय नरसी येथील तलावातून पाणी आणून पिरमळ येथे फिल्टर बसविणे किंवा जलजीवन योजनेसाठी स्वतंत्र फिल्टर व्यवस्था उभारण्याची मागणीही करण्यात आली आहे. कायमस्वरूपी व्यवस्था होईपर्यंत पुढील सहा महिन्यांसाठी तात्पुरता पाणीपुरवठा सुरू ठेवावा, अशी मागणी निवेदनात केली आहे.पाणीपुरवठा अधिकारी, ग्रामसेवक आणि विस्तार अधिकारी यांनी प्रत्यक्ष गावात येऊन विहीर, तलाव व फिल्टरची पाहणी करावी आणि तातडीने उपाययोजना कराव्यात, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.२८ नोव्हेंबरला धरणे आंदोलनाचा इशारा प्रशासनाने २७ नोव्हेंबर २०२६ पर्यंत प्रत्यक्ष काम सुरू न केल्यास २८ नोव्हेंबर रोजी केसापूर येथील महिला, शेतकरी व शेतमजूर जिल्हा परिषद कार्यालय, हिंगोली येथे धरणे आंदोलन करणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. हे आंदोलन शांततामय, अहिंसक व संविधानिक मार्गाने करण्यात येणार असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. निवेदनाच्या प्रती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी, आमदार, गटविकास अधिकारी यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांचे आवाहन; २७ नोव्हेंबरपर्यंत जिल्ह्यात बाल हक्क सप्ताह

परभणी/प्रतिनिधी
बालविवाहमुक्त परभणी जिल्ह्याची निर्मिती करण्यासाठी केवळ प्रशासनाच्या प्रयत्नांवर अवलंबून न राहता सर्व शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, शैक्षणिक व सामाजिक संस्था आणि नागरिकांनी सामूहिक सहभाग नोंदविणे आवश्यक आहे, असे आवाहन जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांनी केले आहे.जिल्ह्यातील बालविवाहाचे प्रमाण कमी करून बालकांचे शिक्षण, आरोग्य, संरक्षण आणि सर्वांगीण विकास सुनिश्चित करण्यासाठी महिला व बालविकास विभागाच्या वतीने १८ ते २७ नोव्हेंबरदरम्यान बाल हक्क सप्ताह राबविण्यात येत आहे. या सप्ताहाच्या माध्यमातून बालविवाह प्रतिबंध, बालहक्कांचे संरक्षण आणि बालकांना सुरक्षित व सन्मानपूर्वक जीवन जगण्याचा अधिकार याबाबत जिल्हाभर जनजागृती केली जाणार आहे.राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या चौथ्या सर्वेक्षणानुसार परभणी जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण ४८ टक्के असल्याचे निदर्शनास आले आहे. ही चिंताजनक बाब असून, हे प्रमाण कमी करण्यासाठी जिल्ह्यात ४ जानेवारी २००३ पासून बालविवाहमुक्त परभणी अभियान राबविण्यात येत आहे. बालविवाहामुळे मुलांचे शिक्षण अर्धवट राहणे, कुपोषण, आरोग्यविषयक समस्या, कौटुंबिक हिंसाचार, शोषण आणि मूलभूत हक्कांचे उल्लंघन अशा गंभीर समस्या निर्माण होतात. त्यामुळे बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात येत आहे.

देवडी पेंढरी परिसरातील कुजलेल्या अवस्थेतील महिलेच्या मृतदेहाची ओळख पटली; हिंगणा पोलिसांना यश!

प्रतिनिधी/नीलम चकोले हिंगणा : हिंगणा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील देवडी पेंढरी परिसरात कुजलेल्या अवस्थेत एका अज्ञात महिलेचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली होती. या घटनेची माहिती मिळताच हिंगणा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत तपासाची चक्रे गतिमान केली होती.घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद घोंगे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक संतोष राठोड यांनी तपासाला सुरुवात केली. सुरुवातीला महिलेची ओळख पटविणे हे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. मात्र, पोलिसांनी तपासादरम्यान विविध बाबींची पडताळणी करीत अथक प्रयत्नांनंतर मृत महिलेची ओळख पटविण्यात यश मिळवले.त्यानंतर दिनांक १९ नोव्हेंबर २०२६ रोजी आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून मृतदेह



कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आला.या प्रकरणाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद घोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली हिंगणा पोलीस स्टेशनचे पोलीस पथक करीत आहे. महिलेच्या मृत्यूमागील नेमके कारण काय, यासह घटनेशी संबंधित इतर बाबींचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. अज्ञात महिलेची ओळख पटवून मृतदेह कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यासाठी हिंगणा पोलिसांनी केलेल्या तपासामुळे या प्रकरणातील महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे.

राज्यात ३४ लाखांहून अधिक भूजल पुनर्भरण संरचनांच्या निर्मितीचे उद्दिष्ट मे २०२७ पर्यंत पूर्ण करणार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, दि. १९ : पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरवून भूजल पातळी वाढविणे, जुन्या जलसंधारण संरचनांचे पुनरुज्जीवन करणे आणि नव्या संरचनांची निर्मिती करणे, यासाठी राज्य शासनाने व्यापक कृती आराखडा तयार केला आहे. केंद्र शासनाच्या जलसंचय : जनभागीदारी अभियानांतर्गत राज्यात मे २०२७ पर्यंत ३४ लाख ८३ हजार ९४० भूजल पुनर्भरण संरचनांची निर्मिती पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने आणि निश्चित उद्दिष्टानुसार काम करावे,असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे जलशक्ती अभियान (जलसंचय: जनभागिदारी ३.०) राबविण्याबाबत बैठक झाली या बैठकीस वर्षा या शासकीय निवासस्थान येथून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहभागी झाले होते. बैठकीस पुणे येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे केंद्रीय जलशक्ती राज्यमंत्री राज भूषण चौधरी सहभागी झाले होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, एल निनोच्या प्रभावामुळे महाराष्ट्रासमोर दुष्काळाचे मोठे संकट निर्माण झाले आहे. राज्यातील जवळपास ९० टक्के भाग दुष्काळाच्या झळा सोसत असून, पिकांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. आगामी काळात पिण्याच्या पाण्याची मागणी वाढण्याची शक्यता आहे. या संकटाचे संधीत रूपांतर करण्याच्या दृष्टीने जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देण्यात येत आहे. जुन्या जलसाठ्यांचे पुनरुज्जीवन, तलावांची दुरुस्ती, शेततळी आणि पुनर्भरण खड्ड्यांची निर्मिती यावर विशेष भर देण्यात येत आहे.जलयुक्त शिवार ३.० ची १८ हजार गावांत अंमलबजावणीराज्य शासनाची महत्वाकांक्षी जलयुक्त शिवार योजना तिसऱ्या टप्प्यात राबविण्यात येणार असून, त्यासाठी १८ हजार गावांची निवड करण्यात आली आहे. जलयुक्त शिवार ३.०, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, मनरेगा तसेच इतर योजनांमधील निधी आणि कामांचे एकत्रिकरण करून जलसंधारणाची कामे अधिक प्रभावीपणे राबविण्यात येतील. या कामांचे शास्त्रीय पद्धतीने नियोजन, मॅपिंग आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, जलसंधारणाच्या कामांसाठी ग्रामविकास, वन, सार्वजनिक बांधकाम, नगरविकास, कृषी आणि पाणीपुरवठा विभागांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. जिल्ह्यांमध्ये ज